साप्ताहिक
# माणूस
३ मे ८६ / दोन रूपये

## अब नफरतकी अगली गोली न चले



## सुवर्णमंदिरात 'भारत जोडो'

साप्ताहिक

# माणूस

□

वर्ष : पंचविसावे

अंक : एकोणपन्नासावा

□

३ मे १९८६

किंमत : दोन रुपये

□

संपादक

श्री. ग. माजगावकर

□

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

मेधा राजहंस

□

वार्षिक वर्गणी

साठ रुपये

□

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी चालक सहमत असतीलच असे नाही

□

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

□

पत्ता

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ४११०३०

दूरध्वनी : ४४३४५९

□

मुखपृष्ठ–सुरेश नावडकर

## पुणे वार्ता

### □ अरुण शौरी उवाच !

अरुण शौरी हे मोठे पत्रकार आहेत. गाजलेले आहेत, लोकप्रिय आहेत आणि तसे ते महानही आहेत. ते बोलतात छान म्हणूनच लोक गर्दीही करतात. अरुण शौरीच्या वक्तृत्वाला एक जादा डायमेन्शन आहे त्यांच्या बोलण्यातूनही त्यांची पत्रकारिता डोकावते. वर्तमानपत्राच्या पहिल्या पानावर असणाऱ्या ठळक हेडलाईनसारखी त्यांची वक्तव्ये असतात. परवा अरुण शौरी पुण्यात बोलले. 'वपु 'च्या 'वपु–८५' या पुस्तकाच्या प्रकाशनासाठी ते आले होते. टिळक स्मारक मंदिर सध्या वसंत व्याख्यानमालेने गजबजलेले आहेच त्यात अरुण शौरीच्या व्याख्यानासाठी ही गजबज प्रचंड वाढलेली

अरुण शौरी 'धर्म आणि राजकारण' या विषयावर बोलले. बोलले छान पण फक्त विधानात्मक हल्ली सर्वच वक्त्यांच्या बाबतीत हे चाललय. विधाने आणि विधानामागून विधाने–एखाद दुसर चमकदार उदाहरण वगैरे. पण त्यातून निश्चित (किंवा इंग्रजीत 'कॉन्क्रीट' वगैरे म्हणतात तस.) निष्कर्ष असा काढता येणं कठीण त्यातून दोघांचीही सोय होते वक्त्याची आणि श्रोत्यांचीसुद्धा. झाकली मूठ सव्वालाखाची म्हणतात ना तस.

जाता जाता अरुण शौरीनी गौप्यस्फोट वगैरे करण्याचा प्रयत्न केला. ही त्यांच्या पत्रकारितेची झलक राजीव गांधींना मुस्लिम महिला विधेयक प्रकरणी दिशाभूल करणारी माहिती पुरविली गेली, विरोध टाळण्यासाठी केले गेलेले यत्न वगैरे वगैरे गोष्टी त्यांनी सांगितल्या. (तमाम श्रोते भारावले शौरी इज द ग्रेट वगैरे वगैरे) धर्म आणि राजकारण यांची गल्लत झाल्यानेच पाकिस्तान, पंजाब आणि शहाबानो प्रकरणे निर्माण झाल्याचे त्यांनी सांगितले अखेर धर्म निरपेक्षता आणि धार्मिक स्वातंत्र्य वगैरेच्या संदर्भातील धोरणात सातत्य टिकवण्याचा प्रयत्न हवा असे ते म्हणाले.

असो. शौरीचे भाषण एकूण चांगले झाले सांस्कृतिक पुणेकर खूप होऊन घरी गेला आणि 'वपु–८५' हे वपुंचे ४८ वे पुस्तक वाचण्यात मग्न झाला.

### □ ज्यो फिलिप्सची कुचंबणा !

खेळ आणि खेळाडूंना सध्या चांगले दिवस आले आहेत पैसा आणि प्रतिष्ठा दोन्ही बाबतीत चलती आहे. क्रिकेट आणि टेनिस मध्ये ही चलती जोरात आहे इतर खेळातही परिस्थिती पूर्वीपेक्षा खपच चांगली आहे असे म्हणावे लागेल. न पेक्षा भारतीय हॉकीला सुवर्णयुग दाखवणाऱ्या त्या महान शिल्पकारांपैकी एक–ज्यो फिलिप्स पुण्यात खडकीमध्ये एका जुनाट चाळीतल्या दोन खोल्यात आपले उर्वरित आयुष्य जगताना दिसला नसता !

खेळाडूंना आता 'स्टारपण' लाभलय मासिके त्यांचे रंगीबेरंगी फोटो छापतात. त्यांची 'गॉसिप्स' लिहितात. सुनील गावस्कर दिनेश सुटींगची जाहिरात करतो शारजामध्ये वेंगसरकरला पन्नास हजार डॉलर्स मिळतात पी. टी. उषाला लाखाचे बक्षिस मिळते आणि सरकार फ्लॅटही देते खेळाडूसाठी नोकऱ्या आहेत. सारे काही व्यवस्थित आहे. ज्यो फिलिप्सच्या काळात ह्यापैकी काहीही नव्हते तो तर भारताचा 'ग्रेट ऑलिम्पियन' होता. त्याने आणि त्याच्या संघाने सुवर्णपदक मिळवले होते नुसते मिळवलेच नव्हते तर पुढे बरीच वर्षे राखले होते. पण तरीही त्याच्या वाट्यास यापैकी काहीही आले नाही.

ज्यो फिलिप्सने ॲम्युनिशन फॅक्टरीत नोकरी केली. एक कामगार म्हणून तो वावरला, मोठं कर्तृत्व गाजवूनही तो अंधारात राहिला. आता त्याचा सत्कार झाला. क्रीडामंत्री अशोक पाटील त्याच्या घरी गेले. शासनाचा दहा हजार रुपयांचा चेक त्याला मिळाला, वर सवलतीच्या दराने फ्लॅटचे आश्वासन ! ज्यो गहिवरला. त्याला अश्रू आवरता येईनात सत्तरीच्या या माणसाचे अश्रू फार बोलके आहेत. फार मोठी व्यथा सांगणारे आहेत.

ज्योला मिळालेल्या या अनुदानाची

कहाणीही मोठी विचित्र आहे महाराष्ट्र शासनाने वृद्ध खेळाडूच्या मदतीसाठी एक योजना तयार केली आहे. त्यानुसार दरवर्षी एक लाख रुपयाची तरतूद करण्यात आली आहे पण या समितीची बैठक नित्यनियमाने होत नाही सपूर्ण अनुदान वाटले जात नाही. त्यापैकी बरीच रक्कम शासनाला साभार परत मिळते. ज्योचे अनुदान दोन अडीच वर्षे रखडले. तावडचा फितीतून त्याला जावे लागले वीस हजाराची मागणी दहा हजार रुपयावर खाली आली.

क्रीडापटूना सवलतीच्या दरात फ्लॅट्स देण्याची योजना आहे त्याचा खेळाडूच्या नावाखाली अनेकानी गैरफायदा घेतला आहे असे क्रीडामत्री स्वत च सागतात ज्यो फिलिप्ससारखा गुणी आणि पराक्रमी क्रीडापटू खितपत पडतो. ज्योसारखेच अनेक आहेत. एक काळ गाजवणारे कुस्तीगीर आहेत, क्रिकेटपटू आहेत, मैदानी खेळाडू आहेत. त्याची दखल शासन घेईल काय ? या अनुदानाचा, योजनाचा लाभ सरळमार्गाने क्रीडापटूकडे जाईल काय हा खरा प्रश्न आहे

### □ हिंदी एकांकिका

रमण आर्टस् सर्कल या सस्थेने नेहरू मेमोरियल हॉलमध्ये दोन हिंदी एकाकिका शनिवारी २६ एप्रिलला सादर केल्या 'गर्द' आणि 'घर बैठे झगडे.' दोन्ही एकाकिका लिहिल्या होत्या मनोज परजादाने. रमण आर्टस् सर्कल हा तसा उत्साही ग्रुप. पण या एकाकिकामध्ये केवळ उत्साहापलिकडे काहीच नव्हते.

धर्मेन्द्र विलीमोरियाने एकाकिका दिग्दर्शित केल्या होत्या. अर्थात त्यात कुठेही दिग्दर्शन दिसत नव्हते 'गर्द' ही आजच्या तरुणाच्या व्यसनाधीनतेने एका कुटुबाची झालेली वाताहत दाखवणारी कथा. सरधोपट रचना आणि माडणीमुळे हा तसा चागला विषय पार भुईसपाट झाला. प्रेक्षकानी मात्र बराच हल्लागुल्ला माजवून आपली करमणूक साधून घेतली.

'घर बैठे झगडे' ही फार्सच्या वळणाने जाणारी एकाकिका. तिची गत देखील 'गर्द'-सारखीच. नवे कलाकार, सरधोपट दिग्दर्शन आणि कच्चे लिखाण यामुळे या एकाकिकेचीही वाताहात झाली. यातच या उत्साही कलाकारांची आपले 'लाईव्ह फोटो' आणि व्हिडीओ शुटींग काढायची हौस दाडगी. संपूर्ण एकाकिकाभर ही फोटो काढणारी आणि शुटीग करणारी मडळी रसमंचावरच्या नेपथ्यासारखी वावरत होती.

—मनोहर सोनवणे

## सांस्कृतिक नागपूर

# श्री. दि. वि. गोखले यांची गाजलेली दोन व्याख्याने !

दिनाक २१ आणि २२ एप्रिल रोजी येथल्या महावैकेच्या कला आणि क्रीडा मडळाच्या वतीने धनवटे रग मदिरात महाराष्ट्र टाइम्सचे सेवानिवृत्त सहाय्यक सपादक आणि युद्धशास्त्राचे गाढे अभ्यासक श्री. दि. वि. गोखले याची दोन व्याख्याने आयोजित करण्यात आलेली होती. त्याच्या पहिल्या भाषणाचा विषय होता 'शिवाजीचे नेतृत्व' आणि दुसऱ्या व्याख्यानाचा विषय होता 'पाकिस्तान भारतावर पुन्हा आक्रमण करील काय ?' गोखल्याची ही दोन्ही भाषणे अतिशय गाजलीत. त्याची अनेक कारणे होती. त्याच्या विचारातला रोखठोकपणा नागपूरकराना अतिशयच आवडला. गमत म्हणजे ह्या दोन्ही भाषणाना संयोजकानी अध्यक्ष म्हणून दोन मेजर जनरलची योजना केली होती. दिनाक २१ च्या भाषणाचे अध्यक्ष होते (निवृत्त) मेजर जनरल ए. जी. कानेटकर. ते भूदलाच्या पश्चिम मुख्यालय प्रशासनाचे ब्रिगेडियर-इन-चार्ज होते. बागला देशाच्या युद्धाच्या वेळी 'असाधारण कर्तव्यनिष्ठेबद्दल' त्याना अतिविशिष्ट सेवापदक देऊन त्याचा गौरव करण्यात आलेला होता दिनाक २२ च्या व्याख्यानाचे अध्यक्ष होते (निवृत्त) जनरल मोहोनी. ते तोफखान्याचे तज्ज्ञ समजले जातात. अशा रीतीने प्रत्यक्ष युद्धाचा ज्याना अनुभव आहे अशा सैन्यातल्या लष्करी अधिकाऱ्याची अध्यक्ष म्हणून योजना झाल्याने व्याख्यानाना मोठी रगत आलेली होती. सैन्याबद्दल सर्वसाधारण लोकांना फारच अज्ञान असते अशी खतही जनरल मोहोनी यानी आपल्या भाषणात व्यक्त केली 'एका डिव्हिजनमध्ये किती सैनिक असतात, ब्रिगेड किती सैनिकाची असते ?' जनरलने उघडच प्रश्न श्रोत्याना केला त्याचे उत्तर एकालाही देता आले नाही ! गोखल्यानी ह्याबाबतीत एक किस्सा सागितला. पुण्याला मेजर जनरल पराजपे ह्याना लोक फोन करतात आणि विचारतात 'मेजर घरी आहेत काय ?' सर्वसाधारण माणसाना सैन्यातील पदाबद्दल विशेष माहिती नसते म्हणून पराजप्याना त्याचे विशेष वाटत नाही परतु सौ पराजप्याना मात्र याचा राग येतो त्यावेळी पराजपे त्याची समजूत घालताना म्हणतात, 'जनरल म्हणजे लोकाना सामान्य—कॉमन माणूस वाटत असेल मेजर म्हणजे मोठा. म्हणून ते मेजर पराजपे म्हणतात !'

शिवाजीच्या नेतृत्वावर बोलताना दि. वि. गोखल्यानी शिवाजी महाराजाच्या सर्वांगीण नेतृत्वाची खास वैशिष्टये तेव्हढी सागितली. 'शिवाजीने हिंदवी स्वराज्य स्थापन केले. धर्माचे त्यानी केवळ रक्षणच केले नाही तर सक्तीने धर्मांतर करणाऱ्या चार पोर्तुगीज धर्मगुरूंचा त्यानी शिरच्छेद केला। घोडदळ आणि तोफखाना ही मुसलमानाची शक्तिस्थळे होती. घोडे आणि तोफा चालणार नाहीत असा भाग शिवाजीने लढाईसाठी निवडला. शिवाजीच्या साऱ्या योजना साध्या साध्या होत्या; पण त्यात त्याला यश मिळाले याचे कारण म्हणजे साध्या सैनिकानी त्या अमलात आणल्या. शिवाजीसमोर मुसलमानी अत्याचाराचा प्रश्न होता. आजही परिस्थिती बदललेली नाही किंबहुना मुसलमानांच्या एकाच प्रश्नावर १००० वर्षे लढणारा भारत हा एकमेव देश असावा. शिवचरित्रापासून बोध घेऊन आपण हा प्रश्न कायमचा निकालात काढला पाहिजे. राणासंगापासून आम्ही हा प्रश्न लढवीत आहोत; परतु हा प्रश्न आम्हाला अजून सोडविता आला नाही हे लज्जास्पद आहे. पतप्रधान राजीव गाधींनी हा प्रश्न सोडविला तर त्याचेबरोबर २१ व्या शतकातच काय पण नरकातही आम्ही जाऊ; पण हा प्रश्न सुटणार नसेल आणि राजीव गांधी २१ व्या शतकाऐवजी १५ व्या शतकात आम्हाला परत नेणार असतील तर आम्ही

स्वर्गातही जाणार नाही. ह्याकरिताच आपण शिवाजीची जयंती साजरी केली पाहिजे.

'पाकिस्तान आपल्यावर पुन्हा हल्ला चढवील काय' ह्या दुसऱ्या दिवशीच्या भाषणात श्री. दि. वि गोखले म्हणाले, 'पाकिस्तानच्या ताब्यात असणारा काश्मीरचा भाग मुक्त करणे आणि तिबेटची चीनच्या विळख्यातून मुक्तता करणे हे आपले दीर्घ-कालीन धोरण असले पाहिजे. अगदी प्रारंभी-पासून आपल्या नेत्याच्या डोक्यात 'जागतिक शांततेचे' भूत शिरलेले आहे. आपण आपले व्यावहारिक हित पाहिले पाहिजे असे ह्या नेत्याच्या डोक्यात कधी येतच नाही अमृतसर नजीक आपले रणगाडा पथक बियासच्या पुलाजीक तैनात करावे अशी सूचना आपल्या सेनानींनी केली होती. नेहरूंनी ती सूचना जागतिक शांततेच्या नावाखाली फेटाळून लावली. मध्ये काही दिवस तर सैन्याची संख्या कमी करा अशी चर्चा पार्ल-मेंटमध्ये झाली होती. त्यावेळी '२६ जाने-वारीला प्रजासत्ताक दिनी परेडला तरी सैन्य शिल्लक ठेवाल ना ?' असा प्रश्न चिडून एका सदस्याने केला होता. आपले संरक्षण-मंत्रीही 'व्यावसायिक' नव्हते. त्यामुळे राष्ट्राचे नुकसान होते के. पी एस. मेनन ज्यावेळी स्टॅलिनला भेटण्याकरिता गेले, त्यावेळी तुमचे प्रत्यक्ष लढण्याचे सैन्य किती असा प्रश्न स्टॅलिनने केला. मेनन म्हणाले, आमचे धोरण शांततेचे आणि पंचशीलचे आहे तेव्हा स्टॅलिन हसून म्हणाला, 'हे सगळं खरं हो— परंतु Fighting Force किती ? ह्या प्रश्नाला काही के. पी. एस. मेननला उत्तर देता आले नाही ! कारण त्यांना त्याची माहितीच नव्हती ! डॉ. काटजू काही दिवस संरक्षणमंत्री होते ते म्हणत असत जीवनात आता मला रस नाही. मी मृत्यूची वाट पहात आहे कृष्ण मेनन ह्यांना तर सेनापतीच्या व्यावहारिक ज्ञानाची हुर्ये उडविण्यात एक प्रकारचा आसुरी आनंद होत असे चीन 'डावा' असल्याने तो कधीही हिंदुस्थानवर हल्ला चढविणार नाही अशी त्याची श्रद्धा होती. प्रत्यक्षात मुंग्यासारखे ज्यावेळी चिनी सैनिक नेफामध्ये घुसले त्यावेळी समुद्रासारखे त्यांचे भव्य स्वरूप पाहून मेनन उद्गारले, 'अरे, अशा प्रचंड लाटांनी ते येणार असतील तर केरळपर्यंतही पोहोचण्याला त्यांना वेळ लागणार नाही !' त्यावेळी आपला एक सेनापती इतका संतापला की तो मेननला तोंडावरच म्हणाला की 'आम्ही काय बांगड्या भरल्या आहेत काय ? चिन्यांना पहाडातून खाली उतरुन मैदानात येऊ द्या त्यांना असा धडा शिकवू की पुन्हा ते आक्रमणाची गोष्ट काढणार नाहीत !' पाकिस्तानकडे अण्वस्त्रे येणार असे राजीव गांधी सांगत आहेत येऊ द्यात त्याला काय घाबरायचे आहे ? शस्त्रास्त्रे महत्त्वाची नाहीत ते वापरणारे हात महत्वाचे आहेत प्रसंगी मोडक्या तलवारीनेही लढाई जिंकता येते हे विसरू नका. राष्ट्रात पराभूत मनोवृत्ती निर्माण करू नका उलट आपणच पाकिस्तानची खोडी काढली पाहिजे आणि पाकिस्तानला सरळ केले पाहिजे'

आपल्या अध्यक्षीय समारोपाच्या भाषणात जनरल मोहोनी म्हणाले, 'पाकिस्तान भारतावर पुन्हा आक्रमण करणार काय, असा विषय तुम्ही व्याख्यानाकरिता ठेवला. ह्याऐवजी भारत पाकिस्तानवर हल्ला चढविणार काय असा विषय पाहिजे. आक्रमक वृत्ती तुमच्यात आल्याशिवाय तुमचा तरणोपाय नाही गोखल्यांनी बरोबर सांगितले फाळणीच्या वेळी भारतीय सैन्या-चीही फाळणी झाली. ह्या सैन्याचे पुनर्घटना करण्याचा प्रयत्न हिंदुस्थान आणि पाकिस्तान ह्या दोघासमोर आला. परंतु पाकिस्तान त्याकरिता रडत बसले नाही १४ ऑगस्टला स्वतंत्र झाल्यानंतर ३ सप्टेंबरला पाकी टोळीवाल्यांनी काश्मिरवर हल्ला चढविला. बघता बघता ५००० पाकिस्तानी सैन्य काश्मिरमध्ये घुसविण्यात आले जगात पुरुषार्थाशिवाय तरणोपाय नाही' काश्मीर-मधील पाकव्याप्त प्रदेश सोडविणे आणि तिबेटची मुक्तता करणे हे आपले अल्प-कालीन धोरण असावे. आपले दीर्घकालीन धोरण शांतता प्रस्थापनेचे असावे असेही जनरल मोहनी यांनी सुचविले.

दोन जनरल्स आणि श्री दि वि गोखले यांनी गाजविलेली ही व्याख्याने नागपूर-कराच्या स्मरणात बरेच दिवस राहतील !

—शरदचंद्र

---

# सांस्कृतिक डोंबिवली

## ☐ सौंदर्य स्पर्धा

लायन्स क्लब, रोटरी क्लब इ. सारख्या संघटनाबद्दल सर्वसाधारण माणसाचे सकारण वा अकारण काही समज, गैरसमज आहेत 'हस्तीदंती मनोऱ्यात राहणारे', 'उटावरून शेळ्या हाकणारे', 'आपले व्यावसायिक हितसंबंध जपण्यासाठी एकत्र येणारे', 'टिकाऊपेक्षा दिखाऊ कार्यक्रम करणारे' इ सारखे अभिप्राय ऐकायला मिळतात पण डोंबिवलीच्या ह्या संघटना अनेक समाजोपयोगी कार्य करताना दिसतात एकूण महिला मंडळाबद्दलही अशीच ओरड ऐकू येते 'इनर व्हील' ही रोटरी क्लबच्या सदस्यांची महिला शाखा आहे डोंबिवली-तील रोटरी क्लबमध्ये अनेक सदस्य सामाजिक जाणीवा जागृत असणारे आहेत. त्यामुळेच की काय त्यांची ही महिला शाखा 'इनर व्हील'ही विविध उपक्रम आखताना आणि यशस्वीरित्या पार पाडताना दिसते.

आतापर्यंत 'इनर व्हील'ने अनेक कार्य-क्रम केले त्यात आरोग्य तपासणी, रक्तदान शिबिरे, व्यसनमुक्ती शिबिर, एकांकिका स्पर्धा, भावगीत गायन, हस्ताक्षर स्पर्धा इ. अशा कार्यक्रमासाठी निधी जवळ असणे आवश्यक असते त्यासाठी एक नाटक लावले होते. त्यातून जो पैसा गोळा झाला तो मुदत ठेवीत गुंतविला. त्यातून जे व्याज मिळते त्यातील काही भाग रोटरी क्लबने चाल-विलेल्या मूक बधीर शाळेसाठी दिला जातो आणि काही भाग इनर व्हीलच्या नित्य व नैमित्तिक कामासाठी उपयोगात आणला जातो महिला शाखा असल्यामुळे महिलांच्या जिव्हाळ्याचे, दैनंदिन जीवनात उपयोगी पडणारे कार्यक्रमही आयोजित केले जातात.

अशा ह्या इनर व्हीलच्या कार्यकर्त्यांकडे हिंदुस्तान लिव्हर उत्पादनाचे स्थानिक वितरक श्री खीमजी पालन हे एक योजना घेऊन आले हिं लिव्हरने 'न्यू लक्स' हा लक्स साबणाचा नवा प्रकार बाजारात विक्रीला आणला आहे त्याचा प्रचार आणि

पृष्ठ ३१ वर

# अमेरिकेतून

## □ लहान मुलांच्या शिक्षणासंबंधी

मध्यतरी अमेरिकन शिक्षणमंत्री श्री. बेनेट यानी एका खास समितीतर्फे तयार करून घेतलेला या बाबतीतला ६६ पानाचा अहवाल एका विशेष समारभात राष्ट्राध्यक्ष रेगन याना सादर केला. त्यामुळे या अहवालाला खूपच प्रसिद्धी मिळाली आहे. यात नमूद केलेल्या महत्त्वाच्या बाबी खालीलप्रमाणे आहेत.

१) घरातला शिक्षणक्रम : पालक (आई-वडील) हे मुलाचे सर्वप्रथम आणि सर्वात प्रभावी शिक्षक असतात. मुलाच्या शिक्षणाच्या दृष्टीने पालकाच्या आर्थिक समृद्धीपेक्षा ते आपल्या मुलाना शिक्षणात प्रोत्साहन आणि मदत देण्यात आणि शिक्षणाकरता अनुकूल वातावरण निर्माण करण्यात किती 'समृद्ध' आहेत हे महत्त्वाचे आहे (२) लहानपणापासून लेखन करण्याची सवय : ज्या मुलाना अगदी लहानपणापासून बालवाङ्मयातल्या कथा चित्ररूपाने काढायला, किंवहुना खरडायला प्रोत्साहन दिले जाते ती मुले पुढे जास्त आत्मविश्वासाने, सहजगत्या उत्तम आणि रचनाबद्ध लेखन करू शकतात (३) उच्चार पद्धती ज्या मुलाना लहानपणापासून योग्य उच्चार शिकवले जातात त्याना लिहिलेले शब्द आणि बोललेले शब्द यातील सबधाची जास्त चागली ओळख होते. आणि अशी मुले वाचनात जास्त लवकर प्रवीण होतात. (४) शास्त्रीय प्रयोग शास्त्रीय नियम प्रत्यक्षात कसे काम करतात याचे दर्शन घडवणारे प्रयोग जी मुले स्वत: आखतात आणि करतात ती मुले शास्त्रशिक्षणात जास्त निपुण होतात. (५) गणिताचे शिक्षण अगदी लहान मुलाना सुरवातीला लहान वस्तूचा ( उदा छोट्या मण्याच्या माळा ) वापर करून गणित शिकवले तर ती मुले गणित जास्त लवकर शिकतात. (६) गृहपाठ ज्या विद्यार्थ्यांना शिक्षक नियमित गृहपाठ देतात आणि जी मुले सर्व गृहपाठ नीटपणे पूर्ण करतात ती मुले शिक्षणात जास्त प्रगती करतात. (७) परीक्षा . मुलाची शिक्षणात होत असलेली ( किंवा नसलेली ) प्रगती याचे पद्धतशीर आणि नियमित मूल्यमापन करणे हे विद्यार्थी, शिक्षक, पालक, शिक्षण क्षेत्रातले प्रशासक आणि धोरण आखणारे या सर्वांच्याच दृष्टीने सयुक्तिक ठरते (८) परिणामकारक शाळा: शाळेत दिलेले शिक्षण परिणामकारक होण्याकरता शिक्षकाना उत्तम मार्गदर्शन करणारा मुख्याध्यापक हवा. शाळेमध्ये शिस्तीचे आणि सुरक्षित वातावरण हवे, शिक्षकानी आपल्या विद्यार्थ्यांच्या यशासबधी मोठ्या अपेक्षा बाळगायला हव्या. (९) शिक्षकाचे पर्यवेक्षण शिक्षकाना त्याची शिक्षणपद्धती कशी सुधारेल यासबधी सूचना हव्या असतात, पण त्या सहसा त्याना कोणी देत नाही तेव्हा अशी व्यवस्था शाळामधून हवी. ( १० ) इतिहास इतिहासातला विद्यार्थ्यांचा रस कमी होऊ लागला आहे. शिक्षणक्रमात इतिहासावर जास्त भर न दिल्यामुळे मुलाचे स्वत च्या समाजाच्या आणि देशाच्या सस्कृतीचे आणि पार्श्वभूमीचे ज्ञान कमी होऊ लागले आहे. ( ११ ) परकीय भाषा : परकीय भाषेचे ज्ञान महत्त्वाचे आहे ते मिळवायला शिक्षण लहानपणीच सुरू करावे लागते आणि ते सातत्याने चालू ठेवावे लागते (१२) विद्यार्थीदशेनतरच्या यशाची तयारी औद्योगिक क्षेत्रातल्या तज्ज्ञाच्या मते जी मुले मूलभूत कसबात निपुण असतात आणि ज्याचा कामाकडे बघण्याचा दृष्टिकोन विधायक असतो ती मुले चागली नोकरी मिळवण्यात आणि ती टिकवण्यात यशस्वी होतात.

या अहवालात वर लिहिल्याप्रमाणे आई-वडिलानी मुलाना दिलेले शिक्षणासबधीचे प्रोत्साहन, मार्गदर्शन आणि मदत, इतिहासाचे ज्ञान आणि गृहपाठ याशिवाय नियमित वाचन आणि पाठातर यावर पण भर दिला आहे उदा. पाढे, इतिहासाच्या सनावळी आणि उत्तम साहित्यातले उतारे यामुळे विषय लक्षात ठेवायला आणि समजायला मदत होते. एका आढाव्यानुसार अमेरिकन मुलाची आई सरासरी अर्धा तास आणि वडील १५ मिनिटे रोज आपल्या मुलाबरोबर अभ्यासासबधी बोलण्यात, स्पष्टीकरण देण्यात आणि त्याच्याबरोबर वाचन करण्यात घालवतात– ह्यापेक्षा जास्त वेळ राखून ठेवायला हवा असे अर्थातच तज्ज्ञाचे मत पडले.

हा शिफारसात्मक अहवाल सरकारी खात्याचा असल्यामुळे यावर अनुकूल आणि प्रतिकूल अशा प्रतिक्रिया अमेरिकन शिक्षणतज्ज्ञाकडून व्यक्त झाल्या. काहीच्या मते या अहवालात शिक्षणपद्धतीतला ततोततपणा आणि परिणामकारकता यावर फाजील भर देण्यात आला आहे. शिवाय या शिफारशीचा असा अर्थ होण्याचा सभव आहे की विद्यार्थ्यांनी शिक्षण अक्रियाशील पद्धतीने ( passively ) घ्यावे– विद्यार्थ्यांनी खरे म्हणजे शिक्षणासबधी नेहमी विधायक टीकात्मक दृष्टिकोन ठेवला पाहिजे आणि शिक्षणक्षेत्राशी सबध असलेल्या सर्वांनीच शिक्षणक्रम आणि शिक्षणपद्धती याबद्दल नेहमी सशोधनात्मक वृत्ती ठेवायला हवी. काही जणाच्या मते या शिफारशीमुळे अमेरिकन शाळातील शिक्षणपद्धती आणि शिक्षणक्रम सुधारू शकेल. मुख्याध्यापक, शिक्षक, पालक आणि विद्यार्थी या सर्वांनाच शिक्षणामध्ये आणि शाळामधे सुधारणा घडवून आणायला प्रोत्साहन आणि मार्गदर्शन मिळेल आणि विद्यार्थ्यांच्या आर्थिक परिस्थितीचा त्याच्या शिक्षणातल्या प्रगतीशी सबध नाही अशी त्याची खात्री पटेल या अहवालाच्या १ लाख प्रती शिक्षणसस्थाना आणि शिक्षणक्षेत्रातील व्यक्तीना पाठवण्याकरता छापण्यात आल्या आहेत.

## □ धान्याचा व्यापार करणारी कंपनी आणि शेतीजीवनातल्या समस्या

कार्गिल ही अमेरिकेतील आणि जगातील धान्याचा व्यापार करणारी सर्वात मोठी कपनी आहे. गेल्या एका वार्तापत्रात लिहिल्याप्रमाणे १९८५ मध्ये बऱ्याच अमेरिकन शेतकऱ्याचे जीवन विस्कळीत झाले पण या कपनीची एकूण विक्री मात्र ३२ अब्ज डॉलर्स एवढी झाली. कार्गिल आणि मॅकमिलन या दोन कुटुबाच्या ताब्यात असलेल्या या अमेरिकेतल्या सर्वात मोठ्या खाजगी मालकीच्या कपनीभोवती एक प्रकारचे वलय आहे आणि तिच्या व्यवहारासबधी अत्यत गुप्तता पाळली जाते. गेल्या वर्षी या कपनीने अर्जेंटिनातला स्वस्त गहू आयात करण्याचा प्रयत्न केला त्यावेळेला शेतकऱ्यानी या कपनीविरुद्ध

जोराने आवाज उठवला. शिवाय आमचा गहू स्वस्त भावाने विकत घेऊन ही कपनी फुगवलेल्या किमतीत गहू विकून प्रचड फायदा उठवते अशी पण अमेरिकेतल्या वीस लाख शेतकऱ्याची तक्रार आहे पण या कपनीचे म्हणणे आहे की शेतकऱ्याच्या हितामध्येच आमचे हित असल्यामुळे शेतकऱ्याच्या विरुद्ध असे आम्ही काही करत नाही.

अन्नधान्याखेरीज कार्गिल कपनीचा पसारा खूपच मोठा आहे. धातू, पोलाद, खते इतर पिके अशा वेगवेगळ्या ५० क्षेत्रात या कपनीचा,४६ देशामध्ये व्यापार आहे. यामधे भारतातल्या कापसाच्या व्यापाराशी देखील या कपनीचा सबध आहे) अशा मोठ्या पसाऱ्यामुळे आणि विविधतेमुळे अमेरिकेच्या धान्य निर्यातीत घट आली असली तरी कपनीच्या एकदर नफ्यावर फारसा परिणाम झालेला नाही. सुमारे १२५ वर्षापूर्वी स्थापित झालेली ही कपनी १९७० च्या दशकात इतर देशातल्या टचाईमुळे धान्य निर्यातीत एकदम पुढे आली आणि सर्व जगभर कपनीचे जाळे असल्यामुळे महत्त्वाची आतरराष्ट्रीय राजकीय आणि व्यापारी माहिती या कपनीला तत्परतेने मिळू शकते.

अमेरिकेतल्या शेतात पिकलेले धान्य जगातल्या इतर देशापर्यंत कसे पोचते यातल्या घटनाचा क्रम एक उदाहरण देऊन खालीलप्रमाणे माडता येईल. श्री स्मिथ याचे अमेरिकेतल्या मध्य पश्चिम भागातल्या मिनेसोटा या राज्यात ४८० एकराचे शेत आहे. त्यात ते गहू, मका आणि सोयाबिन पिकवतात. कार्गिल या कपनीचे एक कोठार तिथुन तीन मैलावर आहे (या कपनीची अशी ३४० कोठारे जगभर पसरली आहेत— एका कोठारात सुमारे १ कोटी ६० लाख किलो धान्य साठवता येते) प्रत्येक दिवशी धान्य काय भावाने विकत घेणार हे कार्गिल त्या त्या दिवशी ठरवते. श्री. स्मिथ रोज आधी कार्गिलला फोन करून भाव विचारतात आणि चागला भाव येण्याची कधीकधी काही महिने वाट बघून मग ते कपनीला धान्य विकतात. कपनीच्या अशा या कोठारापासून धान्य ट्रकने किंवा खास फक्त धान्याच्या १०० ते १२५ वाघिणी असलेल्या मालगाडीने मिसिसिपी नदीवरच्या बंदरावर आणले जाते. ही नदी अमेरिकेच्या उत्तर सीमेपासून दक्षिणसीमेपर्यंत वहाते ह्या नदीतून धान्य मोठमोठ्या मचव्यामधून (बार्जेस) १८ दिवसाच्या प्रवासानतर लुईझियाना या दक्षिण सीमेवरच्या राज्यातल्या बदरात पाठवले जाते आणि तिथून मोठमोठ्या जहाजातून हे धान्य जगातल्या वेगवेगळ्या देशात निर्यात होते.

वेस्टफिल्ड, एप्रिल २०, ८६

विजय वि. जोशी
जयश्री वि. जोशी

अहो, येता जाता

# बद्रिनारायणाला जाताना

फिरोझ रानडे

**मी,** बायको व आई बद्रि–केदार, बद्रिनारायणाची यात्रा करून परत आलो. एक मोठी पवित्र यात्रा पार पडली ह्याच आईला फार मोठ समाधान झालं होत. त्यात काही अमगल झालं नाही त्यामुळे त्या समाधानात भर पडली होती. नाशिकला गेल्यावर तिनं मावद म्हणजे जेवण घातले होते. तशी पद्धतच असते म्हणे.

काही दिवसानतर आमची थोरली बहीण दिल्लीला आली तेव्हा तिने बायकोला काही खण की लुगड हळद–कुकू लावून दिलं, त्याच बरोबर आम्हा दोघाना अगदी वाकून घसघशीत नमस्कार केला. ही आमची बहीण माझ्यापेक्षा चागली दहा–बारा वर्षांनी मोठी. त्यामुळे तिने नमस्कार करताच मी सकोचाने 'हे काय, हे काय' म्हणू लागताच ती म्हणाली 'अरे अशीच पद्धत असते. हा नमस्कार तुम्हाला नाही आहे, तुम्ही यात्रा करून आलात त्या यात्रेकरूला आहे.'

मी मनाशी म्हटल काय मजेशीर पद्धत आहेत आपल्याकडल्या. म्हटल तर त्याना अर्थ आहे म्हटल तर त्यात काही अर्थ नाही. पूर्वी ह्या हिमालयातल्या यात्रा फार अवघड होत्या. एकदा गेलेला माणूस परत येण जवळ जवळ अशक्य होत. त्यामुळे त्याकाळी मावद वगैरे घालण ठीक होत. पण आता प्रवास तितका काही धोक्याचा राहिला नाही आहे तरीसुद्धा हे जेवण घालणं वगैरे चालूच राहिल आहे. . ह्या पद्धती म्हणजे अगावरच्या गोदवऱ्यासारखच असत. ते कधी जातच नाही.

आम्ही केदार आणि नारायणाची यात्रा करून आल्यानतर काहीतरी दोन वर्षांनी मी नाशिकला सुट्टीवर म्हणून गेलो. त्याचवेळी आमची काकू पण तेथे आली होती. ही काकू म्हणजे आम्हाला आईहूनही जास्त आई होती.

'ताईला तेवढी बदिकेदार आणि नारायण करून आणलस. पण माझ मात्र राहून गेल.' काकू कुरकुरत म्हणाली, 'त्याचवेळी येणार होते पण नेमक ह्याच आजारपण निघाल.'

'अग, मग आता कुठे गाड्या बद पडल्या आहेत ?' मी नेहमीच्या उत्साहाने म्हणालो, 'येते आहेस का ह्या वर्षी ? मी घेऊन जातो तुला आणि यात्रा करून आणतो. अगदी सगळे बद्रि घडवून आणतो.'

'खरच म्हणतो आहेस की आपल . ' काकूला मी खरच तिला घेऊन जाईन ह्याच्यावर विश्वास बसेना. दोन वर्षापूर्वीच मी त्या अवघड यात्रा करून आलो होतो त्यामुळे ती सशयी झाली होती.

'खरच म्हणजे ?' मी म्हणालो, 'अगदी खर आम्ही प्रभु रामचद्राच्या भूमीतली माणस आहोत. जान जाये पर वचन ना जाये...'

'बोलो प्रभु रामचद्र की जय !' मुलानी माझा चरण पुरा केला.

'ह्या मुकुदावर विश्वास ठेवण म्हणजे . ' परत सशयी काकू तेव्हा आईन माझी भलावण केली

'अहो म्हणतो आहे तर नेईल तुम्हाला तो. मला हा यात्रा घडवेल अस कुठ वाटल होत ? पण काळ्या रामाच्या इच्छेन सगळ व्यवस्थित झाल.'

आता कुठे काकूचा विश्वास बसला. मग काकूनी दिल्लीला कोणत्या महिन्यात यावं, त्याच्या आधी किती दिवस याव वगैरे आम्ही पक्क केलं.

त्याप्रमाणे काकू दिल्लीला आली. काकू वयाने बरीच असली तरी काटक व चुटचुटीत होती. त्यामुळे प्रवास तिला झेपेल किंवा नाही असा प्रश्नच निर्माण झाला नाही. ठरल्याप्रमाणे आम्ही रात्रीच्या गाडीने

निघालो व सकाळी हरिद्वारला पोहोचलो. तेथल्या हृषिकी पौडीवर येताना आंघोळ करायचं ठरलं होतं म्हणून तडक हृषिकेशला गेलो व बद्रिनारायणाची बस पकडून मार्गाला लागलो.

संध्याकाळपर्यंत जोशी मठला जायचं व ह्याच बसनं दुसऱ्या दिवशी सकाळी नारायणाकरता निघायचं व तेथे संध्याकाळी पोहोचायचं असा कार्यक्रम होता.

बसमध्ये सगळ्या गावांचे व सगळ्या प्रांताचे लोक होते. पण सगळ्यात मोठा ग्रुप होता, तो म्हणजे पंधरा–वीस राजस्थानी लोकांचा. फारशा उच्च आर्थिक गटातले ते नव्हते. त्यांचं खाणं–पिणं, वागणं, त्यांच्या लहान मुलांचं ते हगणं–मुतणं वगैरे पाहून वाटलं की काय खेडवळ व मागास लोकांशी गाठ पडली आहे. आता दोन दिवस ह्याच लोकांबरोबर रहाणं आहे, ह्या कल्पनेनंच माझं मन गढूळ झालं.

जोशी मठापर्यंतचा प्रवास चांगला झाला. रात्री तेथे मुक्काम केला व सकाळी–सकाळी पुढे निघालो. काही तरी बारा–साडेबाराची वेळ असेल. एकाएक आमची बस थांबली, कारण पुढल्या बसेस थांबल्या होत्या. ड्रायव्हर तातडीनं खाली उतरला, पुढे जाऊन चौकशी करून आला व परत येऊन सांगू लागला, आता पुढे जाण्याचं काही खरं नाही. कारण लॅण्ड–स्लाईड होऊन वरचा सगळा डोंगर घसरून रस्त्यावर अगदी हत्ती एवढाले मोठे दगड येऊन पडले होते. ते दगड–धोंडे बाजूला झाल्यावर आम्ही पुढे जाणार होतो. त्या सगळ्याला किती वेळ लागेल हे कोणीही सांगू शकत नसत. सात–आठ तास किंवा जास्तही. ड्रायव्हर वगैरे लोकांना अशा गोष्टींची सवय होती. ते उतरून आपसात गप्पा व चहापाणी करू लागले.

आम्ही प्रवासी मंडळी मोठ्या चिंतेत पडलो. सुदैवाची गोष्ट म्हणजे आम्ही खेडेगावाजवळ अडकले गेलो होतो. त्यामुळे तेथे चहाचं दुकान व त्याला लागून रहाण्याकरता ओसऱ्या होत्या. सगळेजण उतरून आपआपली रहाण्याची सोय करू लागले. जेवणाचं बघू लागले. मी आणि काकू अशाच एका पडवीत येऊन बसलो. ह्या पडव्यातून सतरंज्या वगैरे घातलेल्याच होत्या.'

आमच्या गाडीत होती ती गावंढळ राजस्थानी माणसं आमच्या समोरच्या पडवीत आश्रयाला आली होती. आम्ही आमच्याबरोबर दशम्या आणल्या होत्या, त्यामुळे आम्हाला काही बनवायचं असं नव्हतंच. दशम्या खाऊन आम्ही चहा घेत होतो.

त्या राजस्थानी लोकांकडे लक्ष गेलं तर त्यातील पुरुष स्वैपाकाला लागले होते. कोणी कांदे–बटाटे कापत होते, एकजण कणिक मळत होता, दोघेजण तीन दगड ठेवून चूल पेटवावयाचा प्रयत्न करत होते. त्यांची बायका मंडळी निवांतपणे पडली होती. आया आपल्या लहान मुलांना दूध पाजत होत्या.




काकूचं खाऊन व चहा पिऊन झाल्यावर ती त्या बायकात गप्पा–गोष्टी करायला म्हणून गेली व मी काही पुस्तकं काढून वाचत पडलो. काकूला मराठीशिवाय दुसरी भाषा येत नव्हती व त्या राजस्थानी बायकांना त्यांच्या भाषेशिवाय दुसरी काही भाषा येत असण्याचा सुतराम संभव नव्हता. तरी काकू त्यांच्याशी अगदी रंगून जाऊन बोलत होती. एकमेकांच्या भाषा येत नसताही गप्पा मारण्याचं कौशल्य फक्त बायकांतच असतं. त्या पुरुषांचं स्वैपाक होणं होत आलं, तेव्हा काकू त्यांच्यातून उठून परत आली.

'काय ग काकू, हे काय प्रकरण आहे?' मी काकू परत आल्या आल्या विचारलं, 'ही पुरुष मंडळी आपली स्वैपाक करताहेत आणि ह्या बायका मात्र विश्रांती घेताहेत. असं पूर्वी कुठे पाहिलं नव्हतं.'

'अरे त्यांच्यात तशी पद्धतच आहे म्हणे,' काकू माझ्याजवळ येऊन बसत म्हणाली.

'काय पद्धत आहे?' मी विचारलं, 'जगावेगळी पद्धत दिसते आहे ही.'

'अरे, मलाही आश्चर्य वाटलं. म्हणून मी त्यांना विचारलं. राजस्थानी लोक प्रवासात व असे यात्रेत वगैरे असले म्हणजे पुरुष मंडळीच सगळा स्वैपाक करतात. बायकांना मुलं–बाळं बरोबर असल्यामुळे प्रवासात जास्त त्रास होतो म्हणून ही पूर्वीपासून चालत आलेली पद्धत आहे म्हणे.'

किती समजूतदार पद्धत आहे नाही, ह्या राजस्थानी लोकांची आणि ह्यांना मी अडाणी आणि मागास समजत होतो! □

### बाबा आमटेंबरोबर पंजाबात ( ३ )

# यहाँ आतंकवादी कोई नही थे, सब बनाये गये....

जगदीश गोडबोले

अंबाल्याला 'भारत जोडो' यात्रेत सामील झाल्यापासून मला वेध लागले होते अमृतसरचे सुवर्णमंदिराचे. मीच कशाला यात्रेत सहभागी झालेल्या प्रत्येकाच्याच मनात अमृतसर – सुवर्णमंदिर झळाळत असावे. प्रत्यक्ष चेंडू टाकण्यापूर्वी हॉल–गिलख्रिस्त जवळ–जवळ साइट–स्क्रीनपासून धाव घेत, तद्वतच कन्याकुमारीपासून स्टार्ट घेतलेल्या यात्रेची, यात्रेच्या विचाराची–उद्दिष्टाची खरी 'डिलिव्हरी' तिथेच होणार होती. पण आनंदपूरसाहिब आणि शक्तीमंदिरातील एकूण अनुभवानंतर सर्वांनीच धर्म या प्रकरणाचा भयंकर धसका घेतला होता. *'ना को वैरी, ना बेगाना, सकल संग हमको बन आयी'* अथवा 'अव्वल अल्ला नूर उपाया, कुदरतके सब बंदे, एक नूर ने सब जग उपजा, कौण भले को मंदे' असं भजन माळा जपणारे बंदे, प्रत्यक्षात गरळ ओकताना बघून धर्म या गोष्टीबद्दलची माझी उरली–सुरली श्रद्धा उडत चालली होती. धर्म ही अफूची गोळी नसून जहाल विषाची कूपी आहे अशी ठाम खात्री होत चालली होती, पण मध्येच गुगली टाकली बियास नदीकाठच्या 'राधास्वामी सत्संग व्यास'ने.

आमचा त्या रात्रीचा पडाव कुणा एका राधास्वामीजींच्या मठात असेल आणि एका रात्रीपुरता परस्पर सत्संग घडला तर बिघडते कुठे अशी माझी धारणा होती. पण हा सत्संग म्हणजे एक महाप्रचंडच प्रकरण निघाले. आश्रमाच्या कमानीतून आमच्या काफिल्याने आत प्रवेश केला मात्र आणि दुतर्फा हजारो लोक स्वागताला उभे. (बसची वाट बघत थांबलेले ते यात्रेकरू होते हे नंतर समजले!) आखीव–रेखीव नेटके रस्ते. दुतर्फा भाविकांना रहाण्यासाठी बांधलेल्या फ्लॅटवजा धर्मशाळा वा तंबू. एका वेळी लाख लोक बसू शकतील असा महाप्रचंड लंगर. प्रार्थना–स्थळही तसेच. सर्वात आश्चर्याची गोष्ट म्हणजे सर्वत्र कमालीची स्वच्छता. दोन दिवसापूर्वीच भंडाऱ्याला लाखो भाविक लोटले होते. या पार्श्वभूमीवर ही स्वच्छता तर फारच अस्वस्थ करू लागली. पलशाला पाणी आले वा कंडक्टरने सुटे पैसे आपणहून परत केले की मला फारच बेचैन व्हायला होते. तीर्थक्षेत्रातील स्वच्छतेचे तसेच. आम्हाला प्रेमाने खाऊ घातलेल्या बिस्किटाच्या पुडयाचा कागद मी वैतागून सर्वात स्वच्छ जागी फेकला, तर एका पापात्म्याने तो लगेच उचलला. वरती परत 'आम्हाला सेवेची संधी दिलीत. थोर तुमचे उपकार'– हे भाष्य. नुस्ती स्वच्छता नाही तर सेवेतही तीच उत्स्फूर्तता–तत्परता. अंगावर गरमागरम पाणी ओतेपर्यंत साबण हजर. डोके पुसेपर्यंत तेल समोर. सायकलीची मरम्मत करणाऱ्या सरदार–बापलेकांनी तर कमालच केली. आल्या–आल्याच ते सायकलीच्या तेल–पाण्याला अशा लगनने भिडले की एखादी माय पण आपल्या लेकीची वेणी–फणी एवढ्या प्रेमाने करत नसेल. माझ्याकडे सायकल नाही, मी जीपसवार आहे म्हटल्यावर तो कनवाळू सरदार अगदी सहज म्हणाला, 'अजि, गड्डी हुई तो क्या, उसकी भी मरम्मत करेंगे!'– सेवा अशी जेव्हा पोटातून येते तेव्हा त्या पत्थराच्या परमेश्वरालाही पाझर फुटत असेल.

दुपारभर आश्रमाच्या परिसरात गरागरा फिरत होतो. सर्व जाती–पाती–प्रांताचे लोक भेटत होते. अगदी आपल्या चाकणच्या पलिकडच्या खेड्यातूनही चांगले पाच–पन्नास यात्रेकरू आले होते. प्रार्थना–प्रवचन ऐकायचे आणि आपल्याला पाहिजे ते काम करायचे कोणी चार्टर्ड अकौंटट हातात खराटा घेऊन रस्ता साफ करत होता, तर कोणा गडगंज धनिकाची बायको लंगरमधील प्रचंड भांडी घासत होती सर्व स्वयंस्फूर्तीने. आपल्याला पाहिजे त्या कामासाठी नाव नोंदवायचे आणि या खऱ्याखुऱ्या सत्संगाला लागायचे. बिनबोभाट एकूण कारभार बघितल्यावर, या कारभारामागील करवित्या धन्याला वा स्वामींना बघायची भयंकर उत्सुकता आम्हाला लागली. संध्याकाळी तोही योग आला.

## संतजींवर श्रद्धा

जुजबी सुरक्षा–तपासणी झाल्यावर (इथेही आतंकवाद्यांचा खतरा होताच) आम्ही स्वामी चरणसिंगांच्या निवासस्थानाच्या बागेत प्रवेश केला. बाबा जयमलसिंगानी सुमारे शंभर वर्षांपूर्वी स्थापन केलेल्या 'राधास्वामी सत्संगाचे' स्वामी चरणसिंग तिसरे गुरु खालसा पंथीय गुरु गोविंदसिंगांना शेवटचा गुरु मानतात. राधास्वामी–पंथियांची जिवित गुरु–परंपरेची पद्धत आहे. सहाजिकच कट्टर खालसा पंथियांचा स्वामीजींवर राग. प्रसंगी जिविताला धोकाही. पण स्वामीजींना बघितल्यावर या भल्या माणसाचे कोणी बुरे चिंतीत असेल असं वाटत पण नाही. सहा फूट उंची, भरदार शरीर, प्रसन्न सोज्वळ चेहरा. सुरुवातीचे सोपस्कार झाले, 'आंतरभारती' गीत झाले. बाबांचे भाषणही झाले. पण हा महात्मा एक शब्दही बोलेना. अगदी विनंती करूनही बोलेना नुसते आपले प्रसन्न हास्य. निरोपादाखल नमस्कार करून उठला देखील. आम्ही एवढे चांगले तावडीत सापडल्यावरही या भल्या गृहस्थाने चार शब्द-

निदान उपदेशामृतही पाजू नये ? काहीतरी अघटित घडत होते एरवी सकाळ–दुपार–सध्याकाळ जो मिळेल तो आम्हाला एकीचे–बधुभावाचे डोस पाजत होता. हाती फक्त 'माईक' येण्याचाच अवकाश. सगळेच माईकचे लाल वा मायकेल ! मी मनापासून आशीर्वाद दिला 'स्वामीजी तुम्हाप्रत कल्याण असो !' खरोखर धर्म हे काय आहे विष की अफूची गोळी ? राष्ट्रीय महामार्ग क्रमाक एक वरील किलोमीटर्सचे दगड भराभर मागे पडत होते अमृतसर चाळीस किलोमिटर्स, अमृतसर पचवीस किलोमीटर्स. पूर्वीचा हा शेरशहा सूरी मार्ग. रस्त्याच्या दुतर्फा झाड वगैरे लावणारा तोच तो शाळेच्या इतिहासातील असूर ! पार पेशावरपर्यंत जाणारा पण तूर्तास सगळे रस्ते अमृतसरपर्यंतच जाणार आणि तिथेच कुठणार ! अमृतसर जसजसे जवळ येत होते तशी मनात आणखी आणखी हुरहुर दाटत होती. तिथे काय होणार ? कसे आगत स्वागत होईल? स्वागत –बिगत सोडा, पण लोक बोलतील का आपल्याशी ? जवळ तरी येतील का ?

पण लोक–त्यातूनही सर्वसामान्य लोक या अजब गोष्टीचा काही थागपत्ता लागत नाही. पजाबमध्ये प्रवेश केल्यावर सुरवातीला सभेला आजू–बाजूला लोक जमायचे, पण जरा साभाळूनच. बोलायचेही जपूनच. त्यामुळे अमृतसरच्या आसपास लोक आमच्या वाऱ्याला तरी उभे राहतील की नाही अशी शका होती, पण खलशियान, जदियालागुरू-मानराला–दोबुर्जी एका मागून एक गाव आम्ही पार करत होतो आणि लोकाचा जमाव आणखी–आणखी मोठा होत होता. जोर–जोरात नारे लावत होता भरभरून लस्सी पाजत होता. भाषणाना गर्दी करत होता. आमच्यातील उज्जैनची कल्पना परूळकर समूहाची फर्डी वक्ती. जवानीचा जोश आणि वर शेरो–शायरी. त्यामुळे खूप लोकप्रिय. त्यामानाने यदुनाथ–बाबाचे भाषण साधारण बाबा तर असबद्ध भाषणाबद्दल प्रसिद्धच आहेत. सुरवातीला ते स्वत.च तसे खुल्ले सागून टाकतात उगाच दुसऱ्या कोणी खुसपट काढायला नको. पण बाबाच्या हिंदीने बबई के हिंदी का भी टाग तोड दिया एकदा विधास्त म्हणाले 'मेरे पाय लटपट कापे–' पण एक गोष्ट मानायला पाहिजे 'अतिरेकी' वा 'बियातसिंग' सबधी बोलताना शब्दात कसूर नाही वा फेरफार नाही. अबाला–चडीगडच्या भाषणात बियातसिगचा उल्लेख 'दुर्जन' व निरपराधी लोकाची हत्या करणाऱ्या अतिरेक्याचा उल्लेख 'पिसाळलेली कुत्री' (पागल कुत्ते) म्हणून केला होता. वाटल होतं अमृतसर जवळ आल्यावर शब्द जरा सबुरीने येतील, पण शब्दाचे तेज तेच. गुजराथमध्ये आरक्षणाच्या प्रश्नावर अशी स्पष्ट प्रकट भूमिका न घेतल्याबद्दल अनेक साथिदाराची नाराजी ऐकून होतो, त्या पार्श्वभूमीवर हा अनुभव सुखद' होता. लोकाना कितपत भिडते हे जाणून घेण्याचा मी प्रयत्न करत होतो. बियातसिगची उघडबाजू घेणारा कोणी भेटला नाही, पण संतजीवर (भिंद्रानवाले) निसशय लोकाची अपरपार श्रद्धा आहे. रवैय्या गावी मी जरा तिरकसपणे हा विषय काढताच मनिदरसिग नावाचा एक दुकानदार मला आपल्या दुकानात घेऊन गेला आणि समजूत काढावी तसं म्हणाला 'आजचे देशद्रोही कदाचित उद्याचे देशभक्त ठरतील. काळच ते ठरवेल पण एक लक्षात ठेवा, सतजी फार नेक माणूस होता. सरळ होता, खरा धार्मिक होता. या राजकारण्यानी त्याला सुरवातीला पाहिजे तसा वापरला पण कट–कारस्थानाचा उबग येऊन त्याने स्वत चा मार्ग चोखाळला, तेव्हा त्याला बदनाम केल. शेवटी गोळी घालून मारल–'

'मगर वह तो अपने करतूत से–'

'जी किसकी करतूत ? वह तो तुम्हारे दिल्लीवालोकी करतूत' सतजीको कोई चारा नही रखा. रास्ता नही रखा. आखीर कुत्तेको भी गोली मारती है, तो उसे पागल कहकर.'

अमृतसरच्या वेशीवरचे स्वागत तर आणखीनच जोरदार. कमानी, हारतुरे वगैरे. लगेचच डी. ए. व्ही. गर्लस कॉलेजमध्ये कार्यक्रम–खाना–प्राध्यापक वर्ग–विद्यार्थिनी झटून काम करीत होत्या. अनु मेहरा या लाघवी मुलीने आपल्या सख्यांसह खास पजाबी खटकेदार गाण्याची मैफिलच जमवली पण आमचे लक्ष होते पुढच्या खालसा कॉलेजमधील कार्यक्रमाकडे. खरी कसोटी तिथे होती. कारण खलिस्तानवादी विद्यार्थ्यांचा तो बालेकिल्ला असल्याच समजल होत. आम्हाला तिथे घेऊन जायला बसेस येणार अस समजल, म्हणून आम्ही वाट बघत बसलो. पण बसेसचा पत्ताच नाही. सध्याकाळी परत रोटरी–लायन्स व जोडीला 'इनर व्हील' वाल्याचा कार्यक्रम. म्हणजे याचा अध्यक्ष बोलला तर लगेच त्याचा उपाध्यक्ष आणि आणखी त्याच्या सेक्रेटरीचा बोलण्याचा प्रदसिद्ध हक्क. 'भारत जोडो' राहिले बाजूला पण आपण एकाच व्यासपीठावर एकत्र कसे आलो याचेच खाजगीत कौतुक ! शेवटी एक साथीदार वैतागून म्हणाला, 'शुरू–शुरूमें कुछ जनसपर्क हुआ, उसके बाद यही लायन–सपर्क चल रहा है. हमे क्या सिर्फ सायकल चलाने और दिखाने के लिये लाया गया है–'

## सुवर्णमंदिराकडे

मी तरी काय बोलणार ? माझ्यासारख्य आयत्या वेळेला आलेल्या माणसाला शहाण, पणाच्या चार गोष्टी सागणे–करणे सोपे होते सयोजकाना खऱ्या अडी–अडचणीना सामोरे जावे लागत होते. पण तरी एक गोष्ट मात्र नक्कीच जाणवत होती की, मार्गावरचा जनसपर्क (तोही घटकापुरता) सोडला तर यात्रिकानी गटागटानी शाळा–कॉलेज–तरुण/महिला मडळाशी सपर्क–सवाद साधण्याची जी मूळ कल्पना ती मागे पडली होती. कदाचित पजाबमध्ये सुरक्षितता हे त्याचे कारण असेल, पण शेवटचा मुक्काम गाठणे हेच दुर्दैवाने ध्येय बनत चालले होते. मात्र दिवसभराची कसूर रात्री सुवर्ण मदिरातील रामदास सराय' (धर्मशाळा) मध्ये केलेल्या मुक्कामाने भरून निघाली.

केंब्रिज कॉलेजमधील खाना आटपून आम्ही सुवर्णमदिराकडे निघालो तेव्हा रात्रीचे नऊ वाजून गेले होते. आम्हाला वाटलं होत, सध्याच्या स्फोटक परिस्थितीत रात्री सर्वत्र शुकशुकाट असेल, पण त्यामानाने रहदारी–गर्दी सर्व काही सुरळीत होते जागोजागच्या आइसक्रीम पार्लरमध्ये लोक गरम वातावरणातल्या थडगार आईसक्रीमची मजा चाखत होते सुवर्ण मदिराच्या अगाला आल्यावर मात्र गर्दी तुरळक झाली आणि सर्वसामान्य शहरवासीयाची जागा मिलिटरीच्या जवानानी घेतली. सुवर्णमदिराच्या

बाहेरील परिसराला त्यानी घातलेले कडे ओलाडून आम्ही मदिराच्या समोरच्या भागाकडे निघालो. नकळतच मनावर एक विचित्र दडपण आले. एखादा अतिरेकी बदुक–बिंदूक घेऊन चाल करून येतो की काय असे वाटू लागले. पण समोर बघतो तो सरदारके दो बच्चे दिव्याच्या प्रकाशात मजेत बॅडमिंग्टन खेळत होते. आत सुवर्ण-मंदिरातही राजकारणी–धर्मकारण्यानी एक जीवघेणा खेळ माडला होता. पण या चिमुरड्याना त्याची कल्पनाही नसावी. ते आपल्याच लुटुपुटूच्या हार–जीतमध्ये रमले होते

सुवर्णमदिराच्या मुख्य प्रवेशद्वाराशी न जाता आमचा काफिला बाजूच्या गल्लीतून गुरू रामदास सरायकडे आला. 'ऑपरेशन ब्लू स्टार' च्या वेळी लोगोवाल–तोहरा वगैरे मडळी याच्या शेजारच्याच दुसऱ्या धर्मशाळेत होती. मध्ये मदिर–परिसरातीलच एक रस्ता आणि पलीकडे प्रत्यक्ष मदिराकडे जाणाऱ्या पायऱ्या.

रामदास – सरायच्या परिसरात प्रवेश केला मात्र आणि तगडे शीख तरुण आडवे आले. त्यानी सुरुवातीलाच सर्वांना सुनावले 'बीडी-काडी, तबाखू, दारू, बिरू काही असेल तर बाहेर काढून ठेवा. नाहीतर परिणाम वाईट होईल.' आत सिगरेट ओढण्याचा प्रश्नच नव्हता, पण अनेकाच्या खिशात आदतसे मजबूर म्हणून राहिलेल्या बिडघा–काड्या होत्याच माझ्या थैलीत तर पाइप आणि तबाखूची दोन अख्खी पाकीटे ! आता बाहेर काढावी तरी पचाईत नाही काढली तरी पचाईत. आम्ही आपल्या नुस्त्या माना डोलावल्या. परत फर्मान सुटले 'अगर कोई बिडी-सिगरेट-वाला निकला तो–' हत्यार बद तरुणाची गर्दी वाढत होती.

क्षणात ताडले इथे प्रत्यक्ष बिडी-काडी-पेक्षा विचारणाऱ्याच्या इज्जतचा सवाल आहे. मी एका सिगरेटच्या पाकिटात पान ठेवले होते झटकन् टोपी काढली आणि त्यात ते सिगरेटचे पाकीट टाकून पब्लिक-मध्ये फिरवली. पाच-दहाजणानी माझ्या नावाने बोट मोडत आपला मूल्यवान ऐवज त्यात जमा केला, मीही 'काय ही घाण–' अशा आविर्भावात तो बाहेरच्या उकिडघा-वर फेकून दिला. (उरलेल्या प्रवासात मला त्याची दामदुप्पट परतफेड करावी लागली ! )

काय गमत असते मागे इदिरा गाधीचा खून झाला त्यावेळी आम्ही नागपूर-आनदवन प्रवासात होतो. आमच्या पुढे आमची गाडी अडवली समोर पुलावर-रस्त्यावर मोठमोठे दगड-पाइप. आमच्या धाकट्या कळसाणीला घेऊन गाडीतून उतरून मी तसाच पुढे गेलो आत्तापर्यंत असं पुढे येण्याच 'धाडस' कोणीच केल नव्हत शिवाय सोबत लहान मूल त्यामुळे हातात दगड-बिगड घेऊन उभ्या ठाकलेल्या मडळीनाही काय करावे धड कळेना मग त्यानी मलाच झापायला सुरुवात केली जणू काय इदिरा गाधीचा खून मीच केला होता. पण त्या कल्लोळातून एक गोष्ट स्पष्ट झाली की पब्लिकला आपला सताप व्यक्त करायचा आहे आणि त्या मधल्या एका माणसाला दुसऱ्या कोणा अगोदर आपली नेतेगिरी सिद्ध करायची घाई झाली आहे. माझ्या मागून आलेल्या एका माणसाने युगत काढली तो त्या पुढाऱ्याला आदराने म्हणाला 'आपल्या अध्यक्षतेखाली आपण श्रद्धाजलीची सभा घेऊया.' तोपर्यंत आमच्या गाडीमागे इतरही काही गाड्या–एस टी. मधून आलेली प्रवासी मडळी उतरली होती. पोरी–बाळीही होत्या पुढारीसाहेबाना कल्पना एकदम पसत अध्यक्षाचे नाव सुचवणे, अनुमोदन देणे वगैरे सर्व रीतसर झाले पुढारीमहाशयानी चागले पाऊण-तास भाषण झोडले, पण दिवसभरची रखडपट्टी तास-दीड तासात खतम्. कारण भाषणाची हौस भागल्यावर दहा मिनिटात रस्ता मोकळा ! असो आताही तसच काहीतरी घडेल या आशेत मी होतो, आमच्या पाप–क्षालनावर पहिले भिडू समाधानी होते. या आनंदात मी पुढे सटकणार, तेवढ्यात दुसऱ्याने अडवले–'नगे सर जाते हो, शरम नही ?' च्यायला या भानगडीत टोपी हातातच राहिली होती. झटपट टोपी डोक्यावर चढवली, पगडी सलामत तो शिर पचास !

## बस्स करो चाचा !

सरायमध्ये पोहचून अर्धा तास झाला तरी आजूबाजूला जमलेल्या तरुणाची आक्रमक भाषा, वृत्ती काही कमी होईना. मी सहज विचारले की, 'अब हरमदीरसाव मदिर खुला होगा ?' तो ताडकन् उत्तर मिळाले 'तुम्हारे देवले जैसे हमारे भगवान सोते नही' किंवा 'कहा है तुम्हारा बाबा आमटे ? आमटेको आम्लेट बना डालते–' एक भिडू तर नगी तलवार उपसूनच बाबाच्या खोलीत त्याच्याशी वाद घालत होता. पण सुरुवातीच्या या उद्रेकानतर मात्र मडळी शात झाली 'आयीये भाईसाब, बताते है आपको गोळीके निशाने' म्हणून ऑपरेशन ब्ल्यू स्टारच्या रणधुमळीच्या निशाण्या दाखवायला इथे-तिथे ओढून घेऊन जाऊ लागले. ही पोर साधी-सरळ होती. बसवतसिंग नावाचा बुढा मात्र महाबिलदर होता. बाबाच्या खोलीत यानेच सुरुवातीला राणा भीमदेवी सूर लावला होता. आसव गाळली होती आणि बाहेर आल्यावर हळूच बाजूच्या पोराना विचारल होत 'कैसा लगा मेरा भाषण ?' आत्ताही त्याचा लाखो लोगोको मारा– लाखो सैनिक लाये– असा लाखाचा पाढा चाललाच होता सैनिकानी आपटून-आपटून मारलेल्या लहान मुलाच्या रक्त-मासाची खूण म्हणून भिंतीवरच्या काही निशाण्याही तो दाखवत होता. मला त्याच्या 'कठाकारी' चा उबग येत चालला होता, तेवढ्यात दर्शनासाठी आलेला दुसरा एक सरदार आपणहून पुढे येत म्हणाला, 'बस्स करो चाचा तुम्हारी बाते यह लोग तो अमत (शाती) चाहनेवालेही हैं. उनको दर्शन तो कराके लावो !' बसवतसिंग आमचा लाखाचा जथ्था घेऊन पुढे निघाले !

मदिराच्या पायऱ्या चढून आत प्रवेश केला मात्र मद प्रकाशात अमृत सरोवराच्या जलाशयात बिंबा-प्रतिबिंबाचा खेळ माडून ध्यानस्थ झालेल्या हरमिररदसाहेबानी जीव गोठावलाच. ताजमहाल काय, सुवर्णमदिर काय किंवा एखाद्या साजवेळी नदीच्या डोहात उतरून आलेले अवघे आकाश काय, असा आरस्पानी खेळ माडला की बघणाऱ्याचा जीव हल्लख. तासन्तास बसावे आपल्याच मनाच्या बिंब–प्रतिबिंबाचो खेळी बघत !

किती वेळ बसलो होतो देव जाणे. क्षण दोन क्षण, तास दोन तास, युग–युगाती युग काय असेल ते असो पण आमच्या बसवत चाचाना माझे सुख काही बघवले नाही मला वळे–बळेच उठवून ते 'ऑपरेशन ब्लू स्टार' मधील सैन्याच्या चढाईच्या खाणाखुणा

दाखवू लागले. 'देखो S देखो यहाँसे लाखो टँक आये–' मला त्यात काडीचाही रस नव्हता. सारखं तोंडावर येत होतं चाचाजी, फार नाजुक जागेचे घाव आहेत हे. त्याच्या वेदना समजू शकतो पण हे असे प्रदर्शन माडू नका. अपराध कोणाचाही असो पण केवळ शीख धर्मीय नाही, भारतीय नाही, तर माणूस म्हणून जगू पहाणाऱ्या प्रत्येकाच्याच उरावरील घाव आहे हा मग तो येशू ख्रिस्ताच्या काळजात ठोकलेला खिळा असो वा सुवर्ण मंदिरात पडलेला तोफेचा गोळा असो. पण हा 'माणूस' त्याच्याही पलिकडचा होता.

## रोख दिल्लीश्वरांवर

हरमिंदरसाहेबाच्या समोरच अकाल तख्त आहे. 'ऑपरेशन'मध्ये त्याची खूप पडझड झाली, म्हणून इंदिरा गांधींनी बाबा संतासिंगाकडून 'कारसेवा' घडवून त्याची डागडुजी केली आता फेडरेशन व दमदमी टाकसाळवाल्यांनी फितुराची 'कारसेवा' उखडून नवी कारसेवा आरंभली आहे! तख्तासमोर दोन उंच खांबावर X च्या आकाराचा एक जॉईंट आहे हे काय? म्हणून चाचाजींना विचारल्यावर तख्त आणि मंदिराकडे आळीपाळीने बोट दाखवत ते म्हणाले 'यह तो शक्ती और भक्ती का जॉईंट है–' 'प्रीतीका जॉईंट कही निकल तो नही गया–' मी न रहावून मध्येच विचारलं. म्हातारा माझ्याकडे पाहून नुस्ताच हसला. अशी माणसं दोनदा हसतात. काहीच न कळल्यामुळे वा कळून काहीच न समजल्यामुळे!

मंदिराला भरपूर ओवऱ्या आहेत आतल्या बाजूला खोल्या भुयारही आहेत म्हणतात. या ओवऱ्या भुयारातूनच जोरदार मोर्चाबंदी झाल्याचे एक मित्र हळूच माझ्या कानात कुजबुजत होता. चाचाजींच्या ते लक्षात येताच ते म्हणाले, जाओ जाओ अंदर जाके देखो, कहीं हमने तोप–बंदूके छिपायी है–' 'छं असं कसं असेल' असं म्हणत आमच्यातील काही जण हळूच खोल्या-खोल्यातून डोकावून आले अर्थात याला काही अर्थ नव्हता, कारण शस्त्रसाठा असलाच तरी तो काही विजयादशमीच्या पूजेसारखा मांडलेला थोडाच असणार. मला मात्र ओवऱ्यातून झोपलेल्या यात्रेकरूसारखे गार फरशीला पाठ देऊन मस्तपैकी ताणून द्यायचा मोह झाला होता पण हिंमत झाली नाही कारण कितीही गप्पा झाल्या तरी परस्पर संशय-भीती अजून निवळली नव्हती. रात्री लघवीला उठलो तरी फट् म्हणता ब्रह्महत्या. काय दुर्दैव आहे मंदिराला मुक्तद्वार असावे म्हणून दरबारसाहिब उभारणाऱ्या गुरू अर्जुनसिंहांनी मंदिराला अक्षरश: चार दिशांना चार मुक्त द्वारे ठेवली! आणि आता त्याला स्वरूप आले आहे एखाद्या गडाचे!

हरमिंदर साहिबाची (याचा उच्चार हिंदु शिवसेनावाले हरी मंदीरसाहेब असा करायचे. सुरुवातीला इथे राम–कृष्ण–शंकरादि देवांच्याही मुर्त्या होत्या. पण पुढे त्या नष्ट करण्यात आल्या असं त्याचं म्हणणं होतं सुवर्णमंदिराला, 'सुवर्ण गुरुद्वार'न म्हणता 'मंदिर' म्हणतात ही गोष्टही ते आवर्जून सांगायचे) परिकम्मा करून सरायमध्ये परत आलो ऑल इंडिया शीख स्टुडंट फेडरेशनचे (आपण नुस्तेच 'फेडरेशन' म्हणू या) काही विद्यार्थी बाबांशी जोरजोरात वाद घालत होते. अतिरेक्यासंबंधी केलेल्या काही विधानाबद्दल पण मुख्य रोख होता दिल्लीश्वरावर. 'आम्हाला कमले भारत जोडो सांगता जे काही सांगायचे आहे ते त्या गद्दारांना सांगा' आमचे चाचाजीही त्या मध्ये सामील झाले. मध्येच ते चुकून 'इंदिराजी' असे आदरार्थी म्हणत आणि मग झालेली चूक सावरण्यासाठी इंदिरा–संजय–बर्नालांना खास पंजाबी ठेवणीतल्या शिव्या हाणडत. आम्ही जमलेल्या बाकीच्या तरुणांना जरा बोलतं करण्याचा प्रयत्न केला. वाद घालण्यात अर्थच नव्हता, कारण दिल्लीच्या दंगलीने पोळलेले वा पोलिसांची दडपशाही टाळण्यासाठी मंदिराच्या आश्रयाला आलेले तरुण होते. ही डोकी संतप्त. त्यातून आपण आपल्या गुहेत असल्याची खात्री एक फाटक्या अंगाचा तरुण बराच वेळ आमच्या भोवती घुटमळत होता. जरा निरवा निरव झाल्यावर तो पुढे आला. संतोकसिंग नाव त्याचं दिल्लीच्या दंगलीत त्याचं सर्व घर उध्वस्त झालं. आई-वहिणीवर डोळ्यासमोर बलात्कार झाला. बोलता बोलता त्याने माझा हात घट्ट पकडला. आणि विचारलं, 'सांगा अगदी खरं सांगा, तुमच्या डोळ्यासमोर तुमच्या आई वहिणीवर बलात्कार झाला तर तुम्ही अशा या शांती – भाईचाऱ्याच्या गोष्टी बोलाल? बताईये सच–सच बताइये–'

सच्ची गोष्ट त्यालाही माहीत होती या दुष्ट चक्राला काहीच अंत नव्हता. पण आता तोही या आवर्तात भरकटत चालला होता. अशा वेळी त्याला हात द्यायला जखमावर फुंकर घालायला क्षणभर तरी का होईना आमची मदत होणार होती चंडीगडहून बरोबर आलेला एक पत्रकार माझा चांगला दोस्त झाला होता तरुणाचा हा राग-संताप दु:ख या विषयी बोलताना तो सहज बोलून गेला, 'जग्गा यह खूँखार नही है. Actually what they need is some shoulders to cry on! आनंदपूर साहिबला सुरुवातीला आग ओकणारा एक तरुण शेवटी हमसा–हमशी रडताना मी पाहिला होता खालसा कॉलेजमध्ये दुसऱ्या दिवशीही असाच अनुभव येणार होता!

दमदमी टाकसाळ व 'फेडरेशन'ची काही मंडळी सकाळी बाबांना भेटायला येणार अशी माहिती समजली म्हणून त्यांची वाट बघत बसलो पण ते आले नाहीत. दिवसभरचा कार्यक्रमही धड समजेना. आता वेळ वाया घालवण्यात अर्थ नव्हता. सक्सेनाचाचाजींना मग घेऊन निघालो थेट खालसा कॉलेजकडे. आधल्या दिवशीच्या सभेला ते हजर होते. सभेत बोललेल्यापैकी भगतसिंह नावाचा फेडरेशनचा विद्यार्थी नेता त्यांना तिथे भेटणार होता

वाटेत सक्सेनाजी आधल्या दिवशीच्या सभेची माहिती सांगत होते. 'खलिस्तान झिंदाबाद'च्या घोषणांनीच सभेला सुरुवात झाली होती. एक विद्यार्थी नेता तर नग्या तलवारीच्या साक्षीनेच बोलला होता मध्ये–मध्ये थांबून वर खलिस्तान झिंदाबादच्या घोषणा, त्याला जमलेल्या श्रोतृवर्गाचा जोरदार प्रतिसाद. सभेच्या वेळी वाटण्यात आलेले पत्रक तर आणखीच तिखट होते!

'मुक्ती – कोणाची मुक्ती?' म्हणून पंजाबच्या मुख्यमंत्र्यांना लिहिलेल्या पत्राच्या प्रती होत्या त्या. दिल्लीच्या काही बड्या पत्रकारांनी धार्मिक स्थळ (म्हणजे गुरुद्वार) मुक्त करण्याची मागणी केली होती. त्या

संबधात पत्र होते. अहमदशहा अबदलीपासून इंदिरा गांधीपर्यंतच्या धर्मद्रोही आक्रमकापासून सुवर्णमंदिराचे पावित्र्य व स्वातंत्र्य रक्षण करण्यासाठी बलिदान केलेल्या हुतात्म्याचा इतिहास कथन करून बर्नालाना सवाल केला होता की ' या शहीदानी प्राणार्पण करून मिळवलेली आपल्या हरमिंदर साहिबची मुक्ती ( स्वातंत्र्य ) तुम्ही टिकवून धरणार की दिल्ली दरबारचे व त्याच्या कट्टर जातीयवादी भटा–बनियाचे भाट बनून हरमिंदर साहिबाच्या तथाकथित ' मुक्तीला ' हात घालणार ?' पुढे तर खुल्ला डोस होता. 'संत जर्नेलसिंगजी खालसा भिंद्रनवाले, बियांतसिंग व त्याच्या हजारो साथीदारानी प्राणाहुती देऊन आक्रमकाना धडा शिकवला आहे. आता परत पोलीस वा लष्कर मंदिरात पाठविण्याचा मूर्खपणा तुम्ही जर केलात तर तुमची खैर नाही. याची खात्री बाळगा '

## हॉस्टेलमध्ये गप्पा

बाकी पत्रकही कडक होते तरी भाई भगतसिंहने आपला ठाव–ठिकाणा ' केअर ऑफ कँटीन ' दिला आहे हे ऐकून जरा हायसं वाटलं. कारण कॉलेज विद्यार्थी, त्यातून *विद्यार्थी नेता कँटीनमध्ये असणं ही* फार आशादायक बाब होती. रिक्षा कॉलेजच्या दाराशीच सोडून आत आलो आत विस्तीर्ण बगीचा–हिरवळ आणि त्यामागे कॉलेजची मनोरेवाली खानदानी इमारत. बडोद्याच्या कलाभुवनसारखी. परीक्षा पुढे ढकललेल्या होत्या त्यामुळे विद्यार्थीगण इथे तिथे रेंगाळत होता ( फक्त हातात बिड्या नव्हत्या ) शीख विद्यार्थ्यांबरोबर बिगर शीख विद्यार्थीही बरेच दिसत होते. ( ' हिंदू ' दयानंद सरस्वती कॉलेजमध्ये जेवढी ' शीख ' मुले आहेत, त्यापेक्षा आमच्या खालसा कॉलेजमध्ये किती तरी जास्त हिंदु आहेत ही माहिती पुढे एकाने मुद्दाम ऐकवली. ) भगतसिंह भाईंचा कँटीनमध्ये पत्ता नव्हता. पण वेळ काढायला ते इथे येणारच अशी माहिती समजली. मग आम्हीही इथे–तिथे काही वेळ काढला आणि मग गाठले हॉस्टेल खोली नंबर ३५ मध्ये कॉलेजचा जनरल सेक्रेटरी दिलबागसिंह रहातो असं समजल्यामुळे तो ' फेडरेशना'चा खंदा कार्यकर्ता होता.

खोली नंबर ३५ शोधत निघालो. छातीवरचा ' भारत जोडो 'चा बिल्ला पाहून वाटेत भेटणारे चौकस नजरेने पहात होते– एकमेकाना काही तरी सांगत होते. ' आया जोडो ऽ जोडोवाला ' म्हणून क्वचित टोमणाही मारत होते खोलीपर्यंत जाईपर्यंत आमच्यामागे बराच घोळका जमला. बहुधा त्या आवाजानेच खोलीचे दार उघडले गेले असावे मी काही बोलण्याआधीच पाठीमागून आवाज आला ' यह आया फारत ऽ जोड्डोवाला बब्बा आमटे. ( पंजाबात ' भ ' चा ' फ ' होतो त्यामुळे आधीच जोरकस असलेल्या ' भ ' ला आणखीनच जोर चढतो वाक्यात उपयोग करून बघा–××× ! ) आजूबाजूच्या पब्लिकमधून हशा पिकला.

दरवाजा उघडणाऱ्या उंच–निंच माणसाने आत या किंवा नाही म्हणायच्या आतच घोळक्याबरोबर आत लोटला गेलो आतमध्ये आणखीही काही तरुण बसले होते सुरवातीला आधल्या रात्रीसारखाच अनुभव. प्रत्येक शब्द अंगावर आदळल्यासारखा. तिरकस. ' परिक्षा कब 'ला ' अब जगके मैदानमे परिक्षा ' वा ' क्या करते हो ' ला ' खलिस्तान का काम ' असे उत्तर. मी मुद्दामहूनच ' खलिस्तान ' म्हणून प्रश्नार्थ चेहरा केला, *तर तो उंच–निंच माणूस ताडकन्* म्हणाला ' क्यू ? हिंदुस्थान चंगा लगया खलिस्तान नाम लेनेसे टट्टी लगती क्या–'

मामला काही ठीक नव्हता मला ' घोळक्या 'शी बोलायचे नव्हते कारण घोळक्याचे मानसशास्त्र–वागण्याची पद्धत वेगळी असते आतापर्यंत ' घोळक्या 'ची बाजू ऐकली होती. मला एकट्या–दुकट्या माणसाशी बोलायचे होते मी क्षणभर गप्प बसताच एकाने रोखून विचारले ' आतकवादीयोसे मिलने आये हो तो मिलो हम सब है आतकवादी–'

' भाईसाब, मैं तो मेरे दोस्तोको मिलने आया–यह हॉस्टेल देखकर–' मी जरा खालच्या पट्टीत सूर लावला आणि मग फर्ग्युसन कॉलेजच्या हॉस्टेलपासून ते विद्यापीठातील हॉस्टेलपर्यंतच्या नाना कथा, गमती जमती, गॅदरिंग वगैरेंची रेकॉर्ड लावली. अभ्यासासाठी किंवा बहुधा माझ्या ' गमती–जमती 'चा धसका घेऊन घोळक्यातून आलेली बरीच मंडळी पांगली. खोलीमध्ये सुरवातीचेच चार-पाचजण उरले मघाचचा तो उंच–निंच माणूस–तोच दिलबागसिंह होता–माझ्याकडे रोखून बघत म्हणाला, 'कैसे लगे आतकवादी ? खतरनाक ?' मग क्षणभर थांबून म्हणाला ' भाईसाब, यहाँ कोई आतकवादी नही थे. सब बनाये गये हैं–'

' मतलब ?' मी विचारलं. दिलबागसिंहने एक–एक शब्द जोडत पंजाबी हिंदीत माहिती सांगावयास सुरवात केली–

पंजाबमध्ये राजकारण सुरवातीपासूनच धर्माधिष्ठित. लोक–विद्यार्थीही धार्मिक, पण मुळ या राजकारणाच्या फंदात फारशी पडायची नाहीत, ' फेडरेश ' वा ' दमदमी टकसाळ 'चा आज बोलबाला झाला असला तरी या संस्था तशा जुन्या. दमदमी टाकसाळ तर निव्वळ धार्मिक शिक्षण देणारी संस्था. पण या दिल्लीवाल्यानी सत्तेसाठी सगळे पार नासवून टाकले–'

' म्हणजे, अगोदर इथे सर्व आलबेल होते?' –मी

' नही तो. अगोदर अकालीमध्ये बजबजपुरी होतीच. तो तळवंडी–अफीमवा एक नंबरचा चोरटा व्यापारी. आता पंजाबमध्ये अफूला 'तळवंडी'च नाव पडलं आहे आणि तो × × × तोहरा प्रेताच्याही टाळूवरच लोणी खाणारा–'

' पण त्यात दिल्लीवाल्याचा काय दोष ?' –मी

' यात दिल्लीवाल्याचा दोष नाही पण ते *अशाच लोकाना हाताशी घेऊन आपले* घाणेरडे राजकारण खेळत राहिले–'

' पण संतजीपण यात शामील होते–' मी मध्येच म्हटलं वाटलं दिलबागसिंह यावर उखडेल पण तो स्वतःच अपराधी आवाजात म्हणाला, ' शुरूमे सतजीकी बहुत गलती हुअी. वह खुद बताते थे–'

' स्वत. कबूल करायचे ?'

' जी हाँ. बहुत नेक आदमी थे हमारे संतजी. आमच्याजवळ प्रांजळपणे या चुका कबूल करायचे. या सगळ्या घाणेरड्या लोकाची कट–कारस्थान त्यानी फार जवळून बघितली होती, त्यामुळे तर फारच उद्वेगाने बोलायचे–'

'संतजी, तुम्हाला भेटायचे ?' मी संतजीचा विषयच लावून धरला, कारण इंदिरा-अकाली राजकारणाचा उकिरडा उकरावा तेवढा

पृष्ठ २८ वर

# बार्शी : भारतातील पहिले ग्रामीण कर्करोग निवारण केंद्र

या संस्थेच्या निर्मितीकथेचा पूर्वार्ध मागील अंकात दिला. हा उत्तरार्ध–

**सुभाष काळे**

कोणत्याही सामाजिक सस्थेच्या उभारणीचा एक क्रम ठरलेला असतो. प्रथम संस्थेची स्थापना, निधी सकलन, इमारत उभारणी आणि मग प्रत्यक्ष कार्याला सुरुवात. हा क्रम लोकाच्या पचनी पडलेला आहे. पण बार्शी हॉस्पिटलची सर्व कामे समातर पातळीवर सुरू झाली एकीकडे निधी सकलन सुरू असताना दुसरीकडे इमारती उभारण्याचे काम चालू होते. तर तिसरीकडे रुग्ण निदान तपासणी शिबिरे चालू होती ही तिन्ही कामे एकाच वेळी समातर पातळयावर चालू होती.

कॅन्सर हॉस्पिटल स्थापनेपासून एकूण २५५ शिबिरे झाली. त्यात ३३ हजार तीनशे लोकाची तपासणी करण्यात आली. त्यात २३१ लोकाना कॅन्सर आढळला. हॉस्पिटलमध्ये तीन हजार लोकाना तपासले त्यापैकी ५५६ लोकाना कॅन्सर आढळून आला.

बार्शी–ग्रामीण भागात कॅन्सर तपासणी व निदानाचे काम प्रत्यक्षात कसे चालते हे पहाण्याजोगे आहे बार्शी तालुक्यात एकंदर १४४ खेडी आहेत त्यातली १३७ खेडी या हॉस्पिटलच्या कार्यक्षेत्रात मोडतात. १९८१ च्या शिरगणतीनुसार २०३५१४ ही एकूण लोकसख्या त्यापैकी १०३७३१ पुरुष व ९९७८३ स्त्रिया आहेत

हॉस्पिटलमधील क्लेरिकल सेक्शनचा एक कर्मचारी प्रथम कॅम्प घ्यायच्या गावी जाऊन सरपचाला भेटतो. सरपचाच्या व ग्रामसेवकाच्या सल्ल्यानुसार तारीख ठरवितो कॅपचा दिवस लोकांना माहीत असावा म्हणून गावात दवडी दिली जाते. कॅम्पच्या दिवशी हॉस्पिटलमधील एक तज्ज्ञ डॉक्टर आणि एक सायटॉलॉजिस्ट मोबाईल व्हॅन मधून त्या गावी जातात. सर्वसाधारणपणे खेड्यातले लोक सकाळच्या वेळीच भेटत असल्याने अगदी सकाळीच गाडी त्या गावी पोचते. लोकाना समजेल, वाचता येतील अशा सोप्या भाषेत बोर्डस्, सूचनाफलक लावले जातात कॉर्नर मिटिंग्ज सारखे स्त्री–पुरुषाचे वेगवेगळे ग्रुप्स करून त्याना कॅन्सर, कॅन्सरचे गंभीर परिणाम, पूर्वतपासणीची आवश्यकता, औषधोपचार वगैरे बारीकसारीक माहिती दिली जाते. नतर ३५ वर्षाच्या पुढील लोकाना तपासले जाते. तपासण्यापूर्वी त्याच्याकडून एक फॉर्म भरून घेतला जातो. त्यात स्त्री, पुरुष, विवाहित, अविवाहित, स्त्री असेल तर किती बाळतपणे झाली, अॅबॉर्शन्स किती झाली, मुले किती झाली; पुरुषाबाबत त्याच्या पान, तबाखू, दारू वगैरेबाबतच्या सवयी, तसेच त्या अनुषगाने त्याच्या काही तक्रारी असतील तर त्या लिहून घेतल्या जातात हा फॉर्म म्हणजे थोडक्यात त्या व्यक्तीची फिजिकल हिस्ट्रीच असते आणि ती इतकी डिटेल असते की, व्यसनाच्या कॉलममध्ये फक्त दारू म्हणून लिहून चालत नाही तर देशी दारू, विदेशी दारू की हातभट्टी याचा उल्लेख करावा लागतो. देशी दारूत परत त्याचा ब्रँड लिहावा लागतो. विदेशी दारूच्या कॉलममध्ये व्हिस्की, ब्रँडी, रम, जीन लिहून परत त्याचा ब्रँड लिहावा लागतो.

रुग्णाची तपासणी व्हॅनमध्ये केली जाते. ही व्हॅन म्हणजे एक छोटेसे रुग्णालयच आहे. त्यात कान, नाक, घसा तपासणी, क्ष-किरण, एम. एम. आय. सायटॉलॉजी (ज्याद्वारे स्त्रियांच्या गर्भाशयाच्या कॅन्सरची शक्यता अजमावली जाते), बायोप्सीज ( ज्या अवयवाचा कॅन्सर असेल त्या अवयवाचा तुकडा काढून घेऊन तपासला जातो.), अशा सर्व प्रकारच्या तपासणीची सोय व्हॅनमध्ये आहे जपानी कपनीचे एक अत्याधुनिक क्षकिरण यत्रही त्यात सेट केलेले आहे. त्याशिवाय पाण्याची सोय, वॉशबेसिन, ज्या गावात वीज नाही अशा ठिकाणी उपयुक्त ठरावे म्हणून जनरेटरही त्यात आहे. ही व्हॅन प्लॅनिग कमिशनने दिलेली आहे. भारतातली याप्रकारची ही एकमेव व्हॅन आहे.

शरीरातील काही ठराविक भागाची तपासणी केली जाते. सशयित अवयवाची बायोप्सी घेतली जाते. ही बायोप्सी लगेच लॅबोरेटरीत तपासली जाते. या तपासणीत कॅन्सर स्पष्ट झाल्यास त्या रुग्णाला बार्शीला बोलावून घेतले जाते. त्याची बार्शी कॅन्सर हॉस्पिटलमध्ये काळजीपूर्वक तपासणी केली जाते रुग्ण कोणत्या स्टेजमध्ये आहे त्याचे निदान केले जाते.

प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या रविवारी ऑपरेशन कॅम्प असतो. टाटा मेमोरियल हॉस्पिटलचे दोन तज्ज्ञ डॉक्टर्स व अनेस्थेशिया स्पेशॅलिस्ट मुबईहून बार्शीला येतात. दिवसभरात साधारणपणे पाच-सहा ऑपरेशन्स होतात. या कॅम्प व्यतिरिक्त एखाद्या रुग्णावर तातडीने शस्त्रक्रिया करायची असेल तर बार्शीत सोय आहे पण अत्यत अवघड शस्त्रक्रिया असेल तर रुग्णास टाटा मेमोरियलकडे पाठविले जाते. सध्या रुग्णालयात कोबाल्ट युनिट नाही. रुग्णाना त्याच्या सोयीनुसार शेक देण्यासाठी इतरत्र पाठविले जाते. फॉलोअप कॅम्पस्मध्ये रुग्णाच्या शारीरिक बदलाचा आढावा घेतला जातो व त्यांच्यावर औषधोपचार केले जातात. तपासणी कॅम्प, फॉलोअप कॅम्पस्, सशयित रुग्ण वगैरेची १५ ऑगस्ट ८२ ते ३१ ऑगस्ट ८५ पर्यंतची आकडेवारी पुढीलप्रमाणे :

| कॅम्पस्चे विवरण | एकूण कॅम्पस् | सर्व्हे कॅम्प | सर्व्हिस कॅम्प |
|---|---|---|---|
| **एकूण कॅम्पस्** | २५० | १७८ | ७२ |
| कॅम्पस्–ग्रामीण भागातील | १८८ | १६२ | २६ |
| कॅम्पस्–नागरी भागातील | ६२ | १६ | ४६ |
| एकूण तपासलेले लोक | ३२०२६ | १९७१७ | १२३०९ |
| ग्रामीण भागातील लोक | २६६६२ | १८९१३ | ७७४९ |
| नागरी भागातील | ५३६४ | ८०४ | ४५६० |
| पुरुष | १८९१४ | १२१६४ | ६७५० |
| स्त्रिया | १३११२ | ७५३३ | ५५५९ |
| **एकूण संशयित रुग्ण** | ८०६ | ३५२ | ४८४ |
| ग्रामीण भागातील | ६४९ | २९५ | ३५४ |
| नागरी भागातील | १८७ | ५७ | १३० |
| पुरुष | ४१० | १८४ | २२६ |
| स्त्रिया | ४२६ | १६८ | २५८ |
| **एकूण कॅन्सर निष्पन्न रुग्ण** | २२६ | ४१ | १८५ |
| ग्रामीण भागातील | १७९ | ४१ | १३८ |
| नागरी भागातील | ४७ | ० | ४७ |
| पुरुष | १४१ | ६ | १३५ |
| स्त्रिया | ८५ | ३५ | ५० |
| **एकूण कॅन्सरपूर्ण रुग्ण** | १२७ | ७८ | ४९ |
| ग्रामीण | ११० | ७८ | ३२ |
| नागरी | १७ | ० | १७ |
| पुरुष रुग्ण | ३ | २ | १ |
| स्त्रिया | १२४ | ७६ | ४८ |
| **एकूण कॅन्सरग्रस्त रुग्ण** | २९३ | ३९ | २५४ |
| ग्रामीण | १९३ | ३२ | १६१ |
| नागरी | १०० | ७ | ९३ |
| पुरुष | १६५ | २० | १४५ |
| स्त्रिया | १२८ | १९ | १०९ |
| **तपासणी** | | | |
| **एकूण एम. एम. आर.** | ३०९५ | ६०३ | २४९२ |
| ग्रामीण | २३०६ | ५२३ | १७८३ |
| नागरी | ७८९ | ८० | ७०९ |
| पुरुष रुग्ण | २०२० | ४०७ | १६१३ |
| स्त्री रुग्ण | १०७५ | १९६ | ८७९ |
| फ्री एम. एम. आर. | ७०४ | ४३ | ६६१ |
| **एकूण सायटॉलॉजी** | ४२२६ | २७०९ | १५१७ |
| गायनीक | ४१३७ | २६५७ | १४८० |
| ग्रामीण | ३५६५ | २६१८ | ९४७ |
| नागरी | ३५२ | ३९ | ५३३ |
| मिसलस | ८९ | ५२ | ३७ |
| ग्रामीण | ६४ | ४६ | १८ |
| नागरी | २५ | ६ | १९ |
| फ्री | ४२२६ | २७०९ | १५१७ |
| **एकूण बायोप्सीज** | १८८ | ६१ | १२७ |
| ग्रामीण | १५४ | ६० | ९४ |
| नागरी | ३४ | १ | ३३ |
| फ्री | १८८ | ६१ | १२७ |

हे झाले निरनिराळ्या कॅम्पस्चे विवरण

दिनाक १५–८-८२ ते ३१–८–८५ या काळातील कॅन्सर रुग्णालयाच्या कामाचे अवलोकन.

| | | |
|---|---|---|
| **एकूण बाह्य रुग्ण** | २९५१ | |
| पुरुष | १५०५ | |
| स्त्रिया | १४४६ | |
| ग्रामीण | १९१५ | |
| नागरी | १०३६ | |
| फॉलोअप | २४५२ | |
| पूर्णपणे फ्री | १०२७ | |
| **एकूण संशयित कॅन्सर रुग्ण** | | ८५४ |
| पुरुष रुग्ण | | ४२५ |
| स्त्री | | ४२९ |
| ग्रामीण | | ६०६ |
| नागरी | | २४८ |
| **एकूण कॅन्सरग्रस्त रुग्ण** | | ५५६ |
| पुरुष | | २४८ |
| स्त्रिया | | ३०८ |
| ग्रामीण | | ४०८ |
| नागरी | | १४८ |
| **एकूण निदान रुग्ण** | | २७६ |
| पुरुष | | १४३ |
| स्त्रिया | | १३३ |
| ग्रामीण | | १८६ |
| नागरी | | ९० |
| **एकूण झालेली लहानमोठी ऑपरेशन्स** | | ५०८ |
| मोठी | | ८९ |
| किरकोळ | | ४१९ |
| **एकूण आय. पी. डी. केसेस** | | ६८० |
| ग्रामीण | | ४६५ |
| नागरी | | २१५ |
| पुरुष | | २८२ |
| स्त्री | | ३९८ |
| **एकूण मुक्त** | | २६० |



डॉ. शरद नेने आणि त्यांची कन्या कु. शर्मिष्ठा नेने कॅन्सर हॉस्पिटल भूमिपूजन प्रसंगी

¤

**तपासणी**

एम. एम. आर एकूण – १४६

सायटॉलॉजी– ८०७

गायनिक – ६२७

– १८०

टाटांकडे पाठविलेल्या केसेस – ३०७

हिस्टॉपॅथीलॉजिकल स्पेसिमन तपासणी एकूण – ४१०

या खेरीज खा. उत्तमराव राठोड यांनी नांदेड जिल्ह्यातील वसमत येथे शिबिर घेण्याची विनंती केली होती. तीनुमार डॉ. वैद्य, व अन्य दहा तज्ज्ञ डॉक्टर्सनी तेथे ६७३ स्त्रिया आणि ५३५ पुरुषांची तपासणी केली. त्यात तीस लोकांना कॅन्सर असल्याचे निदान झाले.

५ फेब्रुवारी ८४ ला मुरुडला शिबिर झाले. त्यात १७०४ जणांची तपासणी झाली. त्यात ११ संशयित रुग्ण आढळले. असेच एक शिबिर पं. दिनदयाळ शोध संस्थान महाराष्ट्र शाखा पुणे तर्फे अष्टी ता. बीड येथे १८–६–८४ रोजी घेतले गेले अशाच प्रकारची शिबिरे उस्मानाबाद, लातूर, अहमदनगर, पुणे परभणी, सातारा, जळगाव, औरंगाबाद, कर्नाटकातील विजापूर इत्यादी ठिकाणी घेऊन लोकांची मोफत तपासणी केली गेली. यावरून बार्शी कॅन्सर हॉस्पिटलमधील कामाची गती स्पष्ट होते.

## जागतिक तज्ज्ञांची मान्यता

संस्थेतील डॉक्टर्स, टेक्निशियन्स, पॅथॉलॉजिस्टस् वगैरे सर्वांना कॅन्सर निदानाचे ट्रेनिंग टाटा मेमोरियलमध्ये दिले जाते. या प्रशिक्षणामुळे कॅन्सर हॉस्पिटलच्या कामाचा दर्जा न वाढला तरच नवल.

अमेरिकेच्या अध्यक्षांचे जबाबदार प्रमुख वैद्यकीय अधिकारी व न्यूयॉर्कच्या जगद्‌विख्यात स्लोन्स केटरिंग हॉस्पिटलचे प्रमुख डॉक्टर डॉ. बेट्टी यांनी बार्शी कॅन्सर सेंटरला दोन वर्षापूर्वी आवर्जून भेट दिली. सुनीलदत्तच्या ' दर्द का रिश्ता ' या चित्रपटात डॉ. बेट्टी व त्यांचे स्लोन्स हॉस्पिटलचे दर्शन भारतीयांना झालेले आहेच. डॉ. एडवर्ड बेट्टी हे जागतिक कीर्तीचे कॅन्सरतज्ज्ञ आहेत. नर्गिस दत्त व माजी राष्ट्रपती संजीव रेड्डी यांच्यावर डॉ. बेट्टी यांनीच औषधोपचार केले होते. डॉ. बेट्टी नुकतेच स्लोन्स केटरिंगच्या सेवेतून निवृत्त झालेले आहेत. ' भारतात याल तेव्हा माझ्या गावी एक दिवस या ' हे संजीव रेड्डींचे निमंत्रण लक्षात ठेवून डॉ. बेट्टींनी तीन दिवसांची भारतभेट आखली होती. एक दिवस ते दिल्लीत थांबणार होते. दुसरा दिवस संजीव रेड्डींच्या आंध्रातल्या अनंतपूर जिल्ह्यातील शेतावर व तिसरा दिवस मुंबईत असा त्यांचा फक्त तीन दिवसांचा भारतभेटीचा कार्यक्रम होता. पण डॉ. एडवर्ड बेट्टींनी बार्शी कॅन्सर हॉस्पिटलच्या कार्याबद्दल ऐकले तेव्हा मुंबईत फार वेळ न थांबता बार्शीचा कार्यक्रम आखला. ७ फेब्रुवारी १९८४ ला ते बार्शी प्रकल्पाला भेट देऊन गेले. प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याचे यशस्वी काम व कामाची गती पाहून खूष झाले. त्यांनी हॉस्पिटलच्या कामात काही महत्त्वाच्या सूचना केल्या. स्वागत समारंभात बोलताना त्यांनी बार्शी कॅन्सर हॉस्पिटलच्या कार्याचे व कामातील गतीचे कौतुक करून हॉस्पिटलमधील डॉक्टर्स व तंत्रज्ञांना स्वखर्चाने स्लोन्स केटरिंग इन्स्टिटयूट ( न्यूयॉर्क ) मध्ये प्रशिक्षणासाठी नेण्याचा आपला मनोदय स्पष्ट केला. त्यांच्या हस्ते कै. नर्गिस दत्त हॉस्पिटलचा कोनशीला समारंभ पार पडला. त्यांच्याबरोबर यावेळी मिसेस निकोली बेट्टी. डॉ. ल्यूरिया व मिसेस ल्यूरिया वगैरे मंडळी उपस्थित होती.

कॅन्सर हॉस्पिटलचे प्रगतीपथावरील कार्य पाहून व प्रेमाच्य' स्वागताने भारावलेल्या मिसेस निकोली बेट्टी यांनी ' ऑटोटेक्निकॉला हे २ लाख ३५ हजार रुपये किंमतीचे मशीन भेट म्हणून दिले. या मशीनमुळे रक्ताच्या एकाच वेळी बत्तीस तपासण्या होऊन बत्तीस वेगवेगळे रिपोर्ट एकाच वेळी मिळतात.

मिसेस बेट्टींप्रमाणेच सिमनसन अँड वील अ ग्रँट इन्स्ट्रुमेंट या इंग्लंडमधील आणि स्वीडनच्या वेन-फेलो या संस्थांकडून अत्याधुनिक उपकरणांच्या स्वरूपात बार्शी कॅन्सर हॉस्पिटलला फार महत्त्वाची मदत मिळाली आहे.

श्री. बेट्टी यांच्यानंतर जागतिक आरोग्य संघटनेच्या कॅन्सर विभागाचे प्रमुख सल्लागार डॉ व्हेलीटीएन कोरोहुचेकोव्ह यांनी गेल्या वर्षी ६ ऑक्टोबर ८५ रोजी बार्शी कर्करोग निवारण केंद्राला भेट दिली तसेच ग्रामीण भागात जाऊन त्यांनी काही कॅम्प्सचे जातीने निरीक्षण केले. एकूण कामाबद्दल अभिप्राय व्यक्त करताना ते लिहितात . ' Thanks a lot for wonderfull time which I Spent in Barsi community. The comperhensive Barsi Cancer Rural Control Programme is going very successfuly. I would be very happy to wish Dr. ene, the staff members, Barsi Community, Volenters and



पुढे बसलेले – सौ. नेने, मिसेस बेट्टी
मागे डॉ. एडवर्ड बेट्टी व ना. सुशीलकुमार शिंदे

respected citizens, that this project will be in progress. All happiness to people, suffuring from Cancer in India as well as in developing countries of the world.

VALENTIN KOROHCHOOK
Counsultant Cancer Unit
W. H. O. GENEVA
SWITZERLAND.

या परदेशी पाहुण्यांखेरीज मुंबई न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती, माजी मुख्यमंत्री शिवाजीराव पाटील निलंगेकर, विरोधी पक्षनेते शरदराव पवार, डॉ. वि. म. दांडेकर, श्री. बाळासाहेब भारदे, पत्रकार यशवंत मोने, कै. मुणगेकर, निळू फुले, शांताबाई किर्लोस्कर, मुकुंदराव किर्लोस्कर, अनुप जलोटा, दै. सकाळचे विद्यमान संपादक श्री. एस. के कुलकर्णी यांनी हॉस्पिटलला भेटी देऊन कार्याचे कौतुक केले आहे.

भारत जोडो पदयात्रेवर असलेले सुप्रसिद्ध समाजसेवक श्री. बाबा आमटे यांनी आपल्या पदयात्रेचा मार्ग बदलून मुद्दाम हॅस्पिटलला भेट दिली आणि कॅन्सर हॉस्पिटलच्या कार्याचे व डॉ. नेने यांच्या ध्येयवादी वृत्तीचे कौतुक केले. श्री. बाबा आमटे यांच्याप्रमाणेच जैन मुनी आचार्य सम्राट पूज्यश्री १००८ आनंद ऋषीनी डॉक्टर व हॉस्पिटलच्या प्रगतीचे कौतुक केले आहे. आपल्या संदेशात म्हणतात, ‘शरीर माद्यं खलु धर्मसाधनं’ शरीर धर्मसाधनका मूलभूत आधार है। सशक्त निरोगीही आत्मसाधना में सहयोगी हो सकता है। विकृत परिस्थिती एवं अन्य कारणोंसे श्रेष्ठ मानवशरीर व्याधिग्रस्त आत्मा को संत्रस्त करता है। प्रभू महावीरने रोगी, ग्लान की सेवा को मोक्ष मार्ग के रूप में प्रतिष्ठा दी. इतनाही नही अपितु जो व्यक्ति सेवासे उन्मुख होता है, उसे साधना के लिए अयोग्य माना है.

डॉ. नेने बारसी जैसे गाव में मानवमन जिससे अत्याधिक भयाभीत है, ऐंसे कॅन्सर रोग से मानव को निर्भय एवं मुक्त करने के लिए प्रयत्नशील है. उनका यह प्रयास भारतीय संस्कृती के सेवा भावना का श्रेष्ठतम उदाहरण है. समस्त जनता इस अभियान मे सामील होकर निरोगी जीवन का सपना साकार करने के लिए प्रयत्नशील है. यही शुभ कामना’

एखाद्या नामवंत व्यक्तीच्या स्मारकाचे निमित्त करून त्यांच्या नावाने देणग्या गोळा करायच्या किंवा एखाद्या धर्मादाय संस्थेच्या आधाराने किंवा शासकीय सवलतीच्या मदतीने किंवा एखादा दानशूर उद्योगपती गाठून संस्था उभ्या करायच्या, ही आपल्याकडील स्वतंत्र्योत्तर काळातली पद्धत. अर्थात अशा संस्था सेवेच्या नावाखाली चालत असल्या तरी तिथे ‘खाबुगिरी’ आणि राजकारण यापेक्षा वेगळे काही नसते. अशा संस्था किंवा त्यांची रुग्णालये ठराविक काळानंतर पार निकालात निघतात. कारण तेथे सेवेचा हेतूच नसतो. तिथे सत्ता आणि संपत्ती हाच मूलाधार असतो. काही वर्षांपूर्वी महाराष्ट्रात ‘जिजामाता हॉस्पिटलच्या’ नावाने कोट्यावधी रुपये गोळा झाले होते; पण तो पैसा आणि ती रुग्णालये आज कोठे आहेत ?

सुदैवाने म्हणा की, बार्शी रुग्णालयाचा आधार सत्ता नाही. त्याचप्रमाणे संपत्तीही नाही. हे ध्येयवेड्या लोकांनी उभे केलेले रुग्णालय आहे.

संस्थेच्या आर्थिक परिस्थितीबद्दल लोकामध्ये बरेच गैरसमज आहेत. पुण्या-मुंबईकडील लोकांच्या डोक्यात तर वेगळेच आहे. टाटांसारख्या विश्वविख्यात उद्योगपतींची ‘टाटा मेमोरियल हॉस्पिटल’ ही संस्था बार्शी कॅन्सर हॉस्पिटलच्या पाठीशी उभी आहे. सुनील दत्त सारखा बडा मिनेनट संस्थेच्या कार्यात सहभागी आहे. शिवाय केन्द्र व राज्य सरकारची मदत निदान पाचपंचवीस कोटी रुपये तरी संस्थेजवळ असावेत असा या मंडळींचा समज आहे. त्यात मल्टीस्टार प्रोग्रॅममुळे तर या गैरसमजात अधिक भर पडलेली आहे. खोटे कशाला, मला स्वतःलाही तसे वाटत होते. या प्रकल्पाच्या कार्यात सहभागी असलेल्या अनेकांचा माझा घनिष्ट परिचय असताना

माझ्या डोक्यात गैरसमज होते तर पुण्या-मुंबईसारख्या दूरच्या भागातील लोकांच्या मनात गैरसमज असावा यात विशेष ते काय ?

संस्थेला एक तृतीयांश म्हणजे एक कोटी सत्तर लाख रुपये गोळा करायचे आहेत. संस्थेचा आजतरी मुख्य आधार नागरिकांच्या देणग्या हाच आहे काही देणग्या पुढीलप्रमाणे आहेत.

हेल्प एज इंडिया या राष्ट्रव्यापी कार्य करणाऱ्या संस्थेने अल्ट्रा साऊंड रेकॉर्डरसाठी दोन लाख साठ हजाराचा चेक संस्थेचे प्रमुख अधिकारी सॉबी सेबस्टेन यांनी ८ ऑगस्ट १९८५ ला दिला. बँक कर्मचारी, पोलीस कर्मचारी सारख्या अनेक कर्मचाऱ्यांनी आपला एक दिवसाचा पगार दिला. पंढरपूर अर्बन बँकेने १ लाख, एस टी. कर्मचारी-४० हजार, कृषी उत्पन्न बाजार समिती-अडीच लाख, डी. डी. सी. बँक पावणे दोन लाख, सोलापूर शिक्षक संघटना-१ लाख. सुनील दत्तने आयोजित केलेल्या मल्टीस्टार कार्यक्रमातून खर्च वजा जाता तेरा ते चौदा लाख रुपये राहिले. साधारणत: संस्थेकडे ५० ते ७५ लाख रुपये जमा झालेले आहेत.

केंद्र सरकारकडून व राज्य सरकारकडून संस्थेकडे जमलेल्या निधीच्या प्रमाणात एक तृतीयांश रक्कम मिळाली नाही असे नाही. पण राज्य सरकार किंवा केंद्र सरकार काय, त्यांची स्थिती पावसासारखी आहे. वेळेवर कधी पडणार नाही, पडला तर कमी आणि गरज संपेल तेव्हा भरपूर असा पाऊस पडतो, तसे या अनुदानाचे आहे. माजी आरोग्य मंत्री डॉ ललिता राव यांनी ८३ मध्ये शासनाकडून १० लाख रुपये देण्याचे आश्वासन दिले होते पण वर्षाला बदलणारे मुख्यमंत्री आणि काजव्यासारखे क्षणभर चमकणारे त्यांच्या मंत्रिमंडळातले हे मंत्री कोणी कोठे काय आश्वासन दिले याचा पत्ताच नाही त्याची अमलबजावणी कोण करणार ? वनखडं नियमात बदल झाल्यामुळे तर संस्था अधिकच अडचणीत आली आहे. नवीन नियमानुसार शहरापासून किमान दहा किलो मीटर अंतरावर ही संस्था असायला हवी होती. पण बार्शी शहर आणि कॅन्सर हॉस्पिटल यातले अंतर कमी असल्याने ही अडचण निर्माण झालेली आहे. अर्थात या नियम बदलाचा दोष सरकारला देता येणार नाही. कारण काही समाजकंटकांनी या सवलतीचा लाभ उठवून स्वत:च्या तुंबड्या भरल्याने शासनाला नियमात बदल करणे भाग पडले. ही वस्तुस्थिती असली तरी बार्शी कॅन्सर हॉस्पिटल त्यामुळे अडचणीत सापडले आहे.

## लोक मदत करीत आहेत तरीही पैसा अपुरा

अगदी तुटपुंज्या पैशावर हॉस्पिटलचे कार्य चालते. एखादा शाळामास्तर किंवा एखादा क्लार्क जसा आपल्या महिन्याच्या पगारात आपले सर्व बजेट बसवितो आणि त्या महिन्याच्या बजेटवर वर्षाचे बजेट बसवितो, या महिन्यात एकाला कपडे, दुसऱ्या महिन्यात दुसऱ्याला, तिसऱ्या महिन्यात धान्य असे एकेक करीत पंधरा-वीस वर्षाच्या शिलकीतून पोरीचा हुंडा; अक्षरश: तशी आहे या संस्थेची सध्याची परिस्थिती. निरनिराळ्या कर्मचारी संघटनांकडून आणि मल्टीस्टार कार्यक्रमातून मिळालेल्या वीस-बावीस लाख रुपयातून रोगनिदान प्रकल्प पूर्ण झाला आहे. शस्त्रक्रिया विभाग या महिन्यात अधिकृतरीत्या पूर्ण होईल. शेक देण्यासाठी कोबाल्ट युनिट शासनाकडून मिळणार आहे. पण त्यासाठी जी इमारत बांधावी लागते त्याला दहा लाख रुपये खर्च येणार आहे आणि हे दहा लाख रुपये गोळा करण्यासाठी नेने आणि त्यांचे सहकारी वणवण फिरताहेत. पाच लाख रुपये सोलापूर जिल्ह्यातून आणि पाच लाख रुपये उस्मानाबाद जिल्ह्यातून गोळा करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. पैसे गोळा करून लगेच येत्या दोन-तीन महिन्याच्या कालावधीत ही इमारत पूर्ण करायची आहे. जुलैपर्यंत ही इमारत पूर्ण झाली तरच हे कोबाल्ट युनिट तिथे येऊ शकेल अन्यथा नाही. कोणीही उद्योगपती किंवा सरकार दरबारी वजन असलेली नामवंत व्यक्ती संस्थेच्या पाठीशी सतत उभी नसली तरी लोक देणग्या देतात. अद्याप तरी काम पैशामुळे बंद पडलेले नाही. देणाऱ्याचे हात हजार म्हणतात तसे लोक कॅन्सर हॉस्पिटलच्या मागे हजारो संख्येने उभे आहेत. डॉ नेने आणि त्यांचे सहकारी जातात तिथे त्यांचे स्वागत होते. त्यांना परत न पाठविता 'फुल ना फुलाची पाकळी' रूपाने लोक मदत करीत आहेत.

## वेगळा अनुभव

निधी संकलन कामाचा एक वेगळा अनुभव म्हणून १ जानेवारी ८६ या दिवसाचा वृत्तांत येथे द्यायला हरकत नाही. झाले काय की डॉ. नेने यांना अनेक वेळा भेटायला गेलो तरी त्यांची भेट व्हायची नाही. भेट झाली तरी ती अवघी तीन-चार मिनिटांची. मला चांगला त्यांचा तास-दीड तास हवा होता. आणि तो तर त्यांना देणे शक्य नव्हते. अशात ३१ डिसेंबरला मी त्यांना गाठले तेव्हा त्यांनी, 'उद्या सकाळी उस्मानाबादला आम्ही सर्व जाणार आहोत तेव्हा आमच्याबरोबर चला म्हणजे सविस्तर बोलता येईल' असे सांगितले. त्यांनी सुचविल्याप्रमाणे दुसरे दिवशी १ जानेवारी ८६ ला सकाळी त्यांच्या ग्रुपमध्ये सहभागी झालो. डॉक्टरांबरोबर संस्थेचे कोषाध्यक्ष श्री. वसंतराव गाडेकर, इंजिनियर श्री. केशवराव सहस्त्रबुद्धे, अॅड. देशपांडे, श्री. पानसरे गुरुजी, श्री. रावसाहेब कथले, कॉन्ट्रॅक्टर नंदकुमार शुक्ला, श्री. मदनसिंग चव्हाण वगैरे मंडळी होती.

उस्मानाबादचे जिल्हाधिकारी श्री. रत्नाकर कुलकर्णी यांची भेट ठरली होती अकरा वाजता. सर्वजण कलेक्टरांच्या बंगल्यावर पोचलो तेव्हा बरोबर सव्वा अकरा वाजले होते. कलेक्टरसाहेब ऑफिसमध्ये जाण्याची शक्यता होती पण पूर्वसूचना मिळालेली असल्याने डॉ. नेने यांच्यासाठी ते बंगल्यावरच थांबले होते डॉ नेने यांनी थोडक्यात सर्वांचा परिचय करून देऊन संबंध कॅन्सर प्रकल्पाचा आराखडा कलेक्टरांपुढे मांडला व निधी संकलनास मदत करण्याची विनंती केली. सासु-सुना किंवा दोन जावा-जावा यांचे जसे बहुतेक ठिकाणी हाडवैर असते, तसे दोन जिल्ह्यातील अधिकारी वर्गातही हाडवैर असते विळ्या-भोपळ्यासारखा संघर्ष दोघात असतो. परस्परांच्या आदेशांना आणि हितसंबंधांना कोलदांडे लावण्याचे त्यांचे उद्योग सदैव चालत असतात. त्यात बार्शी-उस्मानाबाद या शहरात निजामाच्या राजवटीपासून बेबनाव. इंग्रज आणि निजाम दोघेही गेले तरी त्यांचा संघर्षाचा वारसा मात्र कायम आहे. पण हे सर्व आज कुठेच पहायला मिळाले नाही उस्मानाबाद जिल्ह्यातील एखाद्या तालुक्याचे काम असावे इतक्या आत्मीयतेने श्री. कुलकर्णी यांनी दोन-अडीच लाख रुपये जमा करून देण्याचे आश्वासन दिले. शिवाय माजी सैनिक बोर्डाकडे प्रयत्न केल्यास तिथेही तीन-चार लाख रुपये मिळतील असे

सागून त्यानी सैनिक बोर्डाचे सचिव मेजर पटवारीना भेटण्यासबधी सल्ला दिला.

मेजर पटवारीनी पाच बेडस् माजी सैनिकासाठी रिझर्व्ह केल्यास, अपेक्षा करता त्यापेक्षा दुप्पट रक्कम मिळेल असे सागून, पुढे काय करायचे याचो कल्पना दिली. त्यानतर उस्मानाबादचे नगराध्यक्षानी डॉ. नेने याचे अगत्याने स्वागत करून शक्य तेवढा निधी गोळा करण्याचे आश्वासन दिले.

उस्मानाबाद जिल्ह्याचे जिल्हा कार्यकारी अधिकारीही कुलकर्णीच आहेत. 'सोनार, शिपी, कुलकर्णी अप्पा यांची सगत नको रे बाप्पा !' असे खेडोपाडी म्हटले जाते पण या दोन्ही कुलकर्ण्यांनी ते खोटे ठरविले. अत्यत मिस्किल आणि विनोदी असलेले कार्यकारी अधिकारी कुलकर्णीसाहेबानी कॅन्सर हॉस्पिटलच्या कामाकडे मात्र गंभीरतेने लक्ष दिले त्यानी निधी सकलनाचे काम योग्य तऱ्हेने मार्गी लागावे म्हणून जिल्ह्यातील सर्व कर्मचारी सघटनाच्या नेत्याची खास बैठक बोलावली होती. त्यात पद्धतशीरपणे योजना आखून दोन महिन्यात निधी सकलन करण्याचा निर्णय घेण्यात आला. 'दरवेळी आम्हालाच का मागता ? बार्शीचा आमचा संबध काय ?' हे किंवा इतर कसलेही प्रश्न या कर्मचारी नेत्यानी पुढे न करता अधिकाधिक निधी सकलनासाठी काय करायला हवे हे सुचविले आणि आपापला वाटा उचलला.

## खटकणारी गोष्ट

हे सर्व करीत असताना सर्वांच्या मनात एक गोष्ट खटकत होती. वास्तविक पाहता ती बाब सर्वांनाच जाणवत असावी. पण बोलून दाखविण्याचे धाडस भूम येथील मागासवर्गीय कर्मचारी सघटनेच्या एका नेत्याने– श्री. शिंदे यानी केले त्याच्याच शब्दात त्याची व्यथा देतो..............

'डॉ नेनेसाहेब करताहेत ते काम खूप चागले आहे. मोठे आहे. मानवाची सेवा करणारे आहे पण पैशासाठी स्वत: डॉक्टराना फिरावे लागते आहे ही गोष्ट खटकते. ढोलके बडवायचे डॉ. नेने यांनी, पैसे गोळा करायचे डॉ. नेने यानीच, तारेवरची कसरत करायची तीही डॉ. नेने यानीच. हे कितपत योग्य आहे ? डॉ. नेने याना आपल्या बुद्धीचा, कौशल्यांचा, वेळेचा, वैद्यकीय ज्ञानाचा उपयोग प्रत्यक्ष कॅन्सर हॉस्पिटलच्या कामात करू द्यायला हवा. शेवटी रुग्णालयातले काम महत्त्वाचे आहे जो काही निधी गोळा करायचा आहे तो त्यासाठीच आहे त्या ठिकाणी डॉक्टर स्वत. हवेत पैसे गोळा करण्यासारखे उद्योग इतरानी करायला हवेत.'

एवढे बोलून श्री शिंदे यानी डॉ. नेने यांच्या हातात व्यक्तिगत देणगी म्हणून शभर रुपयाची नोट दिली.

शिंदे यानी जे बोलून दाखविले ते खरेच आहे, पण डॉक्टर नेने आपला अमूल्य वेळ निधी सकलनासाठी खर्च करताहेत याची खंत शाळा मास्तरला, एखाद्या क्लार्कला किंवा शिंदे याच्यासारख्या कर्मचारी सघटनेच्या नेत्याला वाटून काय उपयोग ? ती वाटली पाहिजे सोलापूर–उस्मानाबाद भागातून निवडून गेलेल्या लोकप्रतिनिधीना, मत्रिमडळात या भागाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या मत्र्याना, या भागातील धनाढ्याना, उद्योगपतीना. उस्मानाबाद मागास आहे, सोडून द्या. पण सोलापूरचे काय ? सोलापुरात लक्ष्मी–विष्णु, जाम मिलसारख्या राष्ट्रीय पातळीवरील कापडगिरण्या आहेत; पुलगमसारखे चादर उद्योगात परदेशी नाव मिळविलेले शेकडो कारखाने आहेत. वालचंद ग्रुप, किर्लोस्कर इत्यादीचे किती तरी कारखाने आहेत. सोलापूर भागातले, पुण्या–मुबईत जाऊन स्थिरस्थावर झालेले बाबुरावजी पारखे यांच्यासारखे उद्योगपती आहेत. शेठ दामानीसारखे तीनदा लोकसभेवर निवडून जायचा विक्रम करणारे उद्योगपती आहेत. खत वाटली पाहिजे ती या लोकाना. दुःख व्हायला हवे ते या लोकाना दुर्दैवाची बाब अशी की भूम–पराडासारख्या सदैव दुष्काळाच्या छायेत वावरणाऱ्या तालुक्यानी जेवढा निधी दिला त्याच्या एक टक्का देखील रक्कम हे सोलापूर शहर देऊ शकलेले नाही.

उस्मानाबादहून परतलो तेव्हा रात्रीचे अकरा वाजले होते. जाताना डॉ. नेने आणि त्याच्या सहकाऱ्याना तीन ते चार लाख रुपये मिळतील असे वाटले होते; पण प्रत्यक्षात आश्वासने मिळाली सहा लाखाची. फेब्रुवारी–मार्चमध्ये मी संकलनाची सहज चौकशी केली तर सात ते साडेसात लाख रुपये गोळा झाल्याचे समजले. यावरून डॉ. नेने आणि त्याच्या सहकाऱ्यानी सुरू केलेल्या कार्याला लोक किती महत्त्व देतात हे लक्षात येते.

कॅन्सर हॉस्पिटलने कॅम्प घेतलेल्या काही खेड्यांना मी भेटी दिल्या. प्रथम मोबाईल व्हॅनबरोबर आणि नंतर स्वतत्रपणे. गावातले लोक, सरपच, तलाठी, ग्रामसेवक आणि रुग्ण याची मनोगते जाणून घेण्याचा प्रयत्न केला. या सर्व खेड्यातून फिरताना सर्वसाधारण लोकाना कॅन्सरविषयी बरीच माहिती झाली असल्याचे दिसून आले.

कुसळब, बार्शी–लातूर छोट्या रेल्वे लाईनवरील एक छोटे स्थानक. एस. टी. रोडवर येते. गावची एकूण लोकसख्या १०६९. त्यात पुरुष ५५७ आणि स्त्रिया ५१२ या गावात कॅम्प घेतल्यानतर तारामती रावसाहेब शिंदे यांना कॅन्सर असल्याचे स्पष्ट झाले त्याचा सध्या फॉलोअप चालू आहे. तारामतीबाईंनी डॉ. नेने याचा उल्लेख देवदूत असा केला 'बाबा हा देवदूत नसता तर मला कोणी वाचविले असते ?' असे ती म्हणाली

त्यानतर मी रास्तापूरच्या दत्तु भैरु बारबोले, म्हागावच्या इदुबाई भारत मोरे, पाथरीच्या कमल नारायण देशपांडे, शेळगावच्या पुतळाबाई गायकवाड याची भेट घेतली. या सर्वांच्या बोलण्यातून बार्शीच्या कॅन्सर हॉस्पिटल तसेच डॉ नेने याच्या विषयी अत्यत कृतज्ञता जाणवली. या सर्वच रुग्णानी बार्शीचे कॅन्सर हॉस्पिटल नसते तर आम्हाला मृत्यूला मिठी मारण्याशिवाय पर्याय नव्हता असे सागितले आणि त्यानी जे एकदर परिस्थितीचे वर्णन केले ते ऐकता ते खरेच होते. बार्शीचा कॅन्सर निदान कॅम्प झाला नसता तर कॅन्सर असल्याचे लवकर स्पष्ट झाले नसते आणि जेव्हा केव्हा ते लक्षात आले असते तेव्हा तो आटोक्याबाहेर गेला असता पुण्या–मुंबईला जाऊन औषधोपचार करून घेण्यासारखी परिस्थिती नसल्याने मृत्यूशिवाय या लोकाना कोणता पर्याय ?

## कामावरची निष्ठा, प्रेम

डॉ नेने यांनी प्रकल्प उभा करताना अनेक बारीक सारीक गोष्टीचा विचार करून निर्णय घेतलेले आहेत, हे प्रकल्पाची पाहणी करत असताना सहज लक्षात येते. हॉस्पिटलचे डॉक्टर असोत की वॉर्डबॉय की टेक्निशियन या सर्व लोकांची निवड करताना स्थानिक

लोकाना प्राधान्य दिलेले आहे. एक तर या लोकांना स्वतःच्या गावात राहायला मिळते म्हणून ते अधिक जाणीवेने काम करू शकतात, हा एक भाग झाला आणि दुसरा भाग नोकरी सोडून जाण्याचा प्रश्न येत नाही. पण हे करीत असताना डॉक्टरानी गुणवत्ता किंवा दर्जा याकडे अजिबात दुर्लक्ष केलेले नाही. डॉ. नेने याच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव म्हणा की कॅन्सर हॉस्पिटलमधील वातावरण म्हणा, नोकरी म्हणून कोणी कॅन्सर हॉस्पिटलच्या कामाकडे बघत नाही लोकासाठी आपण काम प्रामाणिकपणे केले पाहिजे या विचाराने हे लोक भारलेले आहेत. डॉक्टरापासून–वॉर्डबॉयपर्यंत अनेकाशी मी गप्पा मारल्या. त्यापैकी काहीच्या मुलाखती येथे देत आहे. त्यावरून हॉस्पिटलमधील बऱ्याच गोष्टी वाचकाच्या लक्षात येईल.

डॉ. प्रकाश डाळे हे एम. एस. आहेत. बार्शीचेच राहणारे आहेत. बार्शी कॅन्सर हॉस्पिटलमध्ये जॉईन झाल्यानतर एक वर्ष त्यानी मुबईच्या टाटा मेमोरियल हॉस्पिटलमध्ये ट्रेनिंग घेतले आहे. डॉ डाळे याची मी कॅन्सर हॉस्पिटलमध्येच भेट घेतली.

**ग्रामीण भागात आपण कशा पद्धतीने काम करता? ...मी**

. आपण हॉस्पिटलच्या आवारातील मोबाईल व्हॅन पाहिलेली असेलच. ही मोबाईल व्हॅन घेऊन आम्ही खेड्यात जातो. लोकाना समजेल अशा भाषेत कॅन्सर विषयीची माहिती देतो. नतर या व्हॅनमध्ये तपासणी होते. ......डॉ. डाळे

**तपासणीचे स्वरूप कोणते? म्हणजे मला असे विचारायचे आहे की तपासणीमध्ये आपण काय पाहता? किंवा काय तपासता?..... —मी**

. सर्वसाधारणपणे पेशटना कॅन्सरच्या सात लक्षणापैकी काही होतेय का, जाणवते का हे आम्ही विचारून घेतो. प्रथम जो फॉर्म भरून घेतलेला असतो त्यात रुग्णाची सपूर्ण माहिती असते. त्या अनुषगाने त्याच्या सवयी वगैरेची माहिती विचारून घेतो जीभ, घसा, काखेतल्या गाठी, पोट, छाती, मान या ठराविक ठिकाणी हाताने तपासून पाहतो.

**अशा वेळी एखादा संशयित कॅन्सर रुग्ण आढळल्यास काय करता? —मी**

: त्याची काळजीपूर्वक तपासणी केली जाते. ज्या अवयवाच्या कॅन्सरची शक्यता वाटते त्याचा एक्स रे फोटो घेऊन त्याची परत तपासणी केली जाते नतर कॅन्सरग्रस्त अवयवाची 'बायोप्सी' घेऊन ती पॅथॉलॉजी लॅबमध्ये तपासली जाते. त्यात कॅन्सर स्पष्ट झाल्यास त्या व्यक्तीला पत्र दिले जाते व उपचारासाठी बार्शीला बोलावले जाते.

**कॅन्सर वरील सर्व उपचार येथेच केले जातात का?**

'सध्या येथे पूर्व तपासणी, निदान केले जाते. काही ऑपरेशन्स येथे केली जातात. त्यासाठी प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या रविवारी मुबईहून टाटा मेमोरियलचे डॉक्टर्स येतात. सध्या येथे कोबाल्ट युनिटची सोय नाही. ते आल्यानंतर शेक देण्याची व्यवस्था होईल.

**मग शेक देण्यासाठी सध्या काय करता?**

आम्ही पेशंटबरोबर डॉक्टराना पत्र देतो. त्याप्रमाणे टाटा मेमोरियलमध्ये जाऊन ते शेक घेतात

**कॅम्पसमधील रुग्णांच्या प्रकृतीतील चढउताराची नोंद कशी घेतली जाते?**

· फॉलोअप कॅम्पसमधून आम्ही त्याची नोद घेतो.

**टाटा मेमोरियलमधील प्रशिक्षणामुळे नवीन काय माहिती मिळाली?**

: सर्वसाधारण रुग्णाना तपासताना डॉक्टर ज्या गोष्टी पाहतात त्याच गोष्टी कॅन्सरमध्येही पाहतात; पण तपासणी करताना कॅन्सरच्या दृष्टिकोनातून तपासणी करावी लागते . टाटा मेमोरियल हे पूर्णपणे कॅन्सर हॉस्पिटल असल्याने तेथे येणारा प्रत्येक रुग्ण कॅन्सरचा असतो. कॅन्सर रुग्ण कसा ओळखावा, कसा तपासावा याची माहिति तेथे दिली जाते. तेथे मिळालेल्या प्रशिक्षणामुळे आम्ही चटकन कॅन्सरचे निदान करू शकतो.

**आपण टाटांकडे किती दिवस होतात?**

: पूर्णपणे एक वर्ष.

**ग्रामीण भागात काम करताना काही अडचणी जाणवल्या का?**

: अज्ञान, दारिद्र्य, पारंपारिक समजुती यामुळे रुग्ण सहजासहजी तपासून घ्यायला तयार नसतो पण आमच्या मागील तीन वर्षातील कामाच्या सातत्यामुळे परिस्थिती बदललेली आहे. लोक स्वतः होऊन तपासून घ्यायला लागले आहेत. सुरुवातीला समजावून सागण्यासाठी जी आरडाओरर्ड करावी लागत होती ती आता करावी लागत नाही.

बराच वेळ गप्पा होऊन मी डॉ. डाळे याचा निरोप घेतला व सायटॉलॉजी विभागाकडे वळालो. हा भाग डॉ. सौ. डी. एस्. देशपांडे साभाळतात. भारतात स्त्रियाच्या गर्भाशयाच्या कॅन्सरचे प्रमाण अधिक आहे. त्यामुळे एकदर कामापैकी बराच मोठा भाग त्याच्याकडे आहे. त्या एम्. एस्सी. आहेत. लेक्चररशिप नाकारून त्यानी बार्शी कॅन्सर हॉस्पिटलची अपॉईंटमेंट स्वीकारलेली आहे. मी त्याची भेट घेतली त्यावेळी त्या बऱ्याच गडबडीत होत्या. पण सा. माणूसकडून आलो आहे असे सागितल्यानतर त्यानी काम बाजूला ठेऊन माझ्याशी गप्पा मारल्या.

**आपण एम् एस्सी. फर्स्टक्लास आहात आणि लेक्चररशिप सोडून इकडे आला आहात असे समजले.**

: हो! ते खरे आहे.

**लेक्चररशिप नाकारून येथे येण्याचे कारण कॅन्सर हॉस्पिटलने जास्त पगार देऊ केला म्हणून की बार्शी भागातल्याच आहात म्हणून?**

. पगाराबद्दल म्हणाल तर येथला पगार कमीच आहे., पुढे—मागे वाढेल, नाही असे नाही. पण अॅपॉईंटमेंट स्वीकारताना तरी तो दृष्टिकोन नव्हता. मी बार्शी भागातलीच असल्यामुळे कॅन्सर हॉस्पिटलला प्राधान्य दिले हे खरे असले तरी कामातील चॅलेंजिंगचा भाग आहेच ना!

**आपण कॅन्सर निदानाचे ट्रेनिंग कुठे घेतले?**

: टाटा मेमोरियलला.

**स्वतःच्या खर्चाने?**

: नाही! सस्थेच्या खर्चाने.

**ट्रेनिंगचा कालावधी किती होता?**

: एक वर्षाचा! ८३–८४ या काळात मी तिथे होते.

**ट्रेनिंगमध्ये मिळालेल्या माहितीचा येथे काही उपयोग होतो का ?**

: हो होतोना ! स्त्रियांची तपासणी करताना कॅन्सरच्या दृष्टि-कोनातून तपासणी कशी करावी याचे ट्रेनिंग टाटा मेमोरियलमध्ये मिळाले. वर्षा–दीड वर्षानंतर कॅन्सर होऊ शकेल अशा केसेस आम्ही आता चटकन ओळखू शकतो.

**आतापर्यंत अशा किती केसेस आढळल्या आहेत ?**

: १५ ऑगस्ट ८२ ते जानेवारी ८६ या काळात ५३८४ केसेस गर्भाशयाच्या कॅन्सरच्या तपासल्या.

**लहान मुलांना अंगावर दूध पाजण्याबद्दल बरेच उलटसुलट मत-प्रवाह आहेत. याबाबतीत आपले काय मत आहे ?**

: इतर आरोग्याच्या दृष्टीने त्याचे नेमके काय फायदे तोटे आहेत हे मला सांगता येणार नाहीत पण कॅन्सरच्या बाबतीत म्हणाल तर अंगावर दूध पाजल्यानंतर कॅन्सरची शक्यता कमी असते.

**ग्रामीण भागातील कामाचे अनुभव सांगता येतील का ?**

: प्रथम प्रथम स्त्रिया तपासून घ्यायला तयार नसत. कित्येक वेळा अक्षरशः पाय झाडीत, तपासणी व्हॅनमधून निघून जात. त्यांची समजूत काढून त्यांना तपासणे हे काम फार अवघड असे पण आता परिस्थिती बदललेली आहे. कॅन्सरच्या सात लक्षणांपैकी एखादा जरी त्रास जाणवू लागला तरी स्त्रिया बार्शीला तपासून घ्यायला येतात.

**याचा अर्थ तपासणीबरोबरच लोकशिक्षणही महत्त्वाचे आहे असा होस नाही का ?**

: हो ! लोकशिक्षण महत्त्वाचे आहे. तपासणी त्यांच्यावर लादण्या-पेक्षा लोकांना कॅन्सरची गंभीरता लक्षात आणून देणे महत्त्वाचे आहे. कुत्रे चावले की लोक आज जसे आपोआप इंजेक्शन घेण्यासाठी धावतात तसे कॅन्सरची तपासणी करून घेण्यासाठी लोक आपोआप यायला हवेत.

सौ. देशपांडे यांच्यानंतर डॉ. एम्. एम्. वैद्यांना भेटायला गेलो, पण ते होते ऑपरेशन थिएटरमध्ये. त्यानंतर सतत दोन–तीन वेळा त्यांना भेटायचा प्रयत्न केला पण काही ना काही कारणांनी भेट व्हायची नाही आणि एक दिवस त्यांची अचानक भेट झाली ती डॉ. पी एस्. बच्चुवार यांच्या दवाखान्यात. तेथेचे अगदी घाई–गडबडीत चर्चा झाली.

**मी आपल्याला दोन-तीनदा भेटण्याचा प्रयत्न केला, पण भेट झाली नाही म्हणून येथेच काही प्रश्न विचारतो चालेल ना ?**

: हो ! तुम्ही येऊन गेल्याचे मला समजले, एकदा डॉ. नेने यांनी मला तुमच्याबद्दल सांगितले होते. मला वाटते तुम्ही एकदा ऑपरेशन थिएटरमध्ये पण आला होतात का ?

**हो काही फोटो घ्यायचे होते ?**

: त्यावेळी मी डॉ. कश्यपी यांना विचारले पण त्यांनी परिचय नसल्याचे सांगितले असो. विचारा काय विचारायचे ते.

**आपण बार्शीचेच रहिवासी का ?**

. नाही, मी सोलापूरचा आहे. कॅन्सर हॉस्पिटलमध्ये अॅपॉईन्टमेंट मिळाली म्हणून येथे आलो आहे.

**यापूर्वी कॅन्सर हॉस्पिटल अगर इन्स्टिट्यूटशी संबंध वगैरे ?**

: नो ! धीस इज फर्स्ट टाईम.

**कॅन्सर निश्चित बरा होऊ शकतो का ?**

: हो कॅन्सर बरा होऊ शकतो परंतु अर्ली डिटेक्शन इज द मोस्ट इंपॉर्टंट थिंग. लवकर निदान झाले तरच कॅन्सर बरा होऊ शकतो. डायग्नोसिस, स्क्रिनिंग, सर्जरी, टेलीथेरेपी आणि ईम्युनो थेरपी या सर्वांची औषधोपचारात सांगड असली तरच कॅन्सर बरा होऊ शकतो.

**कॅन्सर निदानासाठी कोणती टेस्ट उपयोगात आणली जाते ?**

: शरीरात कॅन्सर आहे किंवा नाही हे वरून कळू शकेल अशी कोणतीही टेस्ट नाही. कॅन्सर निदान करण्यास तज्ज्ञ व अनुभवी डॉक्टरांची आवश्यकता असते. शरीरातील ठराविक ठिकाणांची तपा-सणीनंतर बायोप्सी घेतात. शरीरातील नेमक्या कोणत्या भागाचा तुकडा काढावयाचा हा निर्णय महत्त्वाचा असतो. त्याकरिता काळजी-पूर्वक शारीरिक तपासणी बरोबर योग्य त्या लॅबोरेटरी व क्ष किरण तपासणीच्या आधारे हा निर्णय करावा लागतो.

**कॅन्सर होऊ नये यासाठी कोणती खबरदारी घ्यावी ?**

: कोणताही त्रास होत नसताना देखील वर्षातून एकदा डॉक्टर-कडून तपासणी करून घेणे आवश्यक आहे. कित्येकवेळी कोणताही त्रास नसताना तपासणीत कॅन्सर आढळून येतो अशावेळी तो अगदी प्रथम अवस्थेत असण्याचा संभव फार मोठा म्हणूनच तो संपूर्ण बरा होण्याची शक्यता अधिक.

***सर्वच प्रकारचे कॅन्सर धोकादायक असतात का ?***

सर्व प्रकारचे कॅन्सर धोकादायक असतात. धोकादायक या अर्थाने की त्याचा त्रास होतो. अपंगत्व स्वीकारावे लागते. पण त्यामुळे मृत्यू येतो असे मात्र नव्हे. उदाहरणार्थ धोतर, परकर किंवा चड्डया कर-कचून आवळण्याने देखील कॅन्सर होतो. पण त्यामुळे मृत्यू येतो असे नव्हे पायाला, तळ पायाला कॅन्सर होतो. कित्येकवेळा अवयव निकामी होण्याने अपंगत्व येऊ शकते.

गप्पा मारीत असतानाच चहा आला. अर्धा तास संपून गेलेला होता, एक डिलिव्हरी केस तपासायची असल्याने डॉक्टरांना जायचे होते म्हणून त्यांचा निरोप घेतला.

डॉ. वैद्य यांच्या भेटीनंतर कॅन्सर हॉस्पिटलवर चक्कर मारली. कु अरुणा कुलकर्णी, नियामत, टी. एम. महामुनी, आर एम. मेहता वगैरे कर्मचाऱ्यांशी गप्पा मारल्या. कॅन्सर हॉस्पिटलमधील वॉर्डबॉय असो की क्लार्क, प्रत्येकजण डॉ नेने यांच्या तालमीत तयार झालेला आहे जगण्यासाठी प्रत्येकाला पैसा लागतो पण त्यासाठी प्रामाणिक-पणे काम करण्याची वृत्ती किती जणांपाशी असते ? आपण घेतलेल्या पगाराचा मोबदला प्रामाणिकपणे काम करून दिला पाहिजे ही जाणीव मला येथे काम करणाऱ्या प्रत्येक कर्मचाऱ्यात दिसून आली.

## कामाचे तास, किमान सुखसोयी, पगार

सामाजिक संस्था चालविणारे, संस्थाचालकांच्या समाजसेवेचे सर्वत्र कौतुक होते त्यांचा हातंतुरे घालून सत्कार होत असला तरी प्रत्यक्ष संस्थेत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यावर मात्र नेहमीच अन्यायाला तोंड देण्याची पाळी येते कमी पगारात दिवस दिवस राबावे लागते. कित्येकवेळा पगार चारशे रुपये सहीही चारशे रुपयावर. पण प्रत्यक्ष हातात दोनशेच रुपये. माझ्या शैक्षणिक जीवनात औरंगाबाद येथील एका नामवंत वाचनालयात मी असा एक–दोन नव्हे तर चांगला

चार वर्षे रखडलो. सुदैवाने येथे ती पाळी नाही. पण आहे ते पगार पुरेसे आहेत असे मात्र म्हणता येत नाही. 'सब घोडे बारा टक्के' या न्यायाने शासनाच्या किमान वेतन कायद्यानुसार प्रत्येक कर्मचाऱ्याला (डॉक्टर सोडून) पाचशे रुपये पगार दिला जातो. क्लार्कला पाचशे त्याप्रमाणे व्हॅन ड्रायव्हरलाही पाचशेच रुपये मिळतात. आजकाल साठ-सत्तर हजार रुपयाचा टॅम्पो चालविणाऱ्या ड्रायव्हरला देखील कमीत कमी चारशे रुपये पगार व पधरा रुपये दैनदिन भत्ता मिळतो. मोबाईल व्हॅनसारखी आठ लाख रुपये किमतीची गाडी चालविणाऱ्या ड्रायव्हरने पाचशे रुपयात काय करावे ? एक्सरे मशीन हाताळणे हे साधे काम नाही. एक्सरे टेक्निशियनला किमान सातशे—आठशे तरी पगार असायला नको का ? या सर्व लोकांना कामाचे वेळेचे नियम नाहीत. सकाळी १० पासून रात्री अकरापर्यंत केव्हाही काम. कॅम्प किंवा कार्यक्रमाच्यावेळी तर चोवीस तास सस्थेच्या दावणीला बाधल्याप्रमाणे राबावे लागते, ही गोष्ट नाकारण्यात अर्थ नाही. कॅन्सर हॉस्पिटलमध्ये प्रत्यक्ष काम करणारे हे लोक आहेत. डॉक्टरपासून शिपायापर्यंत सर्वांना शासकीय नोकराप्रमाणे भरपूर पगार मिळायला हवा. त्याना रहाण्याच्या सुविधा मिळायला हव्यात. कर्मचारी वर्ग सुखी समाधानी असेल तरच व्यवस्थित काम करू शकेल हे सस्था चालकानी लक्षात घ्यायला हवे. सस्थेच्या सध्याच्या आर्थिक ओढाताणीमुळे कर्मचाऱ्यांना भरपूर पगार देण्यात काही अडचणी येत असतील, नाही असे नाही. पण संस्थाचालकानी या बाबतीत पगार वाढीचा निश्चित कालावधी स्पष्ट करून कर्मचाऱ्याना विश्वासात घ्यायला नको का ?

## काही त्रुटी

कर्मचाऱ्याना मिळणाऱ्या कमी वेतनाप्रमाणेच संस्थेच्या कामात काही त्रुटीही जाणवल्या. अर्थात या अगदी क्षुल्लक आहेत पण मला त्या खटकल्या.

कॅन्सर हास्पिटल—हिरेमठ हॉस्पिटलच्या पुढे चार-पाच किलोमीटरवर आहे, कथले ट्रस्टचे ऑफिस कथले यांच्या बंगल्यात तर अश्विनी सोसायटीचे वसतराव गाडेकरांच्या बगल्यात हे सर्व वेगवेगळ्या दिशेला असल्याने रुग्णालयातील कामकाज, सस्थेचे कामकाज आणि सस्था पदाधिकारी याच्या कामात समन्वय आढळला नाही.

आजच्या जगात वृत्तपत्रे ही प्रसिद्धीची नव्हे तर लोकापर्यंत पोचण्याची साधने बनलेली आहेत. अशावेळी संस्थेच्या कामकाजाविषयी योग्य तो मजकुर पत्रकाराना देऊन लोकापर्यंत माहिती पोचविण्याची जबाबदारी सस्था चालकाचर पडते. सस्थेकडे पी. आर ओ. नाही किंवा प्रसिद्धीची जबाबदारी कोणावर एकावर नाही. त्यामुळे बऱ्याच वेळी बऱ्याच गोष्टी अनावश्यकपणे छापल्या जातात. तसेच कर्मचारी डॉक्टर, सस्थाचालक, सस्थेचे पदाधिकारी यांनी दिलेल्या माहितीत एकवाक्यता नसते. कोणाचाही खोटी माहिती देण्याचा हेतू नसतो. हे खरे असले तरी घडते मात्र तसे. त्यामुळे वाचकाच्या मनात गोंधळ उडतो.

एक उदाहरण देता येईल ते म्हणजे मोबाईल व्हॅनचे ही व्हॅन आहे सात लाख रुपये किमतीची. पण त्याची माहिती देताना सात, आठ, नऊ, दहा, अकरा अशी सांगितली गेली. साहजिकच वृत्तपत्रेही तशीच छापतात. अर्थात ही बाब छोटीशी आहे. पण प्रत्येक वृत्तपत्रात वेगवेगळा आकडा येण्याने विश्वासार्हता उडते. असे अनेक बाबतीत घडलेले आहे. वृत्तपत्राना पुरविल्या जाणाऱ्या माहितीत एकवाक्यता नसते. हा अनुभव माझ्याप्रमाणेच इतर पत्रकारांनाही आलेला आहे.

कॅम्प ज्या गावी असेल त्या दिवशी त्या गावातील ३५ वर्षांच्या पुढील एकूण एक माणूस उपस्थित राहील या दृष्टीने योग्य ते प्रयत्न होत नसल्याचे मला आढळून आले. हजर असतील त्यानाच तपासले जाते. आपल्याकडे अद्याप कॅन्सरविषयक लोकशिक्षण नाही हे खरे आहे त्यामुळे काही काळ तरी आवर्जून लोकाना हजर राहण्यास भाग पाडले जावे.

या झाल्या काही त्रुटी. अर्थात या काही फार गभीर आहेत असे नव्हे पण जाणवल्या त्या मी स्पष्टपणे माडल्या. काही सूचना पण मला करायच्या आहेत. त्यातली पहिली म्हणजे कॅन्सरविषयक माहितीपटाची. कॅम्पच्या आदल्या रात्री खेड्यात संस्थेने कॅन्सरविषयक माहितीपट दाखवावा. त्यामुळे जनजागृती होईल. सुनील दत्त हे सस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सन्माननीय सभासद आहेत हॉस्पिटलच्या कामात मनापासून भागही घेत असतात तेव्हा त्याचा 'दर्द का रिश्ता' टॅक्स फ्री चित्रपट दाखवून त्यासोबत कॅन्सरविषयक माहितीपट दाखवायला काहीच हरकत नाही या चित्रपटाची फिल्म मिळविणे व प्रोजेक्टर खरेदी करणे सस्थेला अवघड नाही. त्यामुळे लोकाची करमणूक होईल व माहितीही मिळेल हे दोन्ही उद्देश साध्य होतील.

दुसरी सूचना अशी — ही सस्था आतरराष्ट्रीय पातळीवर पोचलेली असल्याने,सस्थेचे अहवाल, फॉर्म्स वगैरे लोकापर्यंत पोचणारी साहित्य-साधने फक्त मराठीतच छापावीत असे म्हणता येणार नाही, हे खरे आहे. पण इंग्रजी, हिंदी, मराठी या तिन्ही भाषाचा उपयोग त्यानी करायला काहीच अडचण नाही. सस्थेचे कार्य सर्वसामान्य लोकाना समजले पाहिजे. त्यासाठी मराठी हवे. दुसरे असे कार्य देशात सर्वत्र व्हावे म्हणून हिंदी व इंग्रजीचा वापर केला जावा.

बार्शीत आल्यापासून कथले दापत्याची भेट घ्यायला मी विशेष उत्सुक होतो. अनेक माणसे श्रीमत असतात गर्भश्रीमंत असतात. पण प्रत्येकाच्या पोटी वंशाचा दिवा येतो असे नाही. अशा वेळी मनातल्या मनात कुढत राहायचे, समाधानासाठी कोणाला तरी दत्तक घेऊन आपल्या इस्टेटीचे वारसदार नेमायचे हा जगाचा आजपर्यंतचा रिवाज. पण एका डॉक्टरला पुत्रवत मानून त्याने उभ्या केलेल्या कार्यासाठी सर्वस्वाचे दान करणारे कथले कुटुंब वेगळेच अशा दापत्याला भेटण्याची उत्सुकता न वाटल्यासच नवल.

## मी आता निश्चित आहे—कथले

सिल्व्हर ज्युबिली हायस्कूलच्या रोडवरील त्यांच्या बगल्यात पोचलो तेव्हा दोघेही पतिपत्नी समोरच होते सायकाळची निवांत वेळ असल्याने हळूहळू गप्पा रगतच गेल्या.

**आपले शिक्षण कुठपर्यंत झालेले आहे ?**

: इंग्रजी चौथी म्हणजे हल्लीची मॅट्रिक.

**आपला व्यवसाय कोणता ?**

: माझा व्यवसाय शेतीचा. पण शेती किंवा इस्टेट मी मिळवलेली नाही. ती वडिलोपार्जित आहे.

**आपल्याला बहीण-भाऊ किती ?**

: कोणी नाही. मी एकटाच आहे. मी नऊ महिन्याचा असतानाच वडील वारले आई दोन वर्षांपूर्वी वारली.

**वहिनींचे शिक्षण कोठपर्यंत झालेले आहे ?**

. ती इग्रजी दुसरी पास आहे. म्हणजे आताची सातवी.

**राजकारणात भाग वगैरे घेत असता की नाही ?**

: होय. मी १९५५ पासून बार्शी नगरपालिकेचा सभासद आहे. १९६१ साली नगराध्यक्ष होतो.

**तुम्ही एखादा दत्तक का घेतला नाहीत ?**

: तुम्ही पाहताच आहात, मला साधे जमिनीवरदेखील बसता येत नाही आठ-नऊ वर्षांपूर्वी डाव्या पायाला एका जखमेचे निमित्त होऊन पाय सुजला आहे चालता येत नाही. पत्नीशिवाय मला कोणाचाच आधार नाही. १९७२ मध्ये तिलाही अर्धांगवायूचा तीव्र झटका आला होता आणि तेव्हापासून तीही आजारी आहे. हे सर्व खरे असले तरी 'दत्तक' या नावाच्या मृगजळामागे लागायची माझी इच्छा नाही.

**मृगजळ कसे म्हणता ? वृद्धापकाळाचा तो हक्काचा आधार आहे. भविष्याची सोय आहे.**

मृगजळ नाही तर काय ? स्वत च्या भावी सुखासाठी म्हणून आपण संपत्ती त्याच्या हवाली करायची. पण त्याने त्याचा योग्य विनियोग करून आपल्याला आधार दिला तरच ना ? बापाला बाप आणि आईला आई न म्हणणाऱ्याचे हे जग आहे. आयत्या इस्टेटीने वाहवत गेलेली अनेक माणसे मी पाहिलेली आहेत. पण आम्हाला दत्तकाची गरजच काय ? प्रत्यक्ष पोटचा मुलगा करणार नाही एवढी आमची सेवा डॉ. नेने करताहेत. डॉ. नेनेंच्या रूपाने आम्हाला मुलगा लाभला आहे तेव्हा दत्तकाची गरजच काय ?'

**ट्रस्टची कल्पना कशी सुचली ?**

त्याचे काय झाले की, आजारीपणाच्या निमित्ताने डॉ. नेने आमचे आमचे फॅमिली डॉक्टर बनले. मी तर आजारी होतोच पण पत्नी, शिवाय आईपण आजारी होती. रोज कोणी ना कोणी सिरियस असायचे. डॉ. नेने याचा मनमिळावू स्वभाव, सेवाभावी वृत्ती, प्रामाणिकपणा आम्हाला जाणवला सुरुवातीला त्याना वेळ असायचा तास-तास ते आमच्याशी गप्पा मारीत बसायचे. त्यात १९७२ मध्ये पत्नीला फार मोठा पॅरलिसिसचा अॅटॅक येऊन ती विकलाग बनली. डॉ. नेने यानी तिला बरे केल्यामुळे साहजिकच आमचा आदरभाव वाढला. डॉक्टराना काही तरी भेट रूपाने द्यावे अशी पत्नीची व माझी इच्छा होती. तसे आम्ही डॉक्टराना अनेक वेळा बोलून दाखविले पण डॉक्टर प्रत्येक वेळी नकार देत. मग इस्टेटीचे काही तरी करा म्हणून आम्ही त्याच्या मागे लकडा लावला तेव्हा त्यानी ट्रस्टची कल्पना माडली.

**कॅन्सर हॉस्पिटलचा प्रकल्प कसा काय पुढे आला ?**

. ट्रस्ट स्थापन करून त्यातून काही तरी सामाजिक कार्य करू म्हणून डॉक्टरानी आम्हाला गप्प बसविले तरी आमचा त्याच्यामागे सारखा लकडा असायचाच. टी बी. सॅनोटेरीयम, लेप्रसी सेंटर इत-केच काय पण वृद्धाश्रमासारखी एखादी सस्था उभी करण्याच्या दृष्टीने आमच्यात चर्चा झाली गोरगरीब लोकासाठी काहीतरी करावे या कल्पनेने डॉ. नेने नेहमी झपाटलेले असत. अशातच एक दिवस त्यानी कॅन्सर प्रकल्पाचा विचार माडला. आम्ही मान्यता देण्याचा प्रश्नच नव्हता. उलट डॉक्टरानी त्या निमित्ताने चटकन कामाला सुरुवात केली याचाच आम्हाला आनद वाटला.

**ट्रस्ट स्थापन करण्यामागे स्वत चे नाव मोठे व्हावे असा तर आपला हेतु नाही ?**

: स्वार्थ प्रत्येकाला असतो. तसा मीपण स्वार्थी आहे. नाही कसे म्हणावे ? माझ्या इस्टेटीतल्या हिश्यावर हक्क म्हणून नाव मिळवण्याची माझी इच्छा नाही. मी माझ्या नावाचा ट्रस्ट केलेला नाही तर आयुष्यात माझ्या प्रत्येक सुखदु खात सहभागी असलेल्या अपग पत्नीच्या नावे ट्रस्ट केलेला आहे. माझी इस्टेट कुठे जाणार नाही. आहे तिथेच राहणार आहे. फक्त ती साभाळण्याची जबाबदारी डॉ. नेने, दादासाहेब गाडेकर, डॉ. कश्यपी, प्रभाताई झाडबुके याच्यावर विश्वस्त म्हणून सोपविली आहे. एक प्रकारे मी माझ्या कुटुबाचा विस्तार वाढविला आहे. या सर्व मडळीच्या सानिध्यामुळे मी निश्चित बनलो आहे. डॉ. नेने या प्रकल्पाच्या निमित्ताने सानिध्यात आलेले आहेत. त्यामुळे आम्हाला प्रकृतीच्या बाबतीत काळजी करण्याचे कारण उरलेले नाही. एक प्रकारे हा स्वार्थच नाही का ?

**कॅन्सर हॉस्पिटलला दिलेली सात एकर जमीन पडीक होती. त्यातले बंगले पडलेले होते. तुमच्या दृष्टीने निरुपयोगी होते, त्याची देखभाल करणे शक्य नव्हते म्हणून तर हे दिलेले नाही ना ?**

: हे पहा काळेसाहेब मी आहे अपंग माणूस. कोणत्याही प्रकारे हालचाल करू शकत नाही. इस्टेटीची देखभाल करणार ते सर्व नोकर चाकर. पैशानी सर्व काही विकत मिळत असले तरी प्रामाणिकपणा विकत घेता येत नसतो. नोकरानी शेतीकडे नीट लक्ष न दिल्याने जमीन पडीक पडली. बगल्याची पडझड झाली; पण ती निरुपयोगी इस्टेट होती असे नाही. तुम्ही पाहताच आहात की आज त्याभागात सात रुपये स्क्वेअर फुट भाव आहे. त्या हिशेबाने एकदर नऊ एकर जमिनीची किंमत काढा त्यात भरपूर पाणी असलेली, चिरेबदी बाधलेली विहिर आहे. शिवाय दोन बगले. त्या एकेका बगल्याची किंमत लाख लाख रुपये आहे निरुपयोगी असती तर त्याचा कोणी स्वीकार केला नसता मुळात मी ती इस्टेट कोणाच्या आग्रहाखातर दिलेली नाही तर प्रेमापोटी दिलेली आहे डॉ. नेने याना दिलेली आहे. हक्काच्याच गोष्टी बोलायच्या तर त्यावर केवळ हक्क आहे तो डॉ. नेने याचा. डॉ. नेने याच्या प्रकल्पाची व्याप्ती लक्षात घेतल्यानतर एवढया मामुली इस्टेटीत हा प्रकल्प उभा राहणार नाही याची खात्री पटली म्हणूनच माझ्या मातोश्री कै. लक्ष्मीबाई-उर्फ दादीच्या नावे असलेली शेलगाव येथील ५६ एकर जमीन मी ट्रस्टला दिली आहे

**कॅन्सर हॉस्पिटल शिवाय आपण अन्य कोणकोणत्या संस्थेला देणगी दिलेली आहे ?**

फार मोठ्या देणग्या मी कोणत्या सस्थेला वगैरे दिलेल्या नाहीत. साहित्य मंडळाच्या हॉलला ५१ हजार आणि विरशैव लिंगायत बोर्डिंगला ५१ हजार अशा दोनच मोठ्या देणग्या मी दिलेल्या आहेत.

**तुमच्या नावावर अजून काही जमीन अगर इस्टेट असेल ना ?**

: माझ्या नावावर जमीन वगैरे काही नाही. होती ती ५६ एकर जमीन मी विकून टाकून तो पैसा मी बँकेत फिक्स्ड डिपॉझिटमध्ये

ठेवला आहे त्यातून मिळणाऱ्या व्याजातून माझा चरितार्थ चालतो. हा बगला माझ्या नावावर आहे. माझा एक चुलत भाऊ होता वडील वारल्यानतर त्या चुलत भावाने माझे प्रामाणिकपणे पालन केले. त्याची चार मुले आहेत. त्या चार मुलाना हा बगला, बँकेतील रक्कम वगैरे माझ्या नावावर असलेली इस्टेट वाटून देणार आहे. आता आम्हाला काय करायची इस्टेट आणि पैसा ? दोन वेळ पोटाला मिळाले म्हणजे बस कॅन्सर हॉस्पिटल असलेल्या शेतात माझ्या वडिलाची, आईची समाधी आहे. तेथे आम्हाला अखेरची विश्राती घेता यावी एवढी च जागा मी ठेवली आहे. आमची शाश्वत इस्टेट पचमहाभूतात विलीन झाल्यानतर कॅन्सरमुक्त रुग्णाच्या जीवनातील आनदाचे क्षण हेच आमचे पुण्य. तोच आमचा ठेवा. हा ठेवा चिरंतन लाभावा हीच परमेश्वराजवळ प्रार्थना.

आमच्या बराच वेळ गप्पा चालल्या होत्या. गप्पाच्या नादात दोघाच्याही आवाजात चढ-उतार होत होते पण दु खाची छटा मात्र कुठेच आढळली नाही आपण अपग आहोत, निपुत्रिक आहोत या दु खाचा अगदी लवलेश देखील त्याच्या चेहऱ्यावर दिसला नाही. नवविवाहित जोडप्याने आपल्या नूतन ससाराची मांडामांड करण्यात गर्क व्हावे इतक्या तन्मयतेने कथलेदापत्य वयाच्या साठाव्या वर्षी एक आगळा वेगळा कॅन्सर हॉस्पिटल ससार उभारण्यात मग्न झालेले दिसले आज येथे कॅम्प झाला. उद्या तेथे आहे. परवा टाटा मेमोरियलचे डॉक्टर ऑपरेशनसाठी येणार आहेत त्याची व्यवस्था झाली का ? कोबाल्ट युनिट उभारण्याबाबत डॉ. देसाईचे पत्र आले आहे, पुढील महिन्यात भेटीस येत असल्याबद्दल सुनीलदत्तचा निरोप आहे. वगैरे वगैरे, हीच याच्या नव्या ससाराची मांडामांड कार्यक्रमाच्या निमित्ताने होणारी धावपळ हीच यांच्या नव्या ससारातील लग्नकार्यातील जणू धावपळ चहा आला. चहा घेऊन होताच एक वेगळे घर, एक वेगळा ससार पाहायला मिळाल्याच्या आनदात बाहेर पडलो.

## सुनीलदत्त आणि बार्शीकर

बार्शीत भटकताना एक गोष्ट जाणवली ती म्हणजे खा सुनील दत्त याच्या विषयीची अनास्था. आजकाल बार्शीकर त्याच्या विषयी फारसे प्रेमाने बोलत नाहीत. तीन-चार वर्षापूर्वी सुनील दत्त आणि नर्गिस दत्त हे बार्शीतील लोकाचे प्रेमदैवत होते. पानपट्टीसमोर चाललेल्या टवाळाच्या गप्पा असोत की, कात्रीबरोबर तोंड चालविणाऱ्या न्हाव्याची बडबड. त्यात सुनील दत्त आणि नर्गिस दत्त याचे विषय हमखास ठरलेले असत मग आताच काय घडले ? बार्शीकर नाराज का झाले ?.. सुनील दत्तवर बार्शीकर नाराज होण्याची कारणे शोधत असताना एक दिवस बार्शीतून निघणाऱ्या दै. भगवत समाचार या लहान वृत्तपत्राचा अक हाती आला. वर्षापूर्वी खा. सुनील दत्त यानी बार्शी कॅन्सर हॉस्पिटलला भेट दिली होती. त्यावेळी डॉ. नेने यानी सुनील दत्त याच्या समवेत पत्रकार व प्रतिष्ठित नागरिकाना चहापाण्यासाठी निमंत्रित केले होते. हा कार्यक्रम राजेन मिलमध्ये आयोजित केला होता या चहापानाच्या वेळी दै. भगवत समाचारचे सपादक श्री रामभाऊ पवार आणि सुनील दत्त याच्यात जी बातचीत झाली ती भगवत समाचारने छापली होती. त्यावरून सुनील दत्तवर बार्शीकर नाराज का आहेत हे लक्षात येते.

**आपण येथील कर्करोग दवाखान्यासाठी मोठी देणगी देणार होतात ना ? -रामभाऊ पवार**

: मी काही लक्षाधीश नाही त्यामुळे देणगी कशी देणार ? सुनीलदत्त.

**आपण आपली पत्नी नर्गिस दत्त हिचे नाव दवाखान्यास देण्यास सिनेकलावंतांचा प्रयोग करून त्यातील मिळणारे सर्व उत्पन्न दवाखान्यास देणार होता ना ? रामभाऊ पवार**

: नाव देण्याचा आग्रह मी कधीच धरला नव्हता व सिनेकलावताचे कार्यक्रमाच्या माध्यमातून मोठी रक्कमही देणार असे कधीच कबूल केले नव्हते.

**आपण देणगीचे आश्वासन दिल्याचे सर्वत्र बोलले जात आहे- -रामभाऊ पवार**

: तसे आश्वासन मी कधीही दिले नव्हते व देणार नाही - सुनीलदत्त

**मग आपण या दवाखान्यासाठी काही करणार की नाही ? -रामभाऊ पवार**

: ( हसत ) हा मी आता एक फिल्म काढणार आहे. त्याच्या उत्पन्नातून काही देईन व ५ रुग्णाची सोय करीन- सुनील दत्त.

सुनीलदत्तने हॉस्पिटलला नाव देण्याचा आग्रह धरून मोठी देणगी देण्याचे कबूल केले होते व ऐनवेळी माघार घेऊन विश्वासघात केला असा बार्शीकराचा गैरसमज झालेला आहे. सुनीलदत्तने काय कबूल केले ? नर्गिस दत्त नाव कसे काय पुढे आले ? याचा शोध घेण्यासाठी मी लता टॉकीजचे मालक श्री. मदन चव्हाण याना गाठले. मदन चव्हाण याच्या ओळखीनेच डॉक्टर सुनीलदत्तपर्यंत पोचले असे समजल्यावरून वस्तुस्थिती जाणून घेण्यासाठी मी त्याची भेट घेतली. डॉक्टराबरोबर उस्मानाबादला गेलो होतो तेव्हा श्री. मदन चव्हाण याचा परिचय झाला होता. पूर्व परिचय असल्याने प्रस्तावना वगैरे न करता सरळ मी विषयालाच हात घातला.

**नर्गिस दत्तचे नाव हॉस्पिटलला कसे काय देण्यात आले ? -मी**

: नर्गिस चित्रपट अभिनेत्री म्हणून प्रसिद्ध होती. त्याहीपेक्षा समाज कार्यकर्ती म्हणून तिने मुबईत बरेच काम केलेले आहे आमचे सिनेकलावताच्या कार्यक्रमासाठी प्रयत्न चालू असतानाच नर्गिस वारल्याचे समजले. तेव्हा नर्गिसचे नाव हॉस्पिटलला द्यावे असा प्रस्ताव काही लोकानी माडला. ग्रामीण भागात कॅन्सर निर्मूलन केंद्र काढणे हेच नर्गिसचे स्मारक ठरेल असे एक पत्र इल. विकलीत प्रसिद्ध झाले होते. त्या पत्रावर बरीच चर्चा होऊन आम्ही निर्णय घेतला

**निर्णयानंतर आपण लगेच तसे जाहीर केले का ?**

: नाही ! त्यासाठी सुनीलदत्तची समतीची गरज होती ना !

**आपण सुनील दत्तपर्यंत कसे पोचलात ?**

: माझी चित्रपट टॉकीज आहे याची तुम्हाला कल्पना आहेच. चित्रपट क्षेत्रात असल्यामुळे माझी प्रसिद्ध निर्माते गुलशन रॉय यांची चागली ओळख होती. आम्ही त्यांना मल्टीस्टार नाईट प्रोग्रॅमचे सयोजक नेमले होते. त्याच्या मार्फत आम्ही सुनील दत्तना गाठले.

**भेट नेमक्या कोणत्या उद्देशाने घेतलीत ?**



डॉ. बी. एम. नेने ( टाय घातलेले)
श्री. मदनसिंग चव्हाण व श्री. गाडेकर

: फक्त हॉस्पिटलला नर्गिस दत्तचे नाव देण्यास अनुमती मिळावी म्हणून. दॅटस् ऑल !

**मी तर असे ऐकले आहे की देणगी मागण्यासाठी आपण त्यांच्याकडे गेला होतात ?**

: यह तो बिलकूल गलत हैं। देणगी मागण्याचा कोणताच प्रस्ताव आमच्यापुढे नव्हता. आम्ही देणगी मागितली नाही आणि सुनीलदत्त यांनी देखील अशी कोणती कमिटमेंट केलेली नाही.

**सुनील दत्तना भेटून नर्गिसचे 'नाव देण्यास अनुमती मागण्याशिवाय संस्थेला काही लाभ व्हावा अशी कोणतीच आपली अपेक्षा नव्हती ?**

: आपण अपेक्षा आणि मागणी यात गल्लत करू नका. आम्ही त्याच्याकडे काही मागितले नाही आणि त्यांनी देखील काही कबूल केलेले नाही. ही वस्तुस्थिती आहे. आमची त्यांच्याकडे रकमेची मागणी नव्हती; पण ते हॉस्पिटलसाठी काही करतील ही अपेक्षा जरुर आहे. वरच्या वर्तुळात प्रभावीपणे काम करणारा कोणी तरी गॉडफादर आम्हाला हवा होता. नर्गिसदत्त आणि सुनील दत्त यांचे श्रीमती इंदिरा गांधींशी चांगले संबंध होते. तसेच दत्त कुटुंबाचे परदेशात, विशेषतः अमेरिकेत बरेच वजन आहे. आपणाला कल्पना आहेच की अमेरिकेचे माजी अध्यक्ष जिमी कार्टर आणि सुनीलदत्त यांचे अत्यंत घरोब्याचे संबंध आहेत. सुनीलदत्तचे वरिष्ठ वर्तुळातील संबंध हॉस्पिटलच्या कामाच्या दृष्टीने उपयोगी पडतील अशी अपेक्षा करण्यात गैर काय ?

मदन चव्हाण यांच्या भेटीनंतर या प्रकरणाची अधिक माहिती काढण्याच्या दृष्टीने मी अश्विनी कॅन्सर सोसायटीचे कोषाध्यक्ष श्री. वसंतराव गाडेकर यांना गाठले. सुनील दत्तना भेटायला गेलेल्या पहिल्या ग्रुपमध्ये गाडेकरही होते. त्यांनी लोकांत गैरसमज आहेत हे मान्य केले; पण वस्तुस्थिती तशी नसल्याचे त्यांनी आवर्जून स्पष्ट केले. त्यांच्यात व माझ्यात झालेली काही प्रश्नोत्तरे खालीलप्रमाणे—

**सुनील दत्तना भेटायला गेलेल्या शिष्टमंडळात आपण पण होता असे मी ऐकले आहे. ते खरे आहे ?**

: होय ते खरे आहे.

**आपण त्यांना भेटायला कशासाठी गेला होतात ?**

: आम्ही त्यांना नर्गिस दत्त यांचे नाव हॉस्पिटलला देण्यास अनुमती द्यावी म्हणून विनंती करायला गेलो होतो.

**पण तुम्हाला त्यांच्याकडून देणगी पण हवी होती ना ?**

: हवी होती पण ती त्यांनी स्वेच्छेने दिली तर. नावाचा मोबदला म्हणून आम्ही मागितले नाही. आमच्यातील काही लोकांचे तसे म्हणणे होते. आमची ही चर्चा ऐकणाऱ्या एका अनोळखी व्यक्तीने सुनील दत्तकडून कोणतीही रक्कम न घेता त्यांना हॉस्पिटलच्या कार्यात सहभागी करून घेण्याचा सल्ला दिला व तो सर्वांना पटला.

**देणगीबाबत सुनिल दत्त यांच्याकडून काही विचारणा वगैरे झाली का ?**

: नाही ! त्यांनी देणगीसाठी आपण नाव देणार आहात का हे आधी आम्हाला विचारून घेतले आणि देणगीसाठी नाव देण्याचा विचार नाही याची खात्री करून घेऊनच त्यांनी अनुमती दिली.

**हॉस्पिटलच्या कामाबद्दल काही चौकशी वगैरे केली होती का ?**

: होय. त्यांनी सर्व माहिती विचारून घेतली. हॉस्पिटलच्या उभारणी मागचा हेतू जाणून घेतला आणि नर्गिसने मृत्यूपूर्वी . 'आपल्याजवळ पैसा आहे. लाखो रुपये खर्च करून तुम्ही माझे प्राण वाचवायला न्यूयॉर्कला आणले. लाखो रुपये औषधांवर खर्च करता महागड्या वस्तीत, ऐशआरामात गाद्यांवर माझी शुश्रूषा करता पण हाच कॅन्सर भारतातल्या एखाद्या गरीब माणसाला झाला असता तर त्याने एवढा पैसा कोठून आणला असता ? भारतातदेखील न्यूयॉर्कसारख्या सुविधा व्हायला हव्यात. त्याही गोरगरीब लोकांसाठी गावागावातून अशी व्यवस्था व्हायला हवी !' असे उद्गार काढले होते. हे सुनील दत्तने साश्रू नयनांनी आम्हाला सांगितले.

**काही न मागता सुनिल दत्तने मल्टीस्टारचे आयोजन कसे काय केले ?**

: कार्यकर्त्यांची प्रामाणिक तळमळ व हॉस्पिटलची प्रगतीची गती पाहून सुनील दत्त भारावून गेले व त्यांनी स्वेच्छेने प्रकल्पाच्या निधी-

साठी देशात दोन व विदेशात दोन असे एकूण चार कार्यक्रम देण्याचे मान्य केले. त्यापैकी पहिला कार्यक्रम ११ एप्रिल १९८२ ला झाला.

**सुनिल दत्तने टाटा मेमोरियलला काही देणगी दिल्याचे नुकतेच समजले. ते खरे आहे काय ?**

: अमेरिकेत नर्गिस दत्त फौंडेशनची स्थापना करण्यात आलेली आहे. या फौंडेशनच्या वतीने पहिला हप्ता म्हणून ३५ लाख रुपये ११ नोव्हेंबर ८५ ला टाटा मेमोरियलला देणगीदाखल दिलेले आहेत हे खरे आहे.'

**बार्शी कॅन्सर हॉस्पिटलला त्यांनी काही दिले नाही का ?**

: नर्गिस दत्त फौंडेशनने यावर्षी बार्शी कॅन्सर हॉस्पिटलला दीड लाखाची औषधे व दोन लाख रुपयांची इक्विपमेंट्स दिली आहेत पुढील हप्ता कदाचित बार्शी सेंटरला मिळेल. सुनील दत्त रक्कम किती देतात याला महत्त्व नाही. त्यानी हॉस्पिटलच्या उभारणीसाठी केलेले काम महत्त्वाचे आहे मल्टीस्टार नाईट कार्यक्रम बार्शीकराना मिळाला तो केवळ सुनील दत्त यांच्यामुळे. पण तुम्ही पत्रकार मंडळी वस्तुस्थिती समजून न घेता लिहिता हे कितपत योग्य आहे ?

**सुनिल दत्त खासदार झाल्यापासून कामापासून दूर गेल्याच्या लोकांच्या तक्रारी आहेत.**

- सुनील दत्त कामापासून दूर गेलेले नाहीत. ते मनापासून झटत आहेत. संस्थेच्या अडचणी जाणून घेऊन त्या सोडविण्यासाठी जातीने प्रयत्न करतात. आणखीन काय हवे ?

दादासाहेब गाडेकरानी चहा मागविला तेव्हा रात्रीचे अकरा वाजले होते. अधिक वेळ न घेता मी त्याचा निरोप घेऊन घराकडे परतलो.

सर्वांच्या भेटीगाठीनंतर मी शेवटचा मोर्चा डॉ. नेने यांच्याकडे वळविला तशी डॉक्टरांची अनेक वेळा भेट झाली होती. पण या सर्व भेटी म्हणजे दोन–चार मिनिटांच्या. हिरेमठ हॉस्पिटलमध्ये त्यांच्या कन्सल्टिंग रूममध्ये, कॅन्सर हॉस्पिटलच्या आवारात. अधिक वेळ डॉक्टराकडून मिळणे शक्य नव्हते, मला त्यांचा चांगला तास–दीडतास हवा होता आणि तो तर मिळत नव्हता अखेर त्यानी उस्मानाबाद दौऱ्याच्या वेळी मला बरोबर घेतले. जाताना–येताना तसेच दिवस भरात अनेक तास गप्पा झाल्या. त्या साऱ्या बोलण्यातून जाणवले ते म्हणजे एक ध्येयवादी व्यक्तिमत्त्व, मनमिळावू, दिलदार शिस्तीचा समाज कार्यकर्ता. नामवंत डॉक्टर असूनदेखील केवळ पैसा मिळवण्याची, इमारतीवर इमारती चढविण्याची इच्छा नाही. बाबा आमटयासारखे आपण गोरगरीब लोकासाठी काहीतरी करायला हवे; हाच त्यांचा निदिध्यास.

## समाज कार्यकर्त्यांचे दोन गट

डॉ. नेने मुंबई विद्यापीठाचे एम. बी. बी. एस. आहेत. नंतर याच विद्यापीठात विशेष प्राविण्यासह एम. डी पास होऊन ते १९७० मध्ये लंडनला एम. आर. सी. पी. झाले. १९६७ ते १९७१ इग्लंडमध्ये थांबून १९७१ मध्ये भारतात परतले. इंग्लंडमधील वास्तव्यात डॉ. नेने यांनी एक्सरे, मेडिसिन, जनरल सर्जरी, बालरोग, वृद्धाचे आजार, शरीर विकृती शास्त्र, हृदयविकार, मूत्रपिंड वगैरेचा अभ्यास केला.

समाजकार्य करण्याऱ्यातही दोन वर्ग पडतात. एक दिखाऊचा आणि दुसरा झिजाऊचा. दिखाऊ टिकाऊ नसतात तर टिकाऊ दिखाऊ नसतात. दिखाऊपणे कार्य करणाऱ्याना लोकाच्या अतकरणाचे सखोल ज्ञान होणे कठीण असते. कारण ज्याच्यासाठी कार्य करायचे त्याचे भान असण्यापेक्षा त्याना स्वतचेच भान अधिक असते. झिजाऊचे त्याच्या अगदी उलट असते. ज्याच्यासाठी काम करायचे त्याच्या अतकरणाची त्याना चागली जाणीव असते त्याच्या सुखदुखात ते सहभागी होतात. डॉ. नेने दुसऱ्या वर्गात झिजाऊच्या वर्गात मोडतात. त्यांच्याकडे येणाऱ्या प्रत्येक रुग्णाचे हृदगत ते जाणतात. सेवेची संधी म्हणून त्या रुग्णाकडे पाहतात सकाळी ७ ते रात्री १२ पर्यंत सेवावृत्तीने डॉक्टर काम करतात. कॅन्सर हॉस्पिटलच्या कामात त्यानी कित्येक वेळा रात्री १२ ते सकाळी ६ पर्यंत जागून काढल्या आहेत. मुंबईला गेल्यानंतर दोन–दोन तीन–तीन दिवस मुक्काम होतो. त्यामुळे प्रॅक्टीसचे तर नुकसान होतेच होते पण या काळातला सर्व खर्च डॉक्टर स्वत.च्या खिशातून करतात संस्थेकडून एक पैसा घेत नाहीत वैद्यकीय क्षेत्रात आज लाखो तरुण नव्याने प्रवेश करीत अहेत दुर्दैवाची बाब अशी की सेवा म्हणून नव्हे तर धंदा म्हणून वैद्यकीय व्यवसायाकडे हे तरुण पाहत असतात. डॉक्टराची संख्या वाढत आहे. पण डॉक्टर आणि रुग्णातले अंतर कमी होण्याऐवजी वाढत आहे प्रकृती तपासताना रुग्ण आणि डॉक्टराचा काय संवाद होत असेल तेवढाच. त्यानंतर डॉक्टर रुग्णापुढे तोंड उघडतो तो आपल्या अवाढव्य फीचा आकडा सांगण्यासाठी रुग्णाच्या दुखाशी विशेषतः गरीब रुग्णाच्या दुखाशी तर ते कधीच समरस होत नाहीत पैसा मिळवणे हा एकमेव त्याचा उद्देश असतो.

अशिक्षित माणसाने, गरीबीला कटाळून अगर गांजलेल्या लोकानी त्रासून अडचणीत येऊन भ्रष्टाचार केला तर एकवेळ आपण समजू शकतो. पण डॉक्टर्स, इंजिनियर्ससारख्या प्रतिष्ठित समजलेल्या जबाबदार घटकाने पैशासाठी वाटेल ते मार्ग हाताळावेत हे ऐकून मन विषण्ण होते दुर्दैवाची बाब म्हणजे डॉक्टर लोक आज गुन्हेगारीच्या क्षेत्रात आघाडीवर आहेत. टाईम्स ऑफ इंडियाच्या प्रतिनिधीने ऑस्ट्रेलियात कार्यरत असलेले भारतीय अपराधशास्त्रज्ञ डॉ सत्यांशु मुखर्जी यांच्याशी चर्चा करून त्याबद्दलचा वृत्तात २९ जानेवारीच्या अंकात प्रसिद्ध केला आहे.

डॉ. सत्यांशु मुखर्जी मुंबईच्या टाटा समाज संस्थेचे पदवीधर असून अपराधशास्त्रविद् प्राध्यापक पनाकल यांच्या मार्गदर्शनाखाली त्यानी अपराधशास्त्र आणि सुधारगृह प्रशासन या विषयात प्राविण्य मिळविले आहे. काही वर्षापासून ते ऑस्ट्रेलियात राहून या विषयावर अधिक संशोधन करीत आहेत डॉ. मुखर्जींच्या मते विकसित देशात मोठमोठ्या कंपन्या आणि वैद्यकीय तज्ज्ञ यानी केलेल्या प्रचंड फसवाफसवीच्या मानाने वैयक्तिक स्तरावर झालेले मालमत्ताविषयक गुन्हे फारच नगण्य आहेत. असे सागून डॉ. मुखर्जी म्हणतात की केवळ ऑस्ट्रेलियात प्रतिवर्षी दहा ते वीस कोटी डॉलर्स इतक्या रकमेची फसवणूक डॉक्टर लोक करीत असतात. आता या क्षेत्रात भारतीय डॉक्टर्स मागे नाहीत हे दररोज वृत्तपत्र वाचणाऱ्याच्या सहज लक्षात येते

सुदैव म्हणा की दुर्दैव डॉक्टरांचे आणि माझे विळचा भोपळ्याचे सख्य आहे सा. माणूससाठी मी पहिला जो लेख लिहिला आणि ज्याला डहाणूकर पारितोषिक मिळाले, तो डॉक्टराच्याच सदर्भातला होता त्यानतर अरब लेखमालेत मिरजेतल्या डॉक्टराची मी केलेली साफसफाई तर सर्वश्रुतच आहे. वास्तविक पहाता माझे वडील डॉक्टर होते सध्या दोन भाऊ याच व्यवसायात आहेत त्याशिवाय अगदी जवळच्या नात्यातले किमान अर्धा डझन तरी लोक एम. एस., एम. डी. आहेत असे असले तरी माझे वैद्यकीय व्यवसायाबद्दलचे मत चागले नाही मिरजेचे माजी आमदार कै. डॉ एन. आर. पाठक, डॉ. कोटणीस आणि आता डॉ. नेने या तिघाचा अपवाद वगळता डॉक्टरांबद्दल चागले लिहिण्याची कधी सधीच मिळाली नाही. डॉ. कोटणीस याच्या कार्याने न भारावलेला चीनी आणि भारतीय माणूस शोधून सापडणार नाही. डॉ. कोटणीस याच्या कार्याने मी प्रभावित झालो तसा डॉ. एन. आर. पाठक आणि डॉ. नेने यांच्या कार्यानेही प्रभावित झालो. डॉ. नेने वैद्यकीय क्षेत्रातील आदर्शच नव्हे तर अनुकरणीय व्यक्तिमत्त्व आहे.

## मजबूत पाया

डॉ. नेने याचे कार्य बघून मी त्याची प्रेरणास्थाने शोधून काढण्याचा प्रयत्न केला. त्यातून निष्पन्न झाले ते हेच की डॉक्टरांच्या आई–वडिलानी बालपणी त्याच्यावर जे सस्कार केले तेच त्याचे प्रेरणा-स्त्रोत आहेत. ते सघवाले नाहीत की समाजवादी नाहीत. किंवा त्यानी काँग्रेस सेवा दलाच्या मैदानावर खो खो कबड्डीसाठी हजेरी लावलेली नाही. त्याचप्रमाणे राष्ट्रवाद, समाजवाद, समाजप्रेम, लोकशाही निष्ठा, देशप्रेमाचेही धडे त्यानी कोणापासून घेतलेले नाहीत. ते पूर्णपणे स्वतत्र आहेत स्वयभू आहेत. स्वत च्या विचाराने ते वाढत गेलेले आहेत.

सघाच्या प्रेरणेने एखादी व्यक्ती राष्ट्रवादी बनत असेल किंवा राष्ट्रसेवादलाच्या सस्कारातून एखादी व्यक्ती समाजसेवेचे कार्य करीत असेल तर त्यात गैर काय? अशा व्यक्तीच्या कार्याचे श्रेय त्या व्यक्तीची ज्या संस्थेत जडणघडण झाली असेल त्या सस्थाना देण्यास काहीच हरकत नाही पण होते काय, तर अशा व्यक्ती किंवा त्यानी स्थापन केलेल्या सस्था एकाकी पडतात असा अनुभव आहे. जरी त्या व्यक्ती गोरगरीब लोकाच्या डोळ्यातील दु.खाचे अश्रु पुशीत असल्या तरी त्याच्याकडे पहाण्याचा इतराचा दृष्टिकोन काहीसा अस्पृश्यतेसारखा असतो. सघवाल्याची संस्था असेल तर फक्त सघवालेच त्या कार्याचे कौतुक करतात. सघाचीच वृत्तपत्रे त्याला प्रसिद्धी देतात अशावेळी समाजवादी किंवा साम्यवादी विचाराची माणसे काय करतात तर टीका. किंवा टीका करणे शक्य नसले तर त्या कामाकडे दुर्लक्ष करतात एखाद्याचे महत्त्व कमी करायचे असेल तर त्याविषयी मौन बाळगण्याचे अलिकडचे तत्र आहे. सघाच्या बाबतीतला अनुभव मात्र थोडा वेगळा आहे सघाची माणसे समाजवादी, साम्यवादी माणसाच्या कार्याचे कौतुक करतात. सघप्रणीत वृत्तपत्रे प्रसिद्धीही देतात. सघाच्या वृत्तपत्रानी श्री. बाबा आमटे किंवा गोदाराणी परूळेकराच्या कार्याचे कौतुक करताना कधी कोतेपणा दाखविलेला नाही. आदिवासी क्षेत्रात जेव्हा सघाच्या लोकानी प्रथम कामाला प्रारभ केला तेव्हा सघ स्वयसेवकानी सर्वाआधी भेट घेतली ती गोदाताईंची. पण असा मनाचा मोठेपणा कधी कोणत्या समाजवाद्यानी किंवा साम्यवाद्यानी दाखविल्याचे आढळत नाही त्यादृष्टीने डॉ. नेने याचे एक बरे आहे. ते म्हणजे ते सघवाले नाहीत, समाजवादी नाहीत, साम्यवादी नाहीत की काँग्रेसवाले नाहीत त्यामुळे ते सर्वांपर्यंत जाऊ शकतात तसेच सर्व विचाराचे लोक त्याच्यापर्यंत येऊ शकतात शिवाय त्याच्यावर लिहायला सर्व वृत्तपत्रे मोकळी आहेत आणीबाणीत लातूरच्या विवेकानंद रुग्णालयातील डॉक्टर्सना तुरुगात जावे लागले होते. समजा उद्या राजीव गाधीनी आणीबाणी आणली किंवा भविष्यात सघवाले, समाजवादी, साम्यवादी याच्यापैकी कोणीही सत्तेवर येऊन त्यानी आणीबाणी लादली तरीदेखील डॉ. नेने याना मात्र कोणी हात लावणार नाही हा काय कमी महत्त्वाचा फायदा आहे?

डॉक्टर नेने वैद्यकीय क्षेत्राकडे वळाले त्याचे कारण त्याचे वडील! डॉक्टराचे वडील जुने एल. सी. पी एस. आहेत. कॅन्सर प्रकल्पात तर त्याचे फार मोठे पाठबळ डॉक्टर नेने याना लाभलेले आहे.

प्रत्येक यशस्वी पुरुषामागे एक स्त्री असते असे म्हणतात. डॉक्टराच्या कार्यात त्याच्या पत्नी सौ. अंजली नेने याचा बराच मोठा वाटा आहे १९६५ साली विवाह झाल्यापासून त्या डॉक्टराबरोबर हिरीरीने समाज–कार्यात भाग घेत आहेत १९७१ मध्ये बार्शीत आल्यानतर त्यानी पाळणाघर सुरू करण्याचा प्रयत्न केला. एक ब्यूटी पार्लरही चालविले सध्या त्या बार्शी येथील एकमेव इग्रजी माध्यमाच्या शाळेच्या मुख्याध्यापिका आहेत. शाळेत स्वतः बेल देण्यापासून ते शिकवण्यापर्यंतची सर्व कामे करून त्यानी शाळा नावारूपाला आणली आहे. कॉन्व्हेंट स्कूलच्या धर्तीवर शाळा चालविताना भारतीय सस्कृतीचे सस्कार मुलावर व्हावेत यावर त्याचा फार मोठा कटाक्ष आहे. शाळा साभाळून त्या कॅन्सर हॉस्पिटलच्याही कामात लक्ष घालतात. डॉक्टरांकडे येणाऱ्या जाणाऱ्या पाहुण्यामंडळीकडे जातीने लक्ष पुरवितात त्या बार्शी महिला मडळाच्या अध्यक्षा आहेत. त्यांनी मल्टीस्टार नाईट कार्यक्रमाच्या वेळी महिला मडळातर्फे तीन लाख रुपयाची तिकिटे खपवून उच्चाक मोडला होता.

सबंध प्रकल्पाची ज्यावेळी मी पाहणी केली त्यावेळी एक लक्षात आले ते म्हणजे कुठेही स्वप्नाळूपणा किंवा भावनेच्या आहारी जाऊन वाऱ्यावर वरात काढण्याचा प्रयत्न नाही बुद्धी, शास्त्र, तत्र कायदा, समाजव्यवस्था याचे निकष लावून प्रत्येक गोष्टीची केलेली उभारणी हा महत्त्वाचा भाग आहे. काय करायचे आहे हे पूर्णपणे माहीत असल्याने कसे करायचे त्याचे बेसमेंट मजबूत आहे.

डॉ. नेने यांनी कार्यकर्त्यांचा फार मोठा सच जमवला आहे. १४४ लोकाच्या २२ कमिट्या आहेत. कोणतेही काम असेल तेव्हा ती कमिटी क्षणार्धात कार्यरत होते व काम सपताच आपोआप विसर्जितही होते गवगवा नाही, भाडण नाही, पोकळ बडबड नाही कामाच्या वेळी रात्रदिवस राबणारे शेकडो कार्यकर्ते हेच डॉक्टराचे मोठे बळ आहे. बार्शी, बार्शीचे राजकारण आणि बार्शीचे लोकाची ज्याना कल्पना आहे त्याना निश्चितच डॉक्टराच्या या बळाचा हेवा वाटल्याशिवाय राहत नाही.

डॉ. नेने प्रॅक्टीसमध्ये आणि आता कॅन्सर हॉस्पिटलच्या कार्यात आकठ बुडालेले आहेत पण त्याची अभ्यासाची सवय मात्र कायम

आहे. प्रत्येक मेडिकल कॉन्फरन्सेसना ते जातात. त्याचा 'इटर नॅशनल युनियन अगेंस्ट कॅन्सर' आणि 'युनियन इटर नॅशनल कट्रोल कॅन्सल' या सस्थाशी सबंध आहे. प्रत्येक गोष्ट अभ्यासू वृत्तीने हाताळण्याच्या त्याच्या सवयीमुळे डॉक्टरानी टाकलेले पाऊल मागे कधी घ्यावे लागत नाही. कॅन्सरच्या ग्रामीण प्रकल्पात त्यानी अगदी अलीकडे पदार्पण केले असले तरी त्यावर त्यांचा भरपूर अभ्यास आहे टाटा मेमोरियल हॉस्पिटलला १० नोव्हेंबर ८५ रोजी पतप्रधान श्री. राजीव गांधी यांनी भेट दिली तेव्हा बार्शी कॅन्सर हॉस्पिटलच्या कार्याबद्दल अगदी थोड्या वेळात त्यानी अत्यत प्रभावीपणे माहिती पतप्रधानाना सागितली. डॉ. नेने याच्या वक्तव्याचा पतप्रधानानी आपल्या भाषणात आवर्जून उल्लेख केला.

अगदी अलीकडे खा. सुनील दत्त यांनी एका भाषणात डॉ. नेने याच्या कार्याबद्दल बोलताना, 'डॉ. नेने याच्यापासून केवळ डॉक्टरा-नीच नव्हे तर सर्वानी स्फूर्ती घ्यावी असे त्याचे कार्य आणि एकदर वर्तन आहे' असे उद्गार काढले.

## डॉ. देसाई कृत गौरव

नुकत्याच म्हणजे १२ मार्च ८६ रोजी झालेल्या कार्यक्रमाचा वृत्त-पत्रात प्रसिद्ध झालेला वृत्तात पहा. दै. केसरी दि. १३-३-८६.

'बार्शी जागतिक आरोग्य सघटनेने बार्शीच्या ग्रामीण कर्करोग निदान केंद्राचे काम पाहून आनद व्यक्त केला. या आदर्श केंद्रामुळे बार्शीचे नाव जिनिव्हा, स्वित्झर्लंडमध्येही घेतले जात आहे ही अत्यत अभिमानाची गोष्ट आहे' असे गौरवपूर्ण उद्गार मुंबईच्या टाटा मेमोरियल कर्करोग सस्थेचे संचालक व विश्वविख्यात कर्करोग शल्य चिकित्सक पद्मभूषण डॉ. प्रफुल्ल देसाई यानी येथील कॅन्सर रुग्णालयाच्या वार्डाच्या उद्घाटनप्रसगी काढले. अध्यक्षस्थानी मुंबई-च्या टाटा मेमोरियल केंद्राचे डॉ. राव होते.

'यावेळी पुढे बोलताना डॉ. देसाई म्हणाले, दोन महिन्यात, बार्शीच्या या केंद्राला 'एक्स-रे युनिट' मुंबईच्या टाटा मेमोरियल केंद्रातर्फे देण्यात येईल. लवकरच या केंद्राचे सर्व समावेशक कर्करोग रुग्णालयात आम्ही रूपातर करणार आहोत. आमच्याकडे पैसा आहे पण काम करणारी माणसे नाहीत. येथे मात्र पैसाही आहे व तन, मन, धन अर्पण करून काम करणारी माणसे आहेत. पाच वर्षापूर्वी येथे एक मोडका बगला होता. आज मात्र हा परिसर सुशोभित झाला आहे.'

नंतर अध्यक्षपदावरून बोलताना डॉ. राव म्हणाले, तीस वर्षात आम्ही मुबईत करू शकलो नाही, एवढी प्रगती या केंद्राने केली आहे. 'कोबाल्ट युनिट'चा प्लॅन फारच उत्तम आहे. डॉ. बी. एम् नेने याच्यासारखा उत्साही व समर्पित डॉक्टर पाहून समाधान वाटते. कोणत्याही प्रकारची मदत टाटा मेमोरियल सेंटर या केंद्राला देईल असे आश्वासन त्यानी दिले.

त्यापूर्वी बोलताना राजमाता सुमित्राराजे भोसले म्हणाल्या, कॅन्सर-कर्करोग पीडित रुग्णाच्या डोळ्यातील अश्रू पुसून त्याच्या चेहऱ्यावर हास्य फुलविणाऱ्या या केंद्राचे कार्य अन्य संस्थाना प्रेरणा-दायक ठरेल सर्वमंगलाबाई कथले ट्रस्ट व अश्विनी रुरल कॅन्सर रिसर्च अँड रिलीफ सेंटरच्या नावाबद्दल बोलताना त्या म्हणाल्या सर्वमगल म्हणजे सर्व मानव जातीचे कल्याण चिंतणारी आणि अश्विनी म्हणजे देवाचे वैद्य. या दोन नावाचा पवित्र सगम येथे झालेला पाहून आनद होतो. बार्शीकरानी केलेल्या प्रेमाच्या सत्काराने मी भारावून गेले आहे. त्याचे माझ्यावर फार मोठे ऋण आहे असे त्या म्हणाल्या.

या केंद्राला मदत देणाऱ्या 'हेल्पेज इडिया' या सस्थेचे प्रतिनिधी म्हणाले, या केंद्राला मदत दिल्याचा आम्हाला अभिमान वाटतो. प्रारंभी आमदार दिलीप सोपल यानी सर्वांचे स्वागत केले.

आभार मानताना डॉ. बी. एम्. नेने म्हणाले, डॉ. प्रफुल्ल देसाईंच्या सहकार्य व मार्गदर्शनामुळेच आम्ही हे केंद्र उभे करू शकलो त्याच्या ऋणातून आम्ही कदापी मुक्त होणार नाही. टाटा मेमोरियल केंद्राचे चौदा तज्ज्ञ डॉक्टर मुबईहून येथे आल्याबद्दल त्यानी त्याचे आभार मानले.

आभार मानण्याचा कार्यक्रम सपत असतानाच डॉ. पी. बी देसाई यानी सर्व नागरिकाना उभे राहण्यास सागून नि:स्वार्थपणे काम कर-णाऱ्या डॉ. बी. एम्. नेने याचे हार घालून उत्साही स्वागत केले. सुमारे दोन हजार नागरिक यावेळी कार्यक्रमाला कॅन्सर हॉस्पिटलच्या प्रागणात जमा झाले होते.

डॉ. नेने याच्यावरोबर मी उस्मानाबादला गेलो खरा पण तेथील गडबडीमुळे त्याची सलग अशी मला मुलाखत घेता आली नाही. पण त्याच्याशी जे काही बोलणे सुरू झाले ते मी येथे देत आहे प्रथम आमचे बोलणे सुरू झाले ते डॉ. रॉबीन कुक याच्या कादबरी-वरून. कुक हे न्यू हॅम्पशायर येथील नामवत सर्जन आहेत त्यांच्या 'कोमा', ब्रेन, स्फिनोक्स या कादबऱ्यावरील चित्रपटानी जगभर अक्षरश: धमाल उडवून दिली आहे त्याच्या 'फिव्हर' या कादंबरीचा 'ब्लड कॅन्सर' या नावाने सा. माणूसमध्ये प्रसिद्ध झालेला अनुवाद मी डॉक्टराना वाचायला दिला होता. त्यावरून आमच्या गप्पा सुरू झाल्या.

**डॉक्टर कादंबरी आवडली का ?**

: हो ! खूपच छान आहे पण थोडी अवास्तव वाटली

**आपण 'कोमा' पिक्चर पाहिला का ?**

'हो पाहिला ! तो देखील अवास्तवच होता मेडिकलच्या क्षेत्रात आजकाल बरेच काही वाईट घडते आहे. नाही असे नाही, पण कोमा-मध्ये जे दाखविले आहे तेवढे मात्र घडत नाही.

**डॉक्टर मी दोन-तीन वर्षापूर्वी सिंगापूरची एक बातमी वाचली होती. त्यात डॉक्टरांनी पुरुषांच्या लिंगांची ऑपरेशन्स करून त्यांचे स्त्रियांत रुपांतर केल्याच्या केसेस होत्या.**

'हो माझ्यापण वाचनात ते आलेले आहे पण अशा घटना अगदी तुरळक म्हणायच्या.'

**पण कोमात जे दाखवले आहे ते भविष्यात घडणार नाही कशा-वरून ?**

: हां फार तर तसे म्हणता येईल. भविष्याबद्दल कोण बोलणार ?'

**आपल्या भागात सोलापूरचे सिद्धेश्वर कॅन्सर हॉस्पिटल आहे. तसेच लातूरच्या विवेकानन्द रुग्णालयातही कॅन्सरची एक विंग निघते आहे. पुण्या-मुंबईत अद्यावत कॅन्सर हॉस्पिटल्स आहेत असे असताना**

**बार्शी येथे हा प्रकल्प सुरू करण्याचे प्रयोजन काय ?**

: माझ्या माहितीप्रमाणे सोलापूर येथील सिद्धेश्वर कॅन्सर हॉस्पिटलमधील काम मर्यादित आहे. तिथे फक्त शेक देण्याची व्यवस्था आहे. लातूर येथील विवेकानंद हॉस्पिटलमधील कॅन्सर विंगची कल्पना नाही. पुण्या-मुंबईला फुल फ्लेज कॅन्सर हॉस्पिटल्स आहेत पण त्याचा ग्रामीण भागातील गोरगरिबांना काय फायदा ? काळे तुम्हाला कल्पना असेल की कॅन्सरचे अर्ली डिटेक्शन फार महत्वाचे आहे. गरीब रुग्ण पुण्या-मुंबईला जाणार कधी आणि तपासणार कधी ?

**बार्शी येथे फक्त डायग्नॉस्टिक सेंटर सुरू केले असते तर बाकीचा व्याप टळला नसता का ?**

: परदेशात डायग्नॉसिस, स्क्रिनिंग, सर्जरी, टेलीथेरपी आणि इम्युनोथेरपी याची सांगड घातली जाते परदेशात जितक्या पद्धतीने कॅन्सरवर हल्ला चढविला जातो त्या पद्धतीने आपल्याकडे औषधोपचार होत नाहीत. तेथे चारही पद्धतीचा वापर एकाच ठिकाणी एका वेळी करणारी हॉस्पिटल्स आहेत. आपल्याकडे चुकीच्या ठिकाणी औषधोपचार, रोगाचे मूळ न शोधले जाणे असे प्रकार होऊ शकतात. आपल्याकडे तपासणी एकीकडे होते तर त्यावरील ऑपरेशन दुसऱ्या ठिकाणी शेक तिसऱ्या ठिकाणी. या निरनिराळ्या ठिकाणी घेतलेल्या औषधोपचारात कोणत्याही प्रकारचा समन्वय नसतो. तपासणी करणारे डॉक्टर कॅन्सरच्या एकंदर स्थितीबद्दलचा अहवाल किंवा चिठ्ठी देत नाहीत. त्यानंतर जे सर्जन ऑपरेशन करतात ते कॅन्सर असलेला सर्वभाग कापून टाकला किंवा थोडासा भाग राहिला वगैरे गोष्टी स्पष्ट करीत नाहीत त्यांनी हे स्पष्ट केले तर शेक देणाऱ्या तज्ज्ञाला नेमक्या त्या भागावर शेक देऊन कॅन्सरचे जंतू मारता येतात, अन्यथा नाही. तपासणी, ऑपरेशन, शेक हे सर्व वेगवेगळ्या ठिकाणी झाल्याने कामात समन्वय राहत नाही. शिवाय रुग्णाला या सर्व पद्धतीचा औषधोपचार घेण्यासाठी फिरावे लागल्याने वेळ व पैसा वाया जातो. कित्येक वेळा रुग्ण प्रथमावस्थेतून दुसऱ्या अवस्थेत व दुसऱ्या अवस्थेतून तिसऱ्यात जाऊन दगावतो. म्हणून आम्ही कॉम्प्रहेन्सिव परिपूर्ण कर्कनिवारण केंद्राची कल्पना स्वीकारलेली आहे. तपासणीपासून ते कॅन्सर बरा होईपर्यंत सर्व औषधोपचार बार्शीत केले जातील. त्यासाठी रुग्णांना खर्च कमी येईल आणि उत्तम तऱ्हेची सेवा मिळेल.

**मोबाईल व्हॅन घेऊन प्रत्येक खेड्यातील प्रत्येक माणसाची तपासणी हा प्रयोग प्रथमच केला जात आहे काय ?**

: हो, भारतात प्रथम केला जात आहे त्याचप्रमाणे आशिया खंडातही प्रथमच होत आहे तत्पूर्वी अमेरिकेत व जपानमध्ये ही पद्धत अवलंबिली गेली. जपानमध्ये काही वर्षांपूर्वी दरवर्षी पन्नास हजार माणसे कॅन्सरने मरत असत पण या पद्धतीच्या कॅन्सर नियंत्रण योजनेमुळे हे प्रमाण आता पंधरा हजारावर आलेले आहे

**अशा प्रकारची म्हणजे सर्व पद्धतीचा औषधोपचार करणारी हॉस्पिटल्स भारतात इतरत्र आहेत का ?**

भारतात मद्रास, त्रिवेंद्रम, हुबळी, गोवा, दिल्ली, अहमदाबाद, राजकोट, श्रीनगर, मुंबई, बंगलोर या ठिकाणी ही मल्टी डिसिप्लीनरी हॉस्पिटल्स आहेत; पण ही सर्व सेंटर्स शहरात आहेत भारतातील एकूण कॅन्सर रुग्णांपैकी अवघ्या पाच ते सात टक्के लोकांवर या ठिकाणी औषधोपचार होऊ शकतो. श्रीमंत लोकच फक्त या ठिकाणी जाऊन औषधोपचार घेऊ शकतात. महाराष्ट्रापुरते बोलायचे तर मुंबई सोडून कुठेही अशी सोय नाही. मुंबईत टाटा आणि किडवाई मेमोरियलला फक्त १५० कॉटस्‌ची सोय आहे.

**श्री. बाबा आमटे यांच्याप्रमाणे पूर्णपणे सेवेच्या तत्वावर हॉस्पिटल उभे करण्याची आपली कल्पना आहे काय ?**

: आमच्या कामाचा किंवा रुग्ण सेवेचा आदर्श तोच आहे. पण बाबा आमटे फार थोर आहेत. मी समाजासाठी काही तरी करू इच्छितो. पण त्याचे स्वरूप अगदी अल्प आहे बाबांनी कुष्ठ रोग्यांबरोबर राहण्याची, जेवण्याची, झोपण्याची मनाची पूर्ण तयारी केली. त्याप्रमाणे ते वर्तनही करीत आहेत. स्पष्टपणे कबुली द्यायला हरकत नाही, की माझ्या मनाची तेवढी तयारी नाही. मी फार लहान माणूस आहे. बाबांसारखे काही तरी भव्य-दिव्य करावे ही आमची मनोमन इच्छा मात्र आहे. त्याप्रमाणे मी या कामात उतरलो आहे. कॅन्सरचे वाढते प्रमाण आणि ग्रामीण भागातील रुग्णांना केवळ आर्थिक कारणासाठी औषधोपचारापासून वंचित व्हावे लागणे ही आमची व्यथा आहे. त्यावर आम्हाला मात करायची आहे त्यासाठीच आमची सर्व धडपड आहे.

बार्शीचा मुक्काम संपत आलेला होता एक दोन दिवसात पुण्याकडे निघणार होतो तोच ऑपरेशन कॅम्प असल्याचे समजले. मुंबईहून डॉक्टर्स येणार असल्याने तो संधी हातून घालवायची इच्छा नव्हती. ऑपरेशन थिएटरमध्ये तोंडावर मास्क चढवून, डोक्यावर टोपी घालून व पायात स्लीपर घालून जावे लागले. इतक्या जवळून ऑपरेशन पाहण्याचा हा पहिलाच प्रसंग. मला काही जाणवले नाही. पण बरोबरचा फोटोग्राफर मात्र गडबडला. कसे बसे दोन फोटो घेऊन ऑपरेशन थिएटरबाहेर आलो.

हॉस्पिटलच्या बाहेर पडण्यासाठी व्हिजिटिंग रूममध्ये आलो. त्यावेळी बरेच रुग्ण तपासून घेण्यासाठी बाकावर बसलेले आढळले. प्रत्येकाच्या चेहऱ्यावरून फिरत फिरत माझी नजर भिंतीवर लावलेल्या एका बोर्डवर गेली. त्यावर हेडन चेंबचे हृद्‌गत लिहिले होते...

तुम्ही जेथे काम करता ती तुमची कर्मभूमी. तुमच्या हाती येणारी संपत्ती तेथूनच निर्माण होत आहे तुम्ही आणि तुमच्या प्रिय मंडळी यांचेसाठी लागणारा आवश्यक अशा गोष्टींचा पुरवठा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष येथूनच व्हावयाचा आहे तुमच्यासाठी तुमच्या आयुष्याच्या सुखासमाधानाची बीजे येथूनच रूजली गेली असतील अशा या कर्मभूमीशी तुम्ही एकनिष्ठ रहा तिच्यासाठी अविरत कष्ट करा. या कर्मभूमीची ध्येये आणि उद्दिष्टे याच्या पूर्ततेसाठी सदैव तत्पर असा. तुम्ही निष्ठेने टाकलेली एक ओंजळमुद्धा येथे फार महत्त्वाची ठरणार आहे.

पण तुम्हाला निंदा करणे जरूर वाटत असेल तर ती जरूर करा. हवी तेवढी करा. मन पूर्वक करा पण ती संस्थेच्या बाहेर पडून मग करा. संस्थेत राहून तिला बदनाम करू नका. तसे कराल तर ज्या वृक्षाचे आधारावर तुम्ही उभे आहात त्या वृक्षावरच तुम्ही कुऱ्हाड घालाल. जे कोणी या कर्मभूमीची सेवा करीत आहे त्यांचाही तुम्ही नाश कराल आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे स्वतःच्या या नाकर्त्या हाताने (वृत्तीने) तुम्ही तुमच्या कर्त्या हातालाच (कर्तृत्वाला) छेद द्याल आणि सर्वनाश ओढवून घ्याल तेव्हा सावधान ! तुमच्या निष्ठा तुमच्या कर्मभूमीशी एकरूप असू द्या.

हेडन चेंब

हेडन चेंबचे मनोगत मनात घोळवत मी परतलो...

## समाप्त

# बाबा आमटेंबरोबर पंजाबात : पृष्ठ ११ वरून

थोडाच होता

'हां ऽ हां, कोई भी उनको मिल सकता था. हिंदुभाई भी. उनके यहां इन्साफ भी बहुत साफ और जल्द मिलता था–'

'फिर ?'

'फिर क्या ? वह जब हाथसे छुटने लगे, तो पथके गद्दारोने और हिंदु बनिया लोगोने उन्हे बदनाम करना शुरू किया–'

'मग वह तो खुले आम हिंसाचारका–'

'भाईसाब हिंसा दो किस्मकी होती है. एक खुली और दुसरी छुपी. कई दफा सतजी को जानके मारे भागनें| पडा. ग्रथ-सावको जला दिया गया. अब हमारे साथ भी--'

'तुम्हारे साथ क्या ?'

'हमारे लिये सतजीके सिवा और कोई रास्ता नही था. ब्लू स्टारमे उनको खतम किया. हरमिंदरसाबके उपर हमला किया. सबसे सदमा पहुँचा दिल्लीमे. वह कुत्तोने हमारे मां-बहनोकी इज्जत लूट ली '

पजाबमध्ये आल्यावर शिखांशी बोलताना सारख जाणवत होतं की, ब्लू स्टार हा उरावरचा घाव असला तरी दिल्लीच्या 'घडवून आणलेल्या' दगली ही वहाती जखम आहे. दगलीचा खुणवार आणखी जास्त आहे.

'ब्लू स्टार'च्या आधी व नंतर सैन्याने खेड्या-पाड्यातून खूप अत्याचार केले केसरी फेटा दिसला की घाल गोळी नाहीतर मार 'चकमकी' मध्ये असा प्रकार सुरू झाला–'

'पण अतिरेक्यानीही हिंसाचाराचे थैमान–' मी ब्लू स्टार वा दिल्लीच्या दगलीची प्रतिक्रिया घेणे सहाजिकच होते.

काहीजण नक्कीच आतकवादाकडे वळले; पण म्हणून केसरी फेटा घातलेला प्रत्येक-जणच आतंकवादी नव्हता. आमच्यातील प्रत्येकालाच पोलिसी आतकवादाचा भोग भोगावा लागला आहे.' बोलता बोलता दिलबागने मित्राला खूण केली. मित्राने सुरवार वर करून पोलिसानी 'बोलते' करण्यासाठी केलेल्या मारहाणीच्या खुणा दाखवल्या. लगेचच बाजूच्या दोघा-तिघा-नीही शर्ट काढले आणि मारहाणीचे वण दाखवले.

मला बगला–देश युद्धाच्या वेळची आठवण आली. युद्ध सपता–सपता असाच डाक्का युनिव्हर्सिटीच्या हॉस्टेलमध्ये बसलो होतो जवळ–पास माझ्याच वयाचे असलेले 'मुजीब वाहिनी'चे तरुण मुक्ती–सैनिक रझाकारानी सुरुवातीला केलेल्या मारहाणीच्या खुणा दाखवत होते. नुस्त्या कल्पनेनेच काटा आला. पंजाबमध्ये हे सर्व अस ऐकाव-बघाव लागेल. हा इतिहासाचा सूड की आपणच आपला घेतलेला सूड ?

बोलत असताना मध्येच आम्हाला शोधत भगतसिग आला छोटेखानी जाड भिंगाचा चष्मा. खूपसा आपल्या उल्हास राजज्ञसारखा दिसणारा. तो आल्यावर किंबहूना अध्ये–मध्ये इतर कोणी डोकावल्यावर दिलबाग जरा वरचा सूर लावायचा पण अर्थातच ते समजण्यासारखे होते. मग जरा स्थिरस्थावर झाल्यावर मी डायरेक्ट प्रश्न केला 'क्या चाहते हो ? खलिस्तान ?'

दिलबाग जरा गोंधळला. मग सावरून म्हणाला, 'वह तो है, मगर पहले जोधपूरके जेलमे रखे हुये हमारे भाई–बंदोको रिहा किया जाय. बाबाजीको कहना वैसा एक स्टेटमेंट–'

(बाबा नेमके त्याच वेळेला सुवर्ण-मंदिरात 'दमदमी टाकसाळ' व 'फेडरेशन'च्या काही नेत्याशी बोलणी करत होते, एक सयुक्त पत्रक काढायचे ठरत होते, पण फेडरेशनचा जहाल नेता हरिंदरसिंह कहलों आयत्यावेळी टपकला आणि त्याने सर्व बेत उधळून लावला अशी माहिती नतर समजली )

'मगर उससे हिंसाचार बढेगा तो–'

'फिर वही बात–' दिलबाग काहीसा चिडून म्हणाला, 'वह लोग बेकसूर है. सिर्फ हम नही कहते. बर्नालाजीका भी वही कहना है–' ('इंडिया टुडे'ला मुलाखत देताना बर्नालाजीनी खरोखरच तसे स्पष्टपणे म्हटले आहे )

'और कुछ ?' मी आवरते घेत विचारले

'दिल्लीच्या दगलखोराची चौकशी झाली पाहिजे. दिल्ली दरबारला सर्वांची नावे माहीत आहेत तुम्ही नाही तरी शेवटी आम्हाला पुरता न्याय करावा लागेल. मग परत वरती आम्हालाच अतिरेकी म्हणाल–'

'ठीक है–' मी उठत म्हणालो. बोलता-बोलता खूप वेळ निघून गेला होता पुढचे कार्यक्रम माहीत नव्हते. 'कितने बजे ?' हाताला घड्याळ असून मी अभावितपणे विचारल.

माय गॉड ! वाट लागली !

आपला भरभक्कम पजा माझ्या खांद्या-वर टाकत दिलबाग दिलखुलास हसत म्हणाला 'अपनेही मुहसे क्यूँ बताऊँ ? समझ लो पूरे ऽ बज गये चलो खाना खाने को !'

उफ् दशमेशजी, तुम्हीच जात राखलीत? ◻

खाना आटपल्यावर दिलबाग व त्याचे साथीदार गेटपर्यंत सोडायला आले. जोधपूरच्या कैद्यासबधीच्या स्टेटमेंटचा विषय सारखा काढत होते. वाटल, कदाचित् हा 'फेडरेशन'च्या स्ट्रॅटेजीचा भाग असेल. पण रिक्षात बसण्याअगोदर हातात हात घेत दिलबाग परत म्हणाला, 'तुम्हाला वाटत असेल. पण खरोखर सगळेच काही अतिरेकी नाहीत आताचा क्षण गेला तर कदाचित्–मग क्षणभर थांबून म्हणाला, 'कुछ भी हो. हमारी गम सुननेको पहलेही कोई बाहरसे आया. अबतक किसीनेभी यहां आनेका न सोचा–'

रिक्षा दृष्टिआड होईपर्यंत दिलबाग निरोपादाखल हात हालवत उभा होता.

## पंजाबमधली शिवसेना

सध्याकाळी पाकिस्तानची वाघा सरहद्द. सूर्यास्ताला दोन्ही बाजूचे झेंडे मोठ्या इतमामाने उतरविले जाणार होते. हिटलरच्या 'स्ट्रॉर्म ट्रुपर' सारखे पाय उचावून आपटणारे खडखडणारे बूट. खड्या आवाजातले कर्कश हुकुम. त्याची तंतोतत तामिली. दोन्ही राष्ट्रध्वज एकसाथच खाली आले पाहिजेत. एक तसूभर वर-खाली झाले तर राष्ट्राचा घोर अपमान !

सरसर खाली उतरणाऱ्या झेंड्याबरोबर दोन्ही बाजूला जमलेल्या जनतेची मान आपापल्या राष्ट्राभिमाने ताठ. राष्ट्रध्वज

गुडाळले गेले. मग एक शून्यता. प्रचंड पोकळी. हुरहुर.

समोर आपल्याचसारखी चालती–बोलती माणस आपल्याला बोलायचं आहे. त्यानाही बोलायच असावं; पण मध्ये ही भरभक्कम काटेरी कुंपण. हात उचावून हाताने बोलायचीही बदी. कुंपणाना धक्का बसतो.

रेंगाळणाऱ्या किरणाबरोबर बिगूलचे आर्त सूर अजूनही आसमतात रेंगाळत आहेत

आंब्याच्या मोहरचा महक सर्व कुंपण ओलाडून दाही दिशाना पसरतो आहे !

अमृतसरला दुसऱ्या दिवशी आमचा मुक्काम तेथील दुर्गामदिरात ( स्थानिक उच्चार दुर्गयिणा मदिर ) हलवावा लागला. कारण हिंदू, मुख्यत: हिंदू शिवसेनेचे लोक नाराज झाले असते. पजाबमध्ये आल्यापासून बिचाऱ्या सयोजकाची सारखी अशी ओढाताण चालू होती. सध्याच्या परिस्थितीत ते अपरिहार्यही होते. पण एकदा का ही सकळ धर्म वा निधर्मी तीर्थयात्रा सुरू झाली की तिला काही अतच रहाणार नव्हता, यात्रेला आणि समस्येला !

आनदपूर–होशियारपूरचाच अनुभव इथेही आला. जागा बदलली, धर्म बदलला तरी वृत्ती तीच. ‘हिंदू शिवसेना’ तर अतिरेक्याच्या अत्याचाराची प्रतिक्रिया म्हणूनच जन्माला आलेली. साहजिकच आक्रमक भाषा, वृत्ती तीच. एवढच काय शिखाच्या तलवार कृपाणाला उत्तर म्हणून सेनावाल्यानी कमरेला त्रिशूळ लटकवायला सुरुवात केली आहे शिखाच्या ‘जो बोले सो निहाल ऽऽ सत् श्री अकाल’ च्या तोडीला तोड म्हणून ‘जयकर वीर बजरगऽऽ हर हर महादेव’ची युद्ध घोषणाही शोधून काढली आहे. एवढच नाही तर पार्वती सेनाही स्थापन केली आहे.

पजाबमधली हिंदू शिवसेना आणि आपली शिवसेना यामध्ये ‘शिव’ सोडून ( तसे दोघाचे ‘शिव’ ही वेगवेगळे आहे पहिले शिवशकर, तर आपले शिवछत्रपती ) प्रत्यक्ष सेनेचे काही लागे–बाधे आहेत का याची मला उत्सुकता होती. सेनापती बाळासाहेब ठाकरे पजाबमध्ये येणार, आलेही, होशियारपूर वा जलदरच्या शक्ती वा देवी तलाव मदिरात त्याचे भाषणही झाले, अशा अनेक बातम्या ऐकून होतो. सेनेच्या दोन प्रमुख गटापैकी लुधियानाचा जगदीश तागडी मुंबईला जाऊन बाळासाहेबाना भेटून आल्याची आतल्या गोटाची माहितीही समजली. खर–खोट प्रत्यक्ष शिवशकरच जाणो. पण एक गोष्ट मात्र नक्की की या सर्व प्रकरणात बाळासाहेबाच्या शिवसेनेने कौतुकास्पद सयम पाळला आहे. शिवसेनेला इंदिरा गाधीबद्दल काही देणे–घेणे नव्हते. ( निदान त्याच्या खूनाच्या वेळेस ! ) असं मानल तरी नतर पजाबात निरपराध हिंदूवर झालेले अत्याचार माथे भडकविण्यास पुरेसे होते आणि नेमका हाच धोक्याचा क्षण होता आणि आहे. कारण अशा दगली घडल्या की शीख निर्वासिताचा लोढा पजाबकडे वाहू लागेल आणि त्याच्या बदल्यात पजाबातील हिंदूना हुसकावून बाहेर काढले की आपोआपच ‘खलिस्तान’ची निर्मिती होईल असा कडव्या खलिस्तानवाद्याचा मनसुबा आहे डावपेच आहेत. दिल्लीच्या दगलीनतर पजाबमध्ये जमिनीचे भाव वाढले, नव-नवीन घराच्या बाधकामास प्रारभ झाला आणि त्याच्या जाहिराती राजधानीतल्या प्रमुख वर्तमानपत्रात झळकू लागल्या ही त्याचीच निशाणी होती ! अकाली दल आणि काँग्रेस पक्ष, पजाब राज्य सरकार आणि केंद्र सरकार पजाब सरकार आणि अतिरेकी यामध्ये असलेल्या सत्ता सघर्षाने आज शीख विरुद्ध हिंदू असे अत्यत धोकादायक वळण घेतले आहे. सध्या नुसतीच ठिणगी पडली असली तरी या क्षणी जर सयमविवेक गमावला तर पजाब आणखी एकदा जातीयतेच्या वणव्यात होरपळून निघेल आणि एकदा मनाची फाळणी झाली की भू–प्रदेशाची फाळणी होणे अटळ आहे

## मुक्काम बटाला

पजाबमधील आजच्या हिंदू–शीख तणावाला एक वेगळी पार्श्वभूमी आहे. पजाब म्हणजे सतलज–रावी–बियास आदी पच नद्याचा प्रदेश पण पाणी वाटपात आपल्यावर कायम अन्याय ही पजाबी शेतकऱ्याची भावना पाण्यापेक्षाही वीज वाटपाबाबत लोकाचा–शेतकऱ्याचा भयकर राग आहे ऐन उन्हाळ्यात सोळा–सोळा तास वीज कपात असते. अनेकदा समोर कालव्यातून धो धो पाणी वहात असते, पण वीजेअभावी पप–सेट्स मृतप्राय पडल्याने डोळ्यासमोर पिक वाळून जातात ही वस्तुस्थिती आहे. पजाबमधील शेतकऱ्यांनी ( आणि यात शीख बहुसंख्य आहेत. ) याविरुद्ध केंद्र सरकारकडे अनेकदा आवाज उठवला; पण सपूर्ण पंजाबच्या हितसबधासाठी केलेली मागणी लक्षात न घेता शहरामध्ये बहुसख्येने असलेल्या हिंदूनी, हिंदू बनियानी तिला साथ दिली नाही हे शिखाचे दुःख आहे भाषेबद्दलही तसेच. पजाबमधील बहुसख्य हिंदू घरी–दारी पजाबी भाषा बोलतात. मात्र अधिकृतपणे ‘हिंदी भाषा’ लावतात या व अशा अनेक गोष्टी शिखाच्या मनात साचून होत्या. खलिस्तानवाद्यानी नेमके त्याचे भाडवल नाही केले तरच आश्चर्य ! हिंदु शिवसेनावाले आज हा डाव ओळखण्याच्या मन स्थितीत नाहीत. सुदैवाने पजाबमधील सघ–जनसघाच्या लोकानी आत्तापर्यंत खूप सयम दाखवला आहे. म्हणूनच त्याना भडकविण्यासाठी लुधियानामध्ये सघ–स्वयसेवकावर अतिरेक्यानी बेछूट गोळीबार केला. एकदा ही method in madness लक्षात आली की मग ‘madness’चा निपटारा करणे कठीण नाही बाबा परत–परत एक अतिशय महत्वाची गोष्ट सागत होते– ‘या घटकेची गरज अतिरेक्याना टोल्यास प्रतिटोला द्यायची नाही तर त्याना अलग पाडायची आहे’ ( need of the hour is not to confront them, but to isolate them ) लढाईतील डावपेचातील फक्त प्रतिहल्ला एवढाच डाव ज्याना माहीत आहे त्याना हा पेच कधीच समजणार नाही. उलगडणार नाही. असो !

अमृतसरहून कूच केले व्हाया गुरदासपूर बटालाकडे. गुरदासपूर हा या घडीला पजाबमधील सर्वात दगलग्रस्त जिल्हा. बटाल्याचा वेढा तर गेले कित्येक दिवस वर्तमानपत्रात गाजतो आहे साहजिकच आमच्या भोवतालीचे सुरक्षा–कडे आणखीनच आवळले गेले होते. मला अतिरेक्याची भीती वाटत नव्हती (मी सुवर्ण–मदिरात मुद्दामच एका फेडरेशन् कम् दमदमी टाकसाळवाल्याला हा प्रश्न विचारला होता तो म्हणाला होता, ‘तुम्ही दोन दिवस आलात–गेलात–बोललात ठीक आहे भाईचारा कोणाला नको आहे ? पण इथे तळ ठोकून आमच्याविरुद्ध काही

उपद्व्याप केलेत तर खैर नाही!) पण पाकिस्तान मला इतकी सुंदर संधी वाया जाऊ देईल असं वाटत नव्हतं. यात्रेत चौदा राज्यातील मुलं सामील. शिवाय बाबा-सारखा राष्ट्रीय स्तरावर मान–मान्यता असलेला माणूस बरोबर. जरा दंगा–फटका झाला की एक गठ्ठा चौदा राज्यात, चौदा नाही तरी गेला बाजार दहा–बारा राज्यात तरी त्याची जोरदार प्रतिक्रिया होणार. अशी संधी सोडणारा नापाकच! पण अतिरेकी–पाक हस्तकापेक्षा सर्वांत जास्त भीती वाटायची आमच्याच सुरक्षेसाठी तैनात केलेल्या शस्त्रसज्ज सेनेची अतिरेकी सोडून सर्व काही सापडत असल्याने बिचारे वैतागलेले. त्यातून दोनच दिवसांपूर्वी पोलिसाचा खातमा करून अतिरेकी कैदी पळवून घेऊन गेल्यामुळे घाईकुतीला आलेले. (आपल्या चंद्रपूर – सिरोंचाकडे अशीच धमाल चालू आहे 'नक्षलवादी' न सापडल्याने शेवटी पोलीस आणि राखीव पोलीस एकमेकानाच पकडतात!) स्टेनगन आदी सगळ्या गनस् नुस्त्या 'लोड' नाहीत तर सारखे प्रत्यक्ष 'चापा' वर बोट. साध्या जीपचे 'मिस्–फायरिंग' झाले तरी लगेच दक्ष! मी सारखा देवाची करुणा भाकायचो, बाबारे मारायच–विरायच असेल तर ऐक्यासाठी–शांतीसाठी उघड्या छातीने मरू देत (आता बंदुकीच्या गोळीला उघडी छाती काय आणि बंद छाती काय, पण आपल्यासारखेच देवालाही असले डायलॉग आवडत असावेत) पण या असल्या 'मिस्-फायरिंग' मधले मरण नको. धड 'बळी' नाही की 'हुतात्मा' नाही. असो. माझ्या आत्म्याला शांती लाभो!

बटाला हे एखादे छोटेसे खेडे असेल आणि म्हणूनच त्याला वेढा घालून बसणे फेडरेशनवाल्याना शक्य झाले असेल अशी आमची समजूत होती. पण प्रत्यक्षात बटाला चांगले मोठे गाव निघाले. लेथ बनविण्याचे अनेक कारखाने तिथे आहेत. लोकवस्ती बहुसंख्य हिंदूंची. पण एकूण पंजाबमध्ये जी परिस्थिती तीच बटाल्याची. शहरात हिंदूंचे प्राबल्य. तरी आसपासच्या ग्रामीण भागात सर्वत्र शीख. बटाल्यात जे घडले तेही अगदी प्रातिनिधिक.

१५ मार्चच्या सुमाराची घटना. दोन रिक्षाची टक्कर झाली आणि दोन्ही बाजूचे उतारू एकमेकाच्या उरावर बसले. सायकल असो वा रिक्षा हे असं नेहमीच घडतं. दुर्दैवाने एका रिक्षात हिंदू तरुण होते आणि दुसऱ्यात शीख तरुण राखीव पोलिसानी वेळीच हस्तक्षेप केला आणि तीन शीख तरुणाना धरून नेलं. झाल त्याच निमित्त होऊन शीख तरुण गुरुद्वारात जमू लागले आणि हिंदू तरुण बाहेर. मग कोणी म्हणतात गुरुद्वारातून बंदुकीचा मारा झाला तर कोणी म्हणतात गुरुद्वारावर बाँब फेकण्यात आले. एवढ मात्र खरं की गुरुद्वाराभोवती वेढा पडला आणि या वेढ्याची बातमी आजूबाजूच्या गावात वाऱ्यासारखी पसरली. एवढच नाही तर संपूर्ण गुरुद्वार उध्वस्त झाल्याचा मीठमसालाही त्यात मिसळून गेला. अशा स्थितीत खर-खोट बघण्याचा सारासार विचार कोण करणार! 'इस्लाम' असो वा 'खालसा' असो 'खतरेमे' आला म्हटल्यावर हजारो शीख गावकरी ट्रॅक्टर-जीप-बैलगाडी-उंटगाडी मिळेल त्या वाहनातून बटाल्याकडे धावत सुटले–आणि पोलिसानी शहराकडे जाणारे रस्ते रोखल्यावर तसेच रस्त्यावर ठाण मांडून बसले. आत सेनेचा गुरुद्वारला वेढा तर बाहेर फेडरेशनचा शहराला वेढा. अपने गलीमे हर कोई शेर! वास्तविकत: आजूबाजूच्या गावातील हजारो खेडुत पोटापाण्यासाठी बटाल्याच्या कारखान्यात नोकरीला जातात; पण भाकरीपेक्षा 'कोम' (धर्म) सर्वश्रेष्ठ. आपल्या तोंडची भाकरी गेली तरी बेहत्तर, पण 'हिंदु'चा भाजी-पाला-दूध तोडले यात समाधान. आपल्याच देशामध्ये आपल्याच देशबांधवांकडून आपल्याच देशबांधवाचे लेनिनग्राड! जबरदस्तीने वेढा उठवावा तर हजारो लोक कामी येणार आणि आख्खा पंजाब पेटून उठणार! पोलिसाना वा सरकारला नावं ठेवणे सोपे असले तरी प्रत्येक वेळी हे असे नाजूक जागेचे दुखणे. सुदैवाने काही शीख गावकऱ्याना आत गावात नेऊन गुरुद्वार संपूर्ण शाबूत असल्याची खात्री पटवून देण्यात अधिकारी यशस्वी झाले आणि बटाल्याचा वेढा उठला. वेढा उठला खरा, पण पंजाबच्या राजकारणाला घेराव-नाकेबंदीचे आणखी एक वरदान देऊन गेला!

बटाल्याच्या किला-मंडीची सभा जोरदार झाली. पंजाबमधली ही शेवटची जाहीर सभा. सभेसाठी संध्याकाळच्या कर्फ्यूची वेळ मुद्दाम लांबवली होती. तरी सभेसाठी आलेला एकटा-दुकटा शीख अंधार पडायच्या आत घाईने घराकडे परतत होता. सुवर्ण मंदिरात सिंहाच्या रूबाबात वावरणारा शीख, इथे बळीच्या बोकडागत कावरा-बावरा फिरताना पाहून कसेसेच वाटत होते. दोन्ही बाजूच्या शूर भेकडाची मनोमन कीव येत होती.

¤

पंजाबची सरहद्द संपत आली रावी ओलांडून दखनपूरला जम्मू-काश्मीरमध्ये प्रवेश केला. स्वागताला खूप मोठा जमाव जमला होता. आदरातिथ्यही जोरदार होते. छातीवर एक मोठा बिल्ला लावलेल्या यजमानाना मी सहज विचारल,

'यहाँ क्या स्थिती है?'

'यहाँ तो बिलकुल शांती है. उनका बिलकुल जोर नही–'

'कौन शिखोंका?' मीही अभावितपणे विचारल.

'जी नही. उन मुसलमानोंका अगर कुछ गडबड करेंगेभी तो मरोड देंगें–' कँपा–कोलाची थंडगार बाटली माझ्या हातात आग्रहपूर्वक देत यजमान उत्तरला.

¤

खूप-खूप वर्षापूर्वी "नास्तिक' सिनेमात पाहिलेले एक दृश्य सारखे डसते आहे. फाळणीमुळे सर्वस्व उध्वस्त झालेले दोन्ही बाजूचे निर्वासित गाडीतून, गाडीच्या छपरावरून, पायी, अनवाणी-लंगडत-फरफटत जस जमेल तस येत-जात आहेत. साथीला प्रदीपचे करुण-गंभीर सूर–

'देख तेरे संसार की हालत क्या हो गयी भगवान

कितना बदल गया इन्सान'

खरोखर इन्सान 'बदलला' आहे की तसाच आहे? आणि त्याचा तो कर्ता-करविता भगवानही?

**समाप्त**

## सांस्कृतिक डोंबिवली

पृष्ठ ३ वरून

प्रसार व्हावा म्हणून डोंबिवलीत एक सौंदर्य स्पर्धा भरवावी असा विचार आहे. सर्व खर्च वितरक–कपनी करणार आणि इनर व्हीलने फक्त सयोजन करावयाचे. डोंबिवलीत अशा तऱ्हेची स्पर्धा पूर्वी कधीच झाली नव्हती. त्यामुळे ही कल्पना महिलांना पसत पडली नसती तरच नवल ? ह्या स्पर्धेसाठी प्रवेश फी नव्हती. पण प्रत्येक स्पर्धकाने 'न्यू लक्स' ची तीन वेष्टणे प्रवेश अर्जाबरोबर जोडणे आवश्यक होते. शेवटी ही स्पर्धा साबूच्या प्रसारासाठी होती. तो प्रसार स्पर्धकापासूनच सुरू केला.

इनर व्हीलने ह्या स्पर्धेसाठी गावातील 'ब्युटी पार्लर्स'ची मदत घेतली. स्वय-स्फूर्तीने कोणीच पुढे आले नाही. अनेकाना गळ घातल्यानतर काही जणी तयार झाल्या. अतिम तारखेला सुमारे पस्तीस अर्ज आले. त्यात डोंबिवलीचे यथायोग्य प्रतिबिंब पडलेले दिसून आले मराठी, गुजराथी, पजाबी, उत्तर भारतीय, दक्षिण भारतीय तरुणींनी भाग घेतला ह्या भाग घेणाऱ्या मुली पधरा ते पचवीस ह्या वयोगटातील होत्या त्यातील एकच फक्त नवविवाहित होती. बाकी साऱ्या कुमारिका होत्या ह्या भाग घेणाऱ्या स्वत.ला सुदरच समजत होत्या ह्यात शकाच नाही. एक जण म्हणाली, 'एकीच्या डोळ्याला जाड भिंगाचा चष्मा होता. दुसरीचा चेहरा मुरुमानी पूर्ण भरला होता. तर तिसरी तर अगदी पुरुषी थाटाची होती.' ह्यापैकी फारच थोड्यांना सौन्दर्यस्पर्धांची नेमकी कल्पना होती. तसे पाहिले तर आयोजकांपैकी किती महिलाना त्याची पूर्ण माहिती होती ?

त्यामुळेच इनर व्हीलने ह्या क्षेत्रातील तज्ज्ञ स्त्री पुरुषाचे सहाय्य घेतले त्या तज्ज्ञानी तीन दिवस प्रशिक्षण दिले, त्या मुलीकडून तयारी करून घेतली आणि स्पर्धेसाठी योग्य वाटलेल्या निवडक मुलीना स्पर्धेत उतरवले. स्पर्धेत भाग घेण्याचा उत्साह, हौस असणे वेगळे आणि त्यासाठी लायक असणे वेगळे. पण हे साऱ्यानाच कळते, पटते, उमगते असे नाही. आणि म्हणून थोडा फार मानापमानाचा, रुसण्या-फुगण्याचा खेळ झाला असेल तर तो त्या मुलीना साजेसा, शोभेसा असाच म्हटला पाहिजे. रंगमचावर पदन्यास कसा कराव-याचा, कोणत्या वेळी कोणता हावभाव करावयाचा इ. सारखे प्रशिक्षण घेऊन ह्या सौन्दर्यवती शेवटी रगमचावर आल्या. अर्थात इतरत्र होणाऱ्या सौन्दर्य स्पर्धांचे सारे निकष इथे लावून चालणार नाही.

ही स्पर्धा फक्त निमत्रितासाठी असल्या-मुळे आवश्यक तेवढा मोकळेपणा आणि पुरेसा गभीरपणा होता. ह्या सौन्दर्यस्पर्धे-साठी जी निवड समिती होती ती त्या विषयातील खास स्त्रियाची होती. ह्या स्पर्धक युवती तीन प्रकारचे पोशाख परिधान करून परीक्षक व प्रेक्षकासमोर येत होत्या. साडी, सलवार खमीज आणि मिडी असे हे तीन प्रकारचे पोशाख होते. त्या पोशाखाला साजेसे असे पार्श्वसगीत वाजत, निनादत होते आणि त्या सुरावटीवर स्पर्धक युवतीचे हावभाव होत होते. मिडीच्या वेळी डिस्को सगीत, सलवार खमीजच्या वेळी उडत्या चालीचे तर साडीच्या वेळी सथ लयीतले, कृष्ण भेटीला आतुर झालेल्या गोपीच्या भावभावनाना साजेसे असे होते.

ह्या सौदर्यस्पर्धेत यशस्वी झालेल्या युव-तीना रोख बक्षिसे वा उपयुक्त वस्तू न देता कायम टिकतील, नजरेसमोर राहतील, स्मरण देतील अशीच होती. तिघीना चादीची पदके दिली व दुसऱ्या तिघीना चादीच्या लक्ष्मीच्या मूर्ती दिल्या. ह्या बक्षिसावरूनच ही स्पर्धा किती मनापासून आणि गाभीर्याने पार पाडली ते लक्षात येईल इतरत्र अशा स्पर्धेत जो उथळपणा, बटबटीतपणा आणि भपकेबाजपणा असतो त्याचा मागमूसही इथे नव्हता उपस्थित असणाऱ्या सुमारे तिनशे प्रेक्षकानी डोंबिवलीत न भूतो न भविष्यती अशी झालेली ही स्पर्धा मोठ्या कौतुकाने, रसिकतेने आणि प्रौढ समजसपणे पाहिली. असे म्हणण्याचे कारण असे आहे, की प्रेक्षकही स्पर्धकासारखेच तरुण होते तरुण वयाने आणि मनानेही.

ह्या अशा स्पर्धा विविध हेतू ठेवून होतात. पुरस्कृत करणाऱ्याचा हेतू ह्या मालाचा प्रसार व्हावा असा होता. सयोजक सस्थेचा हेतू एक वेगळा उपक्रम मोठ्या हौसेने आणि जिद्दीने पार पाडावा असा असणे अगदी साहजिक आहे. स्पर्धकांचा हेतू कोणता असेल ? जेवढे स्पर्धक तेवढे हेतू असे म्हणा-वयास हरकत नाही. इनर व्हीलच्या चिट-णीस सौ. विजया जोशी म्हणाल्या 'मी पहिल्या गटात क्रमाने पटकावणाऱ्या कु. अर्चना सिंग (वय वर्षे पधरा), कु. शर्मिष्ठा विर्ले व कु. अपूर्वा चडोले ह्यांच्या मनाचा कानोसा घेतला. त्यापैकी कोणाच्याही मनात आपण पुढे जाऊन मॉडेलींग करावे असा हेतू नाही. एखाद दुसरी भाग घेणारी आज उत्साहाने मॉडेल होण्याचे बोलत होती एवढे मात्र खरे आजच्या मुली खरेच धीट (बोल्ड) आहेत. यात शकाच नाही. ह्या नव्या डोंबि-वलीच्या प्रतिनिधी आहेत. जुनी डोंबिवली अशी नव्हती.' ही स्पर्धा यशस्वी करण्यात इनरव्हीलच्या अध्यक्ष सौ. रेखा लिखिते, चिट-णीस सौ. विजया जोशी आणि त्याचप्रा इतर सदस्य भगिनी ह्याचा बहुमोल वाटा आहे. त्याचप्रमाणे रोटरी क्लबचे माजी अध्यक्ष आणि गावातील एक ज्येष्ठ सामाजिक, राज-कीय कार्यकर्ते श्री. जिविक्रम ऊर्फ आप्पा दातार इ. चे सहकार्य लाभले.

डोंबिवली आता हळूहळू कात टाकीत आहे. पूर्वीची डोंबिवली तशी कर्मठ, सोवळी होती. बदलती डोंबिवली जुने जपता जपता नव्या जगाला, नव्या जगातील नवेपणाला जवळ करते आहे. पण ह्या कार्यकर्त्यांशी बोलताना एक मात्र जाणवले की, अशी स्पर्धा पुन्हा होईल की नाही हे सागता येत नाही. पण इनर व्हील मात्र पुढाकार घेणार नाही, सहभागी होणार नाही. ह्या स्पर्धेला जवळ जवळ पस्तीस हजार रुपये खर्च आला असावा असा एकाचा अदाज आहे एवढा खर्च कोणाला परवडेल ? मुंबईतल्या कोणत्याच नियतकालिकात ह्या स्पर्धेबद्दल एक अवा-क्षरही छापून आले नाही. सा माणूसमध्ये प्रथमच हे येत आहे हे मुद्दाम लिहितो.

—चंद्रशेखर राजे

चित्रपट

# समस्येला आपल्या पद्धतीनं पर्याय शोधणारा
# ' पुढचं पाऊल '

हुंडा कमी दिला, लग्नात मानपान केलं नाही, असल्या कारणावरून सुनेला जाळून मारल्याच्या घटना आपण रोज वाचतो माहेरून पैसे आणत नाही म्हणून नवरा, सासू करत असलेल्या छळाला कटाळून मुलीनं आत्महत्या केल्याच्या बातम्याही रोज कानावर पडत असतात या सगळ्या प्रकरणात कायदा मुलीच्या बाजून असला तरी त्याच सहाय्य घेण सगळ्यानाच जमणार नसतं. अशा वेळेस या छळाला शोधलेला वेगळाच पर्याय ट्रॉयका फिल्म्सच्या 'पुढच पाऊल' मध्ये माडला आहे. हा पर्याय खूपसा भडक असला तरी या समस्येला एका वेगळयाच दृष्टिकोनातून पहायचा प्रयत्न या चित्रपटात आहे आणि म्हणून तो स्तुत्य ठरतो.

हा चित्रपट पहाताना 'लेक चालली सासरला' ची आठवण येण अपरिहार्य आहे. अर्थात हे साम्य फक्त पूर्वार्धापर्यंतच कायम रहात.

'पर्याय' नाटकावरून हा चित्रपट बेतलेला आहे. त्यामुळे त्याची कथा तशी सगळयाना माहीत असलेलीच आहे. माई (आशालता) या शाळेत शिक्षिका घरात त्याचा नवरा अण्णासाहेब (यशवत दत्त). एकुलता एक मुलगा शिनू (सागर) आणि सून चित्रा (मानसी) एवढीच माणसं. चित्रा ही शिनूची दुसरी पत्नी. माई पैशाच्या आत्यतिक लोभी. आपल्या दोन श्रीमत बहिणीशी स्पर्धा करण्याच्या धडपडीपायी मुलाला हाताशी धरून सुनेला त्रास देणाऱ्या त्याच्या आणि शिनूच्या या हव्यासापायीच पहिल्या सुनेन, रेखान आत्महत्या केलेली असते.

चित्राचाही घरात छळ चालूच असतो. एकटे अण्णा तिला प्रेमानं वागवत असतात. पण त्यांच घरात काही चालत नसत. फ्रीजसाठी पैसे दिले नाहीत म्हणून माई चित्राला तिच्या धाकटया बहिणीच्या लग्नाला पाठवत नाहीत. तिचे वडील (निळू फुले) येऊन मनधरणी करतात. पण त्याचाही काही उपयोग होत नाही शेजारी रहाणारा रामू चित्राला पुस्तक वाचायला देतो म्हणून त्याच्यावरून माई तिच्यावर सशय घेतच रहातात.

सततच बोलण, मारहाण यानी कटाळून जाऊन चित्रा अण्णा काश्मीरला गेलेले असताना गळफास लावून आत्महत्या करते

आजूबाजूच्या सगळयाच लोकाना तिनं छळामुळ हा मार्ग पत्करला हे माहीत असतं. पण तस कुणीही माईंच्या तोंडावर बोलत नाही. शिनूचं पुन्हा लग्न होऊ नये म्हणून अण्णा खूप प्रयत्न करतात. पण त्याचा उपयोग होत नाही आणि तो कमलाशी (अर्चना) तिसर लग्न करतो.

कमलाला सुरुवातीला काहीच कल्पना नसते. पण नतर स्वत अण्णा आणि आजूबाजूचे लोक तिला सावध करतात. माई आणि शिनूचा आपल्या नावे असलेल्या प्रॉपर्टीवर डोळा आहे हे तिलाही कळून चुकत.

दरम्यान गावात 'सोबती सघटना' नावाची सघटना स्थापन झालेली असते अशा अत्याचाराना आपल्या पद्धतीने, वेळ आली तर कायदा हातात घेऊनही उत्तर द्यायच ही या सघटनेची पद्धत अण्णा आणि कमल त्याची मदत घेतात असं असूनही प्रॉपर्टी विकण्याच्या कागदावर कमलनं सही करावी म्हणून माई व शिनू जबरदस्ती करतात. तिला पेटवायचाही प्रयत्न होतो पण ती निसटून बाहेर पडते तेव्हापासून माई व शिनूवर गावाकडून बहिष्कार टाकला जातो. त्याना सामान मिळण अशक्य होत, पाणी, वीज तोडली जाते. या सगळ्यानं हे दोघे हतबल होतात. पण तेव्हा बराच उशीर झालेला असतो शिनूची सोबती सघटनेकडून अतिशय अपमानास्पद अशी धिड काढली जाते माई मात्र परिस्थितीपुढ वाकायच नाकारतात आणि स्वतःच लावलेल्या आगीत जळून भस्मसात होतात.

दिग्दर्शक राजदत्तनी चित्रपट चागला घेतला आहे. चित्रपट कुठही रेंगाळत नाही विशेषत. पूर्वार्ध तर अधिक सुत्र करून टाकणारा आहे. ज्या छळाबद्दल अनेकदा वाचलेल आहे, ऐकलेल आहे ते सगळ प्रत्यक्ष पहाताना अस वाटण, याच कारण चित्रपट-माध्यमाचा प्रभावीपणा हे आहेच पण तितकच ते श्रेय राजदत्ताचही आहे. सोबती सघटनेचा नेता बडा प्रत्यक्ष न दाखवता त्याचा नुसता हातच चित्रपटात दिसतो. हा एक वेगळेपणा इथ आहे राजदत्ताच्याच अजून प्रदर्शित न झालेल्या 'माफीचा साक्षीदार' मध्येही त्यानी साक्षीदार म्हणून डायरीचा वापर असाच प्रतीकात्मक रूपात केला आहे सरधोपट मराठी चित्रात अशा प्रयोगानी काही वेगळेपणा येतोय का बघायच

दिग्दर्शक आणि लेखक जयवत दळवींनी सोबती सघटनेचा प्रचार, बहिष्कार हे सगळ बरचस फिल्मी पद्धतीन घेतल आहे ते वास्तवाशी जवळच नाही पण अगदी अमिताभच्या चित्रपटाइतक स्वप्नाळूही नाही. भडक पद्धतीन का असेना पण समस्येला आपल्या पद्धतीन उत्तर दिलं गेल आहे हे चित्रपटाच वैशिष्टच.

चित्राला संगीत सुधीर फडकेच आहे तीनही गाणी चागली आहेत विशेषत. 'एकाच या जन्मामध्ये' उल्लेखनीय.

अभिनयात बाजी मारली आहे यशवत दत्तनी अतिशय सज्जन, बायको-मुलाला विरोध असूनही तस बोलू न शकणारा, पण शेवटी त्याना प्रतिकार करणारा अण्णासाहेब त्यांनी सुदर रगवला आहे. त्याचा आवाज, मुद्राभिनय सगळच उल्लेखनीय. इतर कलाकारांत आशालता, निळू फुले या अनुभवी कलाकाराबरोबरच, सागर, मानसी, अर्चना या नवोदितानीही आपली कामगिरी चोख पार पाडली आहे.

—सीमा कुलकर्णी

# आवाहन आणि आव्हान

मार्ग नावाची नवी संस्था दिल्लीला रजिस्टर झाली आहे. संस्थेच्या कामात पुनर्वसनाचो समस्या मुख्यत्वे आहे. नर्मदा नदीवर जे धरण नवागाम गुजरात येथे बाधले जात आहे त्याखाली गुजरात ( १६ गावे ) महाराष्ट्र ( ३६ गावे ) मध्यप्रदेश ( १८९ गावे ) बुडणार आहेत. मध्यप्रदेशातील गावाबद्दल सर्वात कमी माहिती आहे. ह्यापैकी काही आदिवासी गावात प्राथमिक सर्वेक्षण करण्यासाठी २–४ तरुण–तरुणींची गरज आहे. दोन–दोनच्या गटांनी हिडणे सोयिस्कर ठरावे. मे–जून ह्या दोन महिन्यात काम करायचे आहे. ज्या प्रश्नांची उत्तरे हवी आहेत ते प्रश्न दिले जातील. त्याचा वापर करायचा. प्रश्नावली भरायची नाही.

हिंदी व गुजराती येणे आवश्यक आहे. म. प्र. मधले आदिवासी भिल्ल ह्या भाषा समजू शकतात. तसेच डोगर भागातून, उन्हातून हिडण्याची सवय असणे आवश्यक आहे. वयाचा मुद्दा गौण आहे. प्रवासाचा खर्च रु. १००० /– द म दिले जातील. स्थानिक संपर्क साधण्यासाठी पत्तेही. दोन महिन्यात ३०–४० गावे व्हावीत असे वाटते.

संपर्क साधावा

**वसुधा धागमवार**
Exec. Director – MARG
B-2/104 B Safdarjang Enclave
New Delhi 110029
Tel – 606551